शनिवार । १ मार्च १९७५ । एक रुपया

# माणूस

चित्र वार्ता पुस्तक
पुरवणीसह



## यावेळी मात्र ‘ शाही शिकाऱ्या ’चीच शिकार झाली !



साप्ताहिक **माणूस**

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १ मार्च | अंक : चाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९

मराठवाड्याकडे
महाराष्ट्राचे नेतृत्व आले आहे.
परिस्थितीच्या ओझ्याखाली
दबलेल्या या तळच्या माणसाचा
चेहरामोहरा जरासा जरी उजळला
तरच हा बदल खऱ्या अर्थाने
नेतृत्वबदल ठरेल.
नाहीतर हा केवळ सत्ताबदल.
वरवरची खांदेपालट.



असे
म्हणतात
की



यशवंतरावजी या सत्ताबदलाला निदान
सुरवातीला तरी फारसे उत्सुक नव्हते
पण या सर्व मंडळींनी जोर धरला आणि
शेवट अर्थातच गोडगोड झाला.





बॅ. रजनी पटेल ● वसंतदादा पाटील ● पी. के. सावंत



# सर्वत्र प्रचंड उत्सुकता

सर्वत्र प्रचंड उत्सुकता
सर्वत्र प्रचंड उत्सुकता



# क्षणचित्रे

## आमदार निवास । सचिवालय । क्रॉफर्ड मार्केट । वर्षा । रामटेक

**सोमवार, दि. १७ फेब्रुवारी ७५**

सकाळीच आमदार निवासात आलो. सेशन सुरू व्हायला तब्बल आठवडा अवधी असतानाही अधिवेशन सुरू होऊन आठवडा उलटावा एवढी भाऊ-जीभाऊ गर्दी तिथे होती. महाराष्ट्राच्या नेतृत्वात अनपेक्षितरित्या झालेला बदल आणि मंत्रीमंडळ वध-घट या पार्श्वभूमीवर गर्दीत आनंदी आणि दुःखी चेहेरेही दिसत होते. बरेचसे ओळखीचे.

'शंकर'राव चव्हाण यांच्या नेतृत्वावर एव्हाना शिक्कामोर्तब झाले होते आणि त्या संदर्भात इथे 'सोमवारी' पोचावे हा 'बदला' इतकाच गंमतीचा योगायोग. काऊंटरवर चौकशी केली. आमच्या जिल्ह्यातले कोण कोण आमदार आल्येत याची. म्हणजे उतरायची सोय होईल. पण बहुतेकांच्या 'डबल' रूमलाही 'कॉमन' रूमची कळा आली होती. मग धुळे जिल्ह्यातील आमदार व माजी राज्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील यांच्या रूमवर गेलो.

'या-या-या' म्हणत शिवाजीरावांनी एका हाताने स्वागत करून दुसरा 'बेल'च्या बटनाकडे नेला. सोबत धुळ्याचेच झुंजार पत्रकार भाई मदाने. रूमबॉयला शिवाजीरावांनी चहा सांगितला. औपचारिक गप्पा-'केव्हा आलात?' (केव्हा जाणार? हा खरा आमदारनिवासातला अध्याहृत सवालही) आणि धुळे जिल्ह्यातील राजकारणाचा विषय निघाला. वृत्तपत्रातून सध्या गाजत असलेले कापसाचे परप्रांतगमन व तांदुळाचे परदेशगमन व त्यातून शिजलेले-(की उकडलेले?) राजकारण रंगले. साईनिंग पेन घेऊन ताज्या वृत्तपत्राच्या कोऱ्या दीड इंच कडेवर शिवाजीराव महाराष्ट्र-गुजरात मध्यप्रदेशाच्या सीमा आखून स्मगलिंग कसे होते ते सांगू लागतात. एक कडक जांभई द्यावीशी वाटते, कारण नेतृत्व बदलाच्या ऐतिहासिक घटनांसाठी मी इथे आलेलो होतो. भौगोलिक सीमात त्यावेळी तरी मला अजिबात इंटरेस्ट नव्हता.

शिवाजीराव भेटले यात थोडेसे समाधान होते. शंकरराव चव्हाणांच्या किचन कॅबिनेटमधले म्हणून ते ओळखले जातात. तेव्हा 'परदेके पीछे' काय व कसे घडले ते समजावे म्हणून विषय काढला. पण त्यांनी ताकास तूर लागू दिला नाही. (बहुधा त्यांचीही माहिती ताज्या बातम्यांइतकीच फ्रेश असावी.) अखेरी एक बदल जाऊ देत पण २०-२१ च्या 'बदला' बाबत काय? असा माझा प्रश्न.

'मोठ्या प्रमाणात बदल होणार नाहीत' हे त्यांचे उत्तर. 'तुमचे काय?' यावरही निश्चित असे काहीच उत्तर नाही. शिवाजीराव पाटील यांनी मंत्रीमंडळ निर्गमनानंतरची तशी दोन वर्षे वनवासातच काढली. शंकरराव चव्हाणांशी दोस्ती हे त्याचे खरे कारण. तेव्हा 'न्याय' मिळावा ही त्यांची अपेक्षा असणारच. शिवाजीराव त्यासाठी धडपडणे अपरिहार्य. पण 'शंकरा' हाती फक्त यादी दिल्लीप्रत नेणे एवढेच आहे. 'फुल्या' मारणे देवीजींचा अधिकार. त्यांनाही ठाऊक असल्याने ते काहीसे भांबावलेले दिसले. मागच्या मंत्रीमंडळात ज्यांना प्रवेश नाकारला त्या सर्वांच्या मनःस्थितीचे शिवाजीराव हे प्रतिनिधीच वाटले. गप्पा खंटत चालल्या. भाई मदानेही निघण्याच्या तयारीत होते.

'आम्हाला शंकररावांकडे जायचंय. जस्ट टू काँग्रॅच्युलेट'

'चला'

'हो, तुम्ही असलात की आमची इन्ट्रोडक्शन चांगली होईल.'

'ठीक आहे'

निघालो. लिफ्टजवळ आधीच तिघे चौघे. त्यात आमदार किती ते समजणे कठीण. आमदार निवासाचे हे एक कायमचे वैशिष्ट्य. इथे येणाऱ्या, उतरणाऱ्या, अवतरणाऱ्यांपैकी नव्वद टक्के लोक 'आमदार-सदृश' दिसतात. वाटतात. त्यामुळेच की काय शिवाजीराव येताच (हे ही कदाचित एम्. एल्. ए. असतील) अशा समजुतीने लिफ्टमनने सलाम ठोकला. शिवाजीरावांनी (माजी) मंत्रीस्टाईल मान किंचित लववून सलाम घेतला. लिफ्टमधून आम्ही ग्राऊंड फ्लोअरला आलो.

काऊंटरवर (माजी मंत्री) आबासाहेब निंबाळकर आणि त्यांचे निकटचे सहकारी होते. शिवाजीरावांनी त्यांना बाजूला घेतले. त्यांच्या गर्दीतल्या (खाजगी) गप्पा वाढल्या. मी कंटाळलो. पण समदुःखी एकत्र बोलत असताना शिवाजीरावांना बोलावणेही कठीण गेले.

एकमेकांचा निरोप घेऊन शिवाजीराव आले. बंगल्यावर (अर्थातच चव्हाणांच्या) जाण्यापूर्वी सचिवालयाचे एक काम आटोपू. तिथूनच फोन करू व मग जाऊ ही त्यांची सूचना. घड्याळात एव्हाना साडे अकरा वाजून गेले होते.

पहिल्यांदा सहाव्या माळ्यावर श्री. शरदराव पवार यांच्या चेंबरकडे गेलो. शिपायाने 'एज्युकेशन'ची मिटिंग चालल्याचे सांगितले. रिव्हॉल्वर कमरेला बांधलेल्या फौजदाराने एकदम खडू हातात घेऊन शिक्षकाचा पेशा पत्करावा असेच काहीसे शरदरावांचे झालेले होते. म्हणून त्यांच्या मिटींगज् डिस्टर्ब करू नये ह्या हेतूने मी शिवाजीरावांची पाठराखण करीत दादासाहेब रूपवत्यांच्या चेंबरकडे निघालो. मार्गातच भेटले प्रभाकर कुंटे.

ठेंगणी मूर्ती. तर्जनी आणि मधल्या बोटात जळती विल्स-एक-सव्वा इंचाचा 'ॲश क्राऊन' घातलेली. दोघांचे मनमोकळे संभाषण.

कुंटेही अबाउट टर्न करून रूपवत्यांच्या चेंबरकडे आमच्याबरोबर आले. पण 'डायरेक्ट' नाही. मध्ये रस्त्यात (की छत्रमार्गात (कॅरिडॉरमध्ये) ?) जो ओळखीचा भेटे त्याच्याशी कुंटेंचे सलगीचे बोल. 'केम नटवरभाय् केम छे ?...' भाई, आज तो गडबड है, कल आ जाना !'...'अरे व्वा, तू कुठे इकडे ?' मंत्रीपदाची शिष्ट झूल प्रभाकरभाईंच्या अंगावर अजिबात दिसली नाही. बऱ्याच जणांच्या कागदावर–अर्जावर उभ्या उभ्याच शेरे–ताशेरे लिहीत प्रभाकर कुंटे, शिवाजीराव आम्ही रूपवत्यांकडे आलो. आधी तिथे दोघे तिघे बसलेले. आम्ही येताच दादासाहेबांनी शिपायाला पाहुण्यांना चहा पाज, असे फर्मावले. 'आम्ही जरा आत बसतो. चहा आला की बाहेर येऊ' असे सांगून ते सर्वजण आत (अँटि-चेंबरमध्ये) गेले. जाताना आम्हाला तसा चहा आवडत नाही. आम्ही आपले 'ओशट कोडग्यासवाले' असे फर्मावायला दादासाहेब विसरले नाहीत.

आत नक्की काय चालल्ये होते कुणास ठाऊक ? जवळ जवळ अर्धा तास वैतागून गेलो. रुपवतेंच्या चेंबरमधले फोटो पाहून झाल्ये होते. चहाही घेऊन झाला होता. शिपाईही गप्पा मारायला आत नव्हता. पण तो कोणत्याही क्षणी टपकेल अशी भीती असल्याने अँटी चेंबरच्या भिंतीला कान लावणे अँटी–एटिकेटस् ठरले असते. तेवढ्यात फोनची घंटी वाजली. कोणीच नाही असे पाहून रिसिव्हर उचलला. ऑपरेटर–'कुंटेसाहेब आहेत का ?' 'आहेत.' 'रामकृष्ण बजाजांचा फोन आहे.'

मी शिपायाच्या शोधात. शिपाई कुंटेंकडे. आणि कुंटे फोनचा ताबा घेत, त्रासिक नजरेने 'ह्या कोण बुवा इथे ?' या दृष्टीने माझ्याकडे पाहून 'मी तुम्हाला नंतर रिंग करतो' म्हणून फोन ठेवून देत पुन्हा खोलीत. शिपाई पुन्हा एकदा फायली ठेवायला आला. सिगारेटची जाम तल्लफ आलेली. 'अॅश ट्रे' कुठाय म्हणून त्याला विचारले तर 'सायबाला शिगरेटीची सवय नाही' असे आदर्श तत्व सांगून रवाना. काड्या सगळ्या खिशात टाकल्या, रिकाम्या पेटीचा अॅश ट्रे केला. वाट पहात थांबलो.

तब्बल एकच्या सुमारास पुन्हा शरदरावांच्या चेंबरकडे. मिटिंग संपलेली होती. आता 'मेंबर' वाढले होते. आमदार शिवाजीराव पाटील व प्रभाकर कुंटे, दादासाहेब रूपवते, उदयसिंहराव गायकवाड व आणखी दोघेचौघे मंत्री शरदरावांच्या खोलीतच पण 'अँटी' खोलीत रवाना. शरदरावांचा डबा आलेला होता. डबा आत गेला.

जाता जाता दादासाहेब रूपवत्यांचा पुन्हा एक भीम टोला. 'सॉरी हं; फार वेळ वाट पाहायला लागली. खरे म्हणजे तुम्ही आम्हाला दोन हजार वर्षे वाट पाहायला लावलेली आहे. तेव्हा तुम्हाला दोन तास थांबायला लावले तर काही बिघडत नाही.' रुपवते मागेही एक-दोन वेळेस सभेला उशीरा आले तेव्हा असेच काहीसे बोलले होते. त्यामुळे त्यात नाविन्य मला अजिबात वाटले नाही. 'समता' 'समता' म्हणत पुन्हा जुन्या जखमाच तर ते असे बोलून चिघळवतात की काय, असे वाटले.

शिपायाने चार चकरा मारून आठ ग्लासातून पिण्याचे पाणी आत नेले. याचा अर्थ एक डबा सातजण खाणार. सत्तेचेही अशाच पद्धतीने आगामी एक-दोन दिवसात वाटप होऊन एकोप्याची जी जाहिरात झाली त्याची ती नांदी तर नव्हती ना ?

आमदार निवासात एक तास गेला. दीड-पावणेदोन तास रूपवतेंच्या चेंबरमध्ये. आणि आता इथे किती वेळ जाणार कोणास ठाऊक. इथेही 'अॅश ट्रे' कुठे विचारायला नको म्हणून बाहेरच बाकावर बसलो. शरदरावांची ख्याली खुशाली विचारायला आलेला बारामती–मुंबई गाडीवरचा कंडक्टर शेजारीच बसला होता. तशी पब्लिक बरीच जमली होती. शिवाजीरावांनी फोन करून तीन नंतर चव्हाणसाहेबांकडे जायची अॅपॉईंटमेंट घेतलेली होती. मिनिटकाटा सारखा पुढे सरकत होता. विड्याही संपल्या होत्या. सगळेच चेहरे बिनओळखी. तेवढ्यात वामनराव मटकर आले. काहीतरी विषय काढून 'टाईमपास' होईल म्हणून मी म्हटले.

'नमस्कार साहेब, आपण आमदार मठकर ना ?'

'हो.'

'बसा ना' मी 'जागा' (खाली) करून देत म्हटले.

'नको–नको–माझी कंबर दुखत्ये बसले की.'

'आत कोण कोण आहेत ?'

मी यादी सांगताच त्यांच्या कपाळावर आठ्या. आणि मलाच सल्ला. 'अहो आता त्यांचे चाललेय् खुर्चीचे वाटप. पण ते सगळेच गॅसवर आहेत. आपण येतो–जातो–की राहातो. तुम्ही कशाला आज वाट पाहाता. आज-उद्या काय पण २१-२२ तारखेपर्यंत ते सगळे तुम्हाला भेटणारच नाहीत. मग मात्र तुमच्याच भेटीला येतील. हा माझा फोटो–ही मुलाखत–जरा छापाल तर बरे होईल.'

'चालायचेच'

'पण ह्या चर्चेत घोळ घालण्यापेक्षा त्यांनी असे करायला पाहिजे.'

'कसे ?'

मग डॉ. मटकरांनी हिशेब सांगितला. निवडणुका व्हायला आता दीड वर्ष आहे. आम्ही काँग्रेसचे २२२ आणि विरोधकांचे ए. टी. पाटलांच्या ग्रुपचे १८ असे जवळ जवळ २४० आमदार आहोत. तीस जणांचे मंत्रीमंडळ करायचे आणि प्रत्येकाला दीड-दीड महिना द्यायचा. म्हणजे भांडणे नाहीत, खाली खेचणे नाही. सगळे खूश. प्रत्येक आमदाराच्या नावापुढे 'माजी-मंत्री' ही आयुष्यभर उपाधी लागेल.

पण यातून काय साधणार ?'

'काय म्हणजे बरेच साधणार' आपल्या मिश्कील शैलीत वामनराव म्हणाले, 'अहो आपापल्या मतदार संघात प्रत्येकजण स्वतःचे नाव कोरलेली एक एक कोनशीला बसवून घेईल. बरे त्यावर इमारत बांधलीच पाहिजे असा काही नियम नसल्याने सरकारलाही त्रास नाही. पावसाळ्यात चार महिने ही कोनशीला पावसाने स्वच्छ राहील आणि उरलेले आठ महिने कुत्रा तंगडी वर करून ती साफ ठेवीलच–चला' असे म्हणत वामनराव निघून गेले.

एकूण काँग्रेसच्या राजकारणात कुत्र्यासारखा 'तंगडी वर' करण्याचे प्रकार सर्वत्र चालू असताना (बटू) 'वामन'रावांनी ह्या 'पद'न्यासाची आयडीया द्यावी हीही गंमतच वाटली.

साडेतीन झालेले. मी पुरता अस्वस्थ. अँटीचेंबरमधली बैठक आटोपली आणि मेळ्यात आणखी दोन–तीन मंत्र्यांची भर पडली.

चव्हाणांच्या बंगल्याकडे निघायला मुहूर्त लागेलसे वाटले नाही. कारण हा ताफा आता वसंतरावदादांच्या चेंबरकडे चालला होता.

वाटेत अंबाजोगाई मतदारसंघातून समाजवादी पक्षाचे नेते श्री. बापूसाहेब काळदाते यांचा पराभव करून निवडून आलेले आमदार आणखी दोन परिचित आमदार व त्यांचा तांडा भेटला. प्रभाकर कुंटेंनी 'बाबूराव' म्हणत त्यांच्या कमरेला जळत्या विल्ससह विळखा घातला. '–पहा बरं. आमच्याकडे लक्ष ठेवा आता सचिवालय मराठवाड्याच्या ताब्यात आहे. नाहीतर आम्हालाच विसराल.' बाबूराव फक्त 'विसणार नाही' या अर्थाने हसले. पण त्यांच्याबरोबरचे मराठवाड्यातलेच एक आमदार कडाडले.

'अहो, आमचा शंकर खरोखरच भोळा सांब आहे. त्याला पश्चिम महाराष्ट्राने तात्पुरते प्रसन्न करून भस्मासुरासारखा वर मागून घेतलाय्. पश्चिम महाराष्ट्रातले राजकीय भस्मासूर त्याच्या केव्हा डोक्यावर हात ठेवतील ते सांगता यायचं नाही.'

'म्हणजे काय?' बाबूराव.

'अहो उघड आहे. येत्या निवडणुकीपुरतं वर्ष दीड वर्ष शंकररावांना मुख्यमंत्री करायचं अन् निवडणुका आटोपल्या की, मराठवाड्याला मुख्यमंत्रिपद द्यायचा आम्ही शब्द पाळला म्हणून बोंब ठोकून ते पुन्हा बळकावयचं!!'

'च्यायला अशी हाय् व्ह्यू आयडीया' एक नेता उत्तर महाराष्ट्रातला आमच्या समवेतचा. ही प्रतिक्रिया ऐकून तो मराठवाड्यातला संतप्त आमदार म्हणाला, 'पण हे आम्ही खपवून घेणार नाही. पश्चिम महाराष्ट्रानं आणि विदर्भानं दहा–दहा वर्षं मुख्यमंत्रिपद पुरेपूर उपभोगलंय्. अशी वर्ष–दीड वर्षात आमची बोळवण आम्ही खपवून घेणार नाही. आम्हालाही तेवढीच टर्म पाहिजे. आमचा शंकर भोळा सांब असला तरी त्याची स्मशानातली भुतावळ आहोत आम्ही. एकेकाच्या मानगुटीवरच बसू.'

चर्चेला एकदम सिरिअस वळण लागलेले दिसले. मंत्री–आमदार पडेल चेहऱ्याने पुढे एक–एक सरकू लागले आणि मी शिवाजीरावांबरोबर शंकररावांकडे जाण्याचा नाद सोडला. चार दोन खासगी कामे आटोपून 'एकला चलो रे' मार्गाने जाऊ संध्याकाळी असे ठरवले. तोवर जिल्ह्यातले काही मित्रही भेटले.

संध्याकाळच्या सुमारास जायचे ठरल्याने सकाळपासून पाहिलेल्या घटनांची संगतीही थोडाफार लावायला अवधी मिळाला होता.

बरोबरची मंडळी खादीधारी व काँग्रेस पक्षीय होती. त्यांच्याकडे ॲम्बॅसॅडर गाडीच असल्याने टॅक्सीचे पैसे वाचल्याचे समाधान शंकररावांची भेट झाल्याच्या समाधानाइतकेच मला होते.

संध्याकाळी सातचा सुमार. गाडी 'मरीन ड्राईव्ह'वरून सरळ घेण्याऐवजी उलटी क्रॉफर्ड मार्केटपाशी थांबल्याने कुतुहल म्हणून मार्केटात गेलो.

भराभर ऑर्डरी सुटल्या. चार हार, चार गुच्छ. पुन्हा आमची पंचाईत. 'अहो, काहीतरी एक घ्या. हार अन् गुच्छ दोन–दोन कशाला?' आमची काटकसरीची सूचना. त्यांनी 'पत्रकार की बावळट?' अशा प्रश्नांकित मुद्रेने आमच्याकडे कटाक्ष टाकला. मला समजावून सांगण्यात आले. हार शंकररावांसाठी अन् गुच्छ वसंतरावांसाठी. आपल्याला दोन्हीकडे जायचेय्. हारांची हारी ॲम्बॅसॅडरच्या फ्रंटसीटवर व गुच्छांचा पेटारा डिकीत टाकायला सांगायला ही नेतेमंडळी विसरली नाहीत.

गाडी 'रामटेक'वर शंकररावांकडे आली. अभ्यागत गृहात खूपच गर्दी होती. बाहेर एक वायरलेसची जीप. दरवाजावर सहा–सात कॉन्स्टेबल. 'लाल दिव्यां'च्या गाड्यांची येजा. आत कोण बसलेयत् याची चौकशी केली. देवतळेसाहेब आणि कुलाब्याचे शिवाजीराव सावंत बसल्याचे सांगण्यात आले. आता ही मंडळी लवकर उठणार नाहीत. तेव्हा पाच–दहा मिनिटे वाट पाहू म्हणून बसलो. तेवढ्यात पुन्हा एक लाल दिवा चमकला. गाडीतून वसंतरावदादा, भाऊसाहेब वर्तक आले. पाठोपाठ पुन्हा एक लाल दिवा–शंकरराव पाटील (मंत्री) आले. आमच्या दोघा चाणाक्ष जिल्हा परिषद सदस्यांनी या तिघा चौघांना ओळखले व माझ्या रिकाम्या हातात एकदम दोन हार आले व ते पुढे सरसावले. त्यांनी नमस्कार केला. वर्तकांनी जुजबी चौकशी केली. मला बाहेर येण्यास खुणावले. मिनिस्टर स्टाईल दोन–तीन हार डाव्या हातात घेऊन मी शंकररावांच्या बंगल्यातून बाहेर आलो.

'आता चला. च्यायला घोळच झाला. हे काही लवकर जाणार नाहीत. तोपर्यंत आपण वसंतराव 'उरकून घेऊ' असे फर्मावण्यात आले. आमची यात्रा 'शंकरा'च्या देवळाकडून 'वसंत' रावांच्या मठाकडे निघाली.

वसंतराव नाईकांचा 'वर्षा' बंगला. बाहेर दोन–तीन फियाट दिसल्या. एक नुकताच वर्ष–दोन वर्ष सर्व्हिस झालेला पोलीस बंगल्याच्या थोडा आत थोडा बाहेर उभा होता. फक्त बंगल्यातलेच दिवे उजळलेले होते. बाकी बाहेर अंधार. कदाचित् 'पॉवर–कट' ही असेल. नेहमीची वर्दळ नाही. धावपळ नाही. गडबड नाही. पी. टी आय्. मशीन 'स्थितप्रज्ञ'पणे एकटेच धडधडत होते. खूपसा रोल टाईप होऊन त्याचा अस्ताव्यस्त लांबोळका कागद सुस्त होऊन आडव्या–तिडव्या पसरलेल्या पांढऱ्या अजगराप्रमाणे पडलेला दिसत होता.

मी आत गेलो. अभ्यागत गृहात फक्त एक जोडपे. बहुधा नागपूरचे उद्योगपती धनवटे व त्यांच्या पत्नी. शहाद्याच्या साखर कारखान्याचे चेअरमन आणि 'पुरुषोत्तम सेना' फेम पी. के. अण्णा, विजय मराठे व नासिक जिल्ह्यातले दोघे–तिघे एवढेच होते. त्यांच्याशी ओळख काढली. तेही एका साखर कारखान्याचेच संचालक निघाले. बाहेर पाच–दहा मिनिटे थांबून मी आतून बाहेर येणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे पी. आर. ओ. सहस्त्रभोजने साहेबांना विचारले.

'विद्याधर गोखले बसलेत.' ते म्हणाले.

'मग त्यांना तंबाखू–चुना नेऊन द्या म्हणजे लवकर उठतील' कोणी तरी चघळसूचना केली. पण ती पी. के. पाटलांनी फेटाळली. 'तंबाखू रंगली तर गप्पा रंगतील अन् आपलाच वेळ (वाया?) जाईल' अशी त्यांची हरकत.

एवढ्यात मिस्टर अँड मिसेस नीला गोखलेही आल्या. त्यांच्या मागे मुंबईचे झुंजार पत्रकार अनिरुद्ध पुनर्वसु तथा नारायणराव आठवले. पी. के. पाटलांना मोगली थाटाचा मुजरा करून ते पाटलांच्या डाव्या हाताला स्थानापन्न झाले. मान लववून पाटलांशी 'केव्हा येणे

केलेत ?' अशी त्यांची विचारणा. अनिरुद्धांना एवढ्या 'रुद्रावस्थेत' यापूर्वी न पाहिल्याने मी थोडासा अस्वस्थ. तेवढ्यात विद्याधरजी बाहेर आले. इकडे-तिकडे-चोहीकडे चार दोन शब्द बोलून विद्याधरजी रवाना.

भोजनेची घाई. 'चला चला.' आम्ही आपले मागेच. कारण आमचे मित्र गुच्छांचा पेटारा फोडण्यासाठी गेले होते. पण पी. कें. ची आणखी घाई. 'अहो जा-जा, आत जा.' 'नाही, तुम्ही जा, तुम्ही आधी आलात.'

'कसचं कसचं, चला तुम्ही-पत्रकार, घ्या बोलून' पी. के.

याचा अर्थ त्यांना आठवले-मराठे-पाटील अशीच 'एकांत' भेट हवी होती. पण ते भोजनेच्या कदाचित् लक्षात न आल्याने त्यांनी सगळ्यांनाच एकदम एंट्री दिली. ना. नाईक साहेब व सौ. वत्सलाताई दोघेच आत होते. टेबलावर एकही फाईल नव्हती. बहुधा समारंभात भेट म्हणून मिळालेला मोठ्या आकाराचा एक शिसवी पाईप होता. नाईकसाहेब थंडच होते. 'बसा-बसा'चा सल्ला. दोन-तीन क्षण सायलेन्स. कोण काय बोलणार कप्पाळ ?

अखेरीस वत्सलाताईच बोलल्या. त्याही सगळ्यांना उद्देशून !! 'कशा काय आहेत आपल्या मिसेस ?'

तिघे-चौघे एकदमच म्हणाले, 'ठीक आहेत, ठीक आहेत.'

निफाड कारखान्याचे संचालक म्हणाले, 'ताई तुम्ही आमच्या कारखान्यावर १९६४ साली आला होतात. मी त्यावेळी चेअरमन होतो.' हा धागा वसंतरावांनी पकडला.

'किती झालं क्रशिंग ?' नाईकसाहेब.

'दोन लाख टन' संचालक.

'अरे व्वा, किती करणार ?'

'पावणेचार लाखावर जाऊ.' आणि मग नाईकसाहेब एकदमच अस्वस्थ दिसले. त्यांनी पाईप पेटवला. आमच्याकडे एकदा गंभीर होऊन पाहिलं.

'बघा-बघा. मी पहिल्यापासून बोंबलत होतो.' साखर कारखाने काढा म्हणून. पण त्या दिल्लीच्या मूर्खांना अक्कल नाही. मी मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्यांदा जेव्हा सगळ्या सी. एम्. ची मिटिंग झाली त्यावेळी साखर कारखाने जास्तीत काढा म्हणून सांगितले. पण साले पैशाच्या अडचणी सांगायला लागले. आज अमेरिकेत शेहेचाळीस रुपये साखर चालू आहे' नाईकसाहेबांच्या चेहऱ्यावर थोडासा चिडका भाव स्पष्ट दिसू लागला होता. वृत्तपत्रांतून He is not at all perturbed...'स्थितप्रज्ञ मुख्यमंत्री' अशा चौकटी वाचल्या होत्या. त्या उगाचच आठवल्या.

'मी म्हणतो, सोळा-सतरा रुपये जरी किलोला भाव मिळाला असता तरी काय बिघडले असते ? किती मोठ्या प्रमाणात आपल्याला फॉरेन एक्स्चेंज मिळाले असते. साखर इथं दोन-तीन रुपये किलोने मिळाली असती. माझा तर या दिल्लीवाल्यांवर पहिल्यापासून आरोप आहे, They are thinking for only scarcity not for plenty. धान्य पिकवायला काय त्रास होतो अन् शेती तर अजीबात परवडत नाही हे एकदा कोरडवाहू जमीन कसा म्हणावं म्हणजे कळेल; ७६-७७ रुपये भाव देतात.'

हा 'आतला' आवाज पी. कें. च्या दुखण्यामुळे थांबला. 'आम्ही एवढे उत्पादन करतो पण एम्. एस्. सी. बँक आम्हाला प्लेजसाठी पैसे देत नाही. आम्हाला तर नोकरांना पगार कसे द्यावेत याची काळजी आहे-इति पी. के. -नाईकसाहेब यावर काही बोलणार तोच ते निफाडचे लोक म्हणाले, 'का बरं ? असं काही नाही. आम्हाला तर जवळजवळ दोन कोटी रुपये मिळालेत. मग तुम्हालाच का नाही मिळणार ?'

माझ्या डोक्यात पुन्हा धुळ्याची घुळवड आली. धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रतिनिधी म्हणून एम्. एस्. सी. बँकेवर आमदार शिवाजीराव पाटील गेलेत. पी. कें. ची जिल्हा बँकेतून हकालपट्टी करून ते तिथे आले आहेत आणि 'पी. के.' विरोधी आघाडीचे नेतेही आहेत. एम्. एस्. सी. बँकेच्या नथीतून शिवाजीरावांवर बहुधा त्यांचा हा 'प्लेज-ॲरो' असावा. आम्ही अभ्यागत-गृहात बसलो असतानाच ते म्हणाले होते, 'काय म्हणतात तुमचे राजे शिवाजी ? सकाळी तुम्हाला पाहिलं आम्ही. एकत्र होतात सचिवालयात !!' आणि पी. के. आता आम्हाला 'तुम्ही आधी भेटून घ्या सी. एम्. ना' असा आग्रह का करीत होते तेही लक्षात आलं. विषय थांबला. आम्ही सगळे बाहेर आलो. पण अनिरुद्ध पुनर्वसू, विजय मराठे, पी. के. अण्णा पुन्हा आत गेले.

आम्ही निघालो तेव्हा नाईकसाहेबांच्या टेबलावर अवघे दोनच गुच्छ होते.

नाईकसाहेबांच्या चेंबरमध्ये जाऊन बाहेर पडेपर्यंत मला सातत्याने जयवंत दळवींच्या 'संध्या छाया'ची आठवण येत होती. ती दृश्ये नकळत डोळ्यासमोरून तरळून जात होती. नाईकसाहेब-ताईसाहेब शांत. वेळ जाण्यासाठी काहीतरी बोलायचं म्हणून वत्सलाताईंची सुरुवात आणि नानांसारखाच नाईकांचा चिडखोर झालेला स्वभाव. 'संध्याछाया भिवविती हृदया'सारखे जाणवत होते.नाईकसाहेबांच्या दिल्लीवर होणाऱ्या वारांतून आणि मागच्या दिल्लीवारीतील आठवणीतून.

नाईकांना 'उरकून' आम्ही शंकररावांच्या बंगल्यावर आलो. आता मात्र घुसायचेच असे ठरवून गेलो. जुजबी ओळखी. नकली आदर. नाटकी बोलणे. तेवढ्यात रत्नाप्पांचा प्रवेश. कुठल्यातरी जिल्हा परिषदेतल्या भानगडींचा विषय. क्षणाक्षणाला शंकरराव सुखावत होते. खरे म्हणजे समोरच्या बोलण्याकडे त्यांचे दुर्लक्षच होते. 'हो हो' ... 'खरंच' असं म्हणत ते येणारे 'कॉल्स' रिसीव्ह करीत होते. अण्णांचा चव्हाणांच्या बोलण्याला मधून मधून त्यांचा हात दाबून दुजोरा. कोणीतरी आणखी एक शिवाजीराव तिथे बसलेच होते. साहेबांनी म्हटले तर उठल्यासारखे निमित्त केले आणि स्वागताचे हार स्वीकारले. आम्ही परतलो.

'दादा-बापू' एकत्र जेवायला आल्याचे समजले. शरदराव 'यजमान' आहेत असे कळले आणि भोळ्या सांबांचं दीड वर्षाचं तर हे पद नाही ना ? या सकाळच्या सचिवालयातल्या संदर्भाची प्रकर्षानं आठवण आली.

☐ ☐

# मुख्यमंत्री नाईक यांची पदच्युती

## माहितगार

विधिमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन अगदी तोंडावर असताना वसंतराव नाईक यांची मुख्यमंत्रिपदावरून उचलबांगडी झाल्याने काहींना आश्चर्याचा धक्का बसला असला तरी नाईकांची उचलबांगडी अनपेक्षित अशी खासच नाही ! तसे पाहिल्यास नाईक गेली काही वर्षे सत्तेवर राहिले हेच आश्चर्य म्हटले पाहिजे. १९७० च्या अखेरपासून वसंतराव नाईक यांच्याविरुद्ध वारे वाहू लागले होते. परंतु प्रत्येक वेळी वेगळे कारण पुढे करून आपले घोडे पुढे दामटण्यात वसंतराव नाईक इतरांच्या मदतीने यशस्वी होत गेले. त्याचप्रमाणे राज्यापुढे आलेली संकटे, केंद्रीय नेत्यांपुढे असलेले प्रश्न हे वसंतरावांना वरदान ठरत गेले. आणि आजचे मरण पुढे ढकलले जात होते. परंतु त्यामुळे एकीकडे केंद्रात असलेली त्यांची पत कमीकमी होत चालली होती. शेवटी शेवटी तर नाइकांचा शब्द विश्वासार्हच मानला जात नव्हता. वेळोवेळी त्यांची खरडपट्टी काढण्याचे प्रसंग येऊ लागले होते. अशा प्रसंगी नाईक केंद्रावर हल्ला चढवून आपली वैयक्तिक नापत लपवण्यासाठी तात्त्विक आधार घेत गेले. काही वेळा ते जमून जाई पण नंतर तेच त्यांच्या अंगलट येऊ लागले. पटाईत वाघाची शिकार करणारा हा निष्णात शिकारी हळूहळू वाघाच्या तावडीत असहाय्यपणे सापडत चालला होता. आपल्या कर्माने ! सन्मानाने जाण्याचा मार्ग सोडून सत्तेच्या नशेत नाईक अवमानित होऊन खुर्चीवरून खाली खेचले गेले. आता नाइकांना ज्या पद्धतीने जावे लागले ती पद्धत चांगली नाही असे त्यांचे मित्र म्हणत आहेत. पण या पर्वाला सर्वस्वी नाईकच जबाबदार आहेत. काही प्रमाणात यशवंतराव चव्हाणही कारणीभूत मानावे लागतील !

यशवंतराव चव्हाण यांनी शंकरराव चव्हाणांना प्रथम १९६७ मध्ये व नंतर १९७२ मध्ये मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन दिले होते. १९६७ साली ती संधी आली तेव्हा शंकररावांना १९७२ मध्ये मुख्यमंत्री करण्याचा वायदा यशवंतरावांनी केला. १९६९ मध्ये काँग्रेस फुटीचे राजकारण घडले. यशवंतरावांनी राष्ट्रपतींच्या निवडणुकीत संजीव रेड्डींना मते देण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र काँग्रेसने आपल्या निर्णयाला पाठिंबा द्यावा असे यशवंतराव म्हणू लागले तेव्हा शंकररावांनी त्यांना 'तुम्ही म्हणत असाल तर आम्ही रेड्डींना मते देतो. पण त्यांना आम्ही मराठवाड्यातील मंडळी चांगली ओळखून आहोत. त्यांना मते देणे आम्हाला योग्य वाटत नाही' असे स्पष्टपणे बजावले होते. पंतप्रधानांनाही याची माहिती मिळाली होती. निदान माझ्याशी बोलताना एकदा शंकररावांनी तसे सांगितले होते. याचे परिणामही महाराष्ट्राच्या राजकारणावर घडत होते. १९७२ च्या निवडणुका तोंडावर असताना महाराष्ट्राच्या पार्लमेंटरी बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी हे परिणाम दिसू लागले होते. पार्लमेंटरी बोर्डाच्या दोन जागा भरावयाच्या होत्या. नाईक–यशवंतराव चव्हाणांनी आपण म्हणू त्याप्रमाणे महाराष्ट्र काँग्रेस मान्य करणार असे गृहीत धरून आपली नावे सुचवली; पण ऐनवेळी पंतप्रधानांचा निरोप आला. शंकरराव चव्हाणांशी विचार करून पार्लमेंटरी बोर्डाच्या जागा भरण्याविषयी पंतप्रधानांनी निरोप दिला होता. या घटनेच्या निमित्ताने शंकरराव प्रथम यशवंतरावांच्या विरोधात उभे राहिले ! महाराष्ट्रात यशवंतरावांच्या विरोधात शेवटपर्यंत कोण उभे राहू शकेल याचा श्रीमती गांधी अंदाज घेत होत्या. बाळासाहेब देसाई यशवंतरावांविरुद्ध बोलत होते. पण वेळ येताच त्यांना साष्टांग नमस्कारही घालत होते. यशवंतराव मोहिते यांच्याविषयीही बाईंना असाच अनुभव आला होता. त्यामुळे महाराष्ट्रात यशवंतरावांविरुद्ध संघर्षात उभी राहणारी व्यक्ती बाईंना पाहिजे होती. शंकररावांची त्या दृष्टीने श्रीमती गांधी कसोटी पाहात होत्या. यशवंतरावांनी कबूल करूनही आपल्याला मुख्यमंत्रिपद दिले नाही हा राग शंकररावांच्या मनात होता. पण यशवंतरावांच्या इच्छेशिवाय महाराष्ट्र काँग्रेसचे पान हालत नव्हते. म्हणून १९७२ च्या आश्वासनावर समाधान मानण्याची पाळी आली होती. यावेळपर्यंत शंकररावांविषयी पंतप्रधानांना खात्री पटलेली नव्हती; परंतु त्यांच्याविषयी बाईंना आशा वाटत होती. पार्लमेंटरी बोर्डावर मराठवाड्याचे म्हणून शंकररावांनी बाळासाहेब सावनेकर यांचे नाव सुचवले. पण शंकररावांचा हा अंदाज चुकला ! सावनेकर छपे यशवंतराववादी होते असे मराठवाड्यातील मंडळी म्हणत आहेत. सावनेकरांनी शंकररावांना पद्धतशीरपणे अडचणीत आणले. याची जाणीव शंकररावांना फार उशीरा झाली होती.

शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले तर आपल्या महाराष्ट्रातील नेतृत्वाला शह मिळण्याची भीती यशवंतरावांना वाटत होती. शंकररावांचा कारभार स्वच्छ राहील. त्यामुळे ते महाराष्ट्रात लोकप्रिय होतील. शिवाय त्यांच्या कारभारातील हातोटीमुळे शंकररावांचा प्रभाव वाढत जाईल आणि महाराष्ट्राच्या क्षितिजावरील आपले महत्त्व कमी होईल ही चिंता यशवंतरावांना भेडसावत आहे. त्यामुळेच नेता निवडीच्या २० फेब्रुवारीच्या सभेत यशवंतराव समाधानी दिसत नव्हते.

श्रीमती गांधींना महाराष्ट्रात आपले पाय रोवून यशवंतरावांना पर्यायी नेतृत्व उभे करावयाचे होते. राष्ट्रपती निवडणुकीत यशवंतरावांनी श्रीमती गांधींना दगा दिला होता त्याचा फायदा वसंत-

[ पृष्ठ ८–अ वर ]

मुक्काम पुणे

# प्राध्यापकवर्गाची नव्या वेतनश्रेणीची मागणी न्याय्य आहे का ?

अनिल किणीकर

तर आपल्या ७ मागण्यांसाठी पुणे विद्यापीठातील प्राध्यापक परीक्षांवर बहिष्कार टाकणार आहेत—म्हणजे एक प्रकारचा संप करणार आहेत...आता खऱ्या अर्थाने प्राध्यापक हा धंदेवाईक पद्धतीने समाजात वावरू पाहात आहे...

सुदैवाने बरेच प्राध्यापक मित्र आहेत—त्यातल्या एकाकडे गेलो. म्हटलं त्याच्याशी सहज काही बोलावं. त्याला विचारलं, 'बहिष्काराचा निर्णय कोणत्या कारणाने घेतला आहे ?' तर तो म्हणाला, 'यू. जी. सी. ने ७००—१६०० ही ग्रेड शिफारस केली असूनही विद्यापीठ ती देण्याचे मान्य करीत नाही. वास्तविक अन्यत्र ही ग्रेड मान्य झालेली आहे. शिवाय बाकीच्या आमच्या मागण्या आहेतच.'

'म्हणजे तुम्ही पैशाच्या दृष्टिकोनातून प्रामुख्याने बहिष्कार टाकलेला आहे ?'

'ऑफ कोर्स, सध्या मिळणारा रु. ५०० —६०० पगार अगदीच तुटपुंजा आहे. दैनंदिन जीवनासाठीच आमचा हा पगार पुरेसा होत नाही. तर मग आमच्या व्यवसायाच्या दृष्टीने वाचन, व्यासंग तर दूरच.'

'तसं म्हटलं तर समाजातील बराचसा वर्ग हा ३००—४०० रु. मिळवतो अन् त्यात तोही जगत असतो. जीवनावश्यक वस्तूंचे भाव सर्वांना सारखेच आहेत. तेव्हा तुम्हाला मिळणारा ५॥—६ शे. रु. पगार 'तुटपुंजा' आहे हे पटत नाही आणि वाचन—व्यासंग वगैरेंचं विचाराल तर ज्याला तळमळ आहे, आंतरिक ओढ आहे तो प्राध्यापक कॉलेजच्या वा बाहेरच्या अन्य लायब्ररीमध्ये जाऊन वाचन—व्यासंग करील. खरं तर कितीसे प्राध्यापक वाचन—व्यासंग करतात? कितीजण लायब्ररीमध्ये वाचन करीत असतात ?'

'खरं उत्तर : फारच थोडे—अगदी बोटावर मोजण्याइतके. बाकी सगळे पाटया टाकणारेच प्राध्यापक असतात...'

'—तर मग तुमचा पगार वाचन—व्यासंग—मनस्वास्थ्य यासाठी वाढवावा ही मागणी तितकी समर्थनीय नाही...'

आता मला जरा जोर आला...

'कारण फारच थोडेजण अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विषयाच्या अनुषंगाने वाचन करीत असतात. माझ्या ओळखीचे भाषेचे एक प्राध्यापक आहेत. काही वर्षे तालुकाप्लेसला नोकरी केल्यानंतर शहरात आले. एकदा भेट झाली. वाङ्मयाचा विषय निघून अमूक एका वाङ्मयीन मासिकातील लेख चांगला आहे, वाचला का ? असे विचारले तर त्याने चक्क विचारले, हे कसले मासिक आहे ? मला माहीत नाही आणि मी अभ्यासाच्या क्रमिक व अत्यावश्यक पुस्तकांशिवाय अन्य काहीही वाचीत नाही.' मग मी त्याला विचारले, 'रिसर्चचा विचार दिसत नाही.' तर त्याचे उत्तर : कसलं डोंबलाचं रिसर्च ! अन् करायचं काय ? आणि रिसर्चसाठी वाचन किंवा व्यासंगाची आवश्यकता असतेच, असं नाही—वह किस्सा अलग है...'

'नाही—तू असल्या एखाद-दुसऱ्या उदाहरणावरून काही निष्कर्ष काढू नकोस...'

'...नाही, मी निष्कर्ष काही काढीत नाही—पण इंटलेक्चुअलचं हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. आपल्या प्राध्यापकांनी वाचन, चिंतन अन् व्यासंग केला असता तर शिक्षणाचा दर्जा हळूहळू तरी वाढला असता ! आणि ह्या गोष्टी झाल्या शहरातल्या. तालुका प्लेसमधील आनंद काही विचारू नका. पगारासकट सर्वच बाबतीतील त्यांची दयनीय अवस्था—तर तुम्ही अशा दयनीय प्राध्यापकांच्या समस्येवर आंदोलन का करीत नाही ? ७००—१६०० चा पगार मिळावा म्हणून एकदम बहिष्कार टाकणे म्हणजे सामाजिक जबाबदारी वगैरे काही आहे की नाही ?'

'सामाजिक जबाबदारी वगैरे शब्दांची भंकस नको. मुळात समाजच त्या दृष्टीकोनातून आमच्याकडे पाहात नाहीये...'

'नाही—त्या दृष्टीकोनातून सामाजिक जबाबदारी मी म्हणत नाही. शहरातले काही थोडे सोडले तर तालुक्यातील कॉलेजेसमध्ये प्राध्यापकांचे जीवन अस्थिर आहे. एक म्हणजे त्यांना कंटिन्यूअस नोकरीची शाश्वती नाही. दोन : पूर्ण पगाराची अन् तीही वेळेवर, निश्चिती नाही. आणि आता जर ७००—१६०० पगाराची ग्रेड दिली तर किती तरी मोठे कुरण मॅनेजमेंटच्या लोकांना चरायला मिळेल...त्यापेक्षा नोकरीची शाश्वती आणि पूर्ण पगाराची निश्चिती ह्या दोन प्रमुख समस्यांवरच आंदोलन उभारले पाहिजे होते—'

'—त्याही आमच्या अन्य मागण्या आहेतच...'

'...पण ७००—१६०० ही प्रमुख मागणी आहे—अं? तर सध्या मिळणारा ५॥—६ शे हा पगारच कामाच्या मानाने जास्त आहे. शिक-

विण्याचे तंत्र दोन वर्षात अवगत होते, ते झाले की अभ्यासक्रम थोडा इकडे-तिकडे होतो एवढेच. बाकी वर्षानुवर्षे तेच तेच परीक्षेच्या दृष्टीकोनातून शिकवायचे. शिवाय संपूर्ण अभ्यासक्रम शिकविण्याची किंवा पूर्ण करण्याची जबाबदारी नाही. तुम्ही फक्त 'गाईडलाईन' सांगायची. अशा मर्यादित जबाबदारीमुळे बाहेर लॉजिक, इकॉनॉमिक्स, पॉलिटीक्स, फिजिक्स–केमिस्ट्री–मॅथेमॅटिक्स (प्रॅक्टिकलसह), अकौंटन्सी, बुककीपींग, इंग्लीश इ. क्लासेस दणक्यात चालले आहेत...तशातच आणखी २॥–३ महिने उन्हाळा–दिवाळी सुट्टी आणि अन्य काही सुट्ट्या. म्हणजे वर्षातील ६-७ महिने कॉलेज. इतर महिन्यांच्या पगार मात्र चालूच. शिवाय विद्यापीठ परीक्षांचे पेपर्सचे पैसे निराळे. (हा बोनसच!) सरकारी किंवा खाजगी ऑफिसेस-कारखाने इ. मधून ग्रॅज्युएट किंवा पोस्ट ग्रॅज्युएटस्ना दहा एक महिने आठ-आठ तास काम करावे तेव्हा कुठे ३॥-४-४॥ शे. पगार मिळतो...तर तुम्ही 'पैसे' सोडून अन्य गोष्टीबाबतच्या दर्जाबद्दल आग्रह का धरीत नाही? आणि नैतिक जबाबदारी स्वीकारली म्हणजे आमचा प्राध्यापकांचा दर्जा सुधारला पाहिजे, आम्हाला वाचन व्यासंगासाठी चांगली पुस्तके हवीत–सुट्टीमध्ये काही निवडक विद्यार्थ्यांना विशेष शिकवू इ. इ.–'

'बस्–बस्...आपण आता चहा घेऊ...' तो उखडला.

'चहा घेऊ पण असा वैतागू नकोस. हा प्रश्न केवळ पैशाच्या संदर्भातला आहे आणि तुम्ही तो विद्यार्थ्यांचा 'बळी' देऊन साध्य करू पाहाताय्...'

'विद्यार्थ्यांचा 'बळी देऊन नव्हे. आमच्या न्याय्य व आवश्यक मागण्या–'

'ह्या तुमच्या बोलण्यात कामगारी प्रवृत्ती डोकावतेय्...तुम्ही प्राध्यापक असल्यामुळे शब्दांबाबत मतभेद होऊ शकतील. परंतु परिणाम मात्र निश्चित आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान. परीक्षांवरील बहिष्काराचा निर्णय अधिक विचाराने व गांभीर्याने घ्यायला पाहिजे होता. तुम्ही 'मॅनेजमेंटचे केवळ नोकर' नाहीआत. काही एका जबाबदारीच्या दृष्टिकोनातून समाज तुमच्याकडे पाहात असतो, समाज खर्च करीत असतो. विद्यार्थ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विचार जागृतीचं केंद्र म्हणून कॉलेजचा विचार होतो. तेव्हा तुमचा बहिष्कार म्हणजे 'विद्यार्थी' ह्या साधनाची स्वार्थी पिळणूक आहे. वैयक्तिक 'साध्या' साठी 'विद्यार्थी' हे साधनही तुम्ही मनाप्रमाणे वापरू नका. शिक्षण आणि शिक्षक सामाजिकदृष्टया नपुंसक ठरल्यामुळे बिहारमध्ये जयप्रकाशनी कॉलेजसवर बहिष्कार टाकायला सांगितला आणि प्रतिसाद म्हणून बहुतेक कॉलेजेस ओस पडू लागली आहेत. विद्यार्थ्यांमध्येच जागृती झाली तर इथंही गुजराथ आणि बिहार घडायला वेळ लागणार नाही... दुर्दैवान विद्यार्थी संघटना आपल्याकडे म्हणाव्या तितक्या सामर्थ्यवान नाहीत. नाही तर उद्या अमूक प्राध्यापक व्यवस्थित शिकवत नाही–त्यांचे शिकवणे कळत नाही–आमच्या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक मिळत नाहीत–' वगैरे चळवळ सुरू झाली तर किती तरी प्राध्यापकांची नोकरी धोक्यात येईल...'

तर 'पाट्या टाकण्याची' वृत्ती सोडा, अन्य जबाबदाऱ्या स्वीकारल्यात तर विद्यार्थी वर्गच उद्या तुमच्या मागण्यांना पाठिंबा देईल.'

तर तो म्हणाला: 'कालच काय ते ठरवील, पाहू या.'

तोपर्यंत सौ. प्राध्यापक वहिनींकडून चहा आला होता. चहा घेतला अन् बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी (दि. २३–२–७५) वर्तमानपत्रात बातमी वाचली. पूना युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. राजीनाम्याविषयी उपाध्यक्ष म्हणाले–प्राध्यापकांना ७००–१६०० वेतनश्रेणी मिळावी या मागणीला माझा विरोध आहे. अन्य मागण्याना माझा पाठिंबा आहे...

एखाद्याचा 'कॉन्शस' जागा होतो तो असा...

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्री (कुल) गुरवेनमः॥

□


बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत
खरेदी करा!
मिलच्या
दुकानांत
खरेदी करा!!
सुपर ऑफर

[पृष्ठ ५-अ वरून ]
रावांनी उठवला. आपण यशवंतरावांचे नेतृत्व त्या वेळच्या परिस्थितीत मानले होते असे वसंतरावांनी डी. पी. मिश्रांमार्फत श्रीमती गांधींना सांगून १९७२ मध्ये मुख्यमंत्रिपद मिळवले होते. त्या वेळी डी. पी. मिश्रांची पंतप्रधानांजवळ वट होती. त्यामुळे जुन्या मध्य प्रदेशातील संबंधांना उजाळा देऊन वसंतराव नाइकांनी आपले बस्तान बसवले होते. परंतु त्यावेळी वसंतरावांनी स्वतःवर दोन वर्षांची मुदत घालून घेतली होती. १९७२ मध्ये मुख्यमंत्रिपद मिळवताना नाइकांनी त्यांच्याविरुद्ध प्रसिद्ध झालेल्या बातमीचाही फायदा करून घेतला. वसंतराव नाईक यांच्या घरावर सी. बी. आय. ने धाड घातल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. ही बातमी प्रसिद्ध होण्यापूर्वी एका वार्ताहराने काही दिवस आधी मला ही माहिती सांगितली होती. त्यानंतर काही दिवसांनी बातमी प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास श्री. नाईक आजारी पडले आणि बोरीबंदर स्टेशनवरून त्यांना इस्पितळात हलवले होते. त्याच दिवशी श्री. नाईक यांच्या एका चिटणिसाने मला जी हकीगत सांगितली तिचा अर्थ लावणे कठीण आहे. 'साहेबांना स्वप्न पडले आणि छाती दडपली गेली. परंतु स्वप्नामुळे छाती दडपली गेली की छाती दडपल्यामुळे स्वप्न पडले हे सांगता येत नाही' असे ते चिटणीस म्हणाले होते. मात्र हे स्वप्न काय होते हे त्यांनी सांगितले नव्हते.

## औरंगाबादची घोषणा

या धाडीच्या बातमीबद्दल यशवंतरावांनी सार्वजनिक ठिकाणी नापसंती व्यक्त केली नाही ही वसंतरावांची तक्रार होती. डी. पी. मिश्रांमार्फत श्री. नाईक श्रीमती गांधी यांच्याकडे बस्तान बसवू लागले होते. आपण नाईलाज म्हणून यशवंतरावांना नेता मानले होते, असे लोटांगण श्री. नाईक घालत होते. यामुळे यशवंतराव बेचैन झाले होते. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रातील एखादी व्यक्ती श्रीमती गांधी यांचा विश्वास संपादन करत आहे असे आढळून येई तेव्हा यशवंतराव व अशी व्यक्ती यांच्यात बेबनाव झाल्याचे दिसून येईल. डी. पी. मिश्रांमार्फत नाईक बस्तान बसवू लागले त्यावेळी त्यांनी चारित्र्यहननाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्रीपदावरून बाजूला होणे योग्य होणार नाही म्हणून मुख्यमंत्रीपदी आपल्याला ठेवावे आणि तेही दोन वर्षांकरता अशी अट श्री. नाईक यांनी स्वतःच घालून घेतली होती.

शंकरराव हा माणूस यशवंतरावांचा आहे असा समजही वसंतराव नाईक यांनी श्रीमती गांधी यांचा करून दिला होता असे सांगितले जाते. शंकररावांना यशवंतरावांचा पाठिंबा आहे, कारण त्यांनी पूर्वी तसे आश्वासन दिले आहे याची आठवण या संदर्भात करून दिली जात होती. यामुळे श्रीमती गांधींनी (अर्थात हे सर्व डी. पी. मिश्रांनी श्रीमती गांधींना पटवल्यामुळे) वसंतराव नाईक यांचे मुख्यमंत्रीपद कायम करण्याचे ठरवले. श्रीमती गांधी यांच्या या बेताची कुणकुण यशवंतरावांना लागली. अजूनही महाराष्ट्रात आपण ठरवू त्याप्रमाणे घडते असे वातावरण कायम ठेवण्यासाठी यशवंतरावांनी औरंगाबादला ऑगस्ट १९७१ मध्ये वसंतरावांच्या हाती महाराष्ट्राची सूत्रे सुरक्षित असल्याची घोषणा केली असे काँग्रेसचे जबाबदार लोकच म्हणतात. औरंगाबादला यशवंतरावांनी केलेली ही घोषणा म्हणजे 'आमच्या घरात येऊन आमच्याच थोबाडीत मारल्याचा प्रकार आहे की हो!' असे मराठवाड्याचे नेते म्हणतात! यावर सत्य प्रकाश यशवंतरावच टाकू शकतील. परंतु यातून स्पष्ट होते ते एवढेच, की श्रीमती गांधी यांचा विश्वास संपादन करणारी महाराष्ट्रातील व्यक्ती यशवंतरावांच्या मनातून उतरत असते! आपल्याला मुख्यमंत्री करावे म्हणून शंकरराव श्रीमती गांधी यांच्याकडे यशवंतरावांना डावलून गेले होते. त्याचाही राग यशवंतरावांना आहे. पार्लमेंटरी बोर्डाच्या जागा भरण्यासंबंधी श्रीमती गांधी यांचा निरोप आल्यानंतर वसंतराव नाईक यांनी नंतरच्या काळात केलेल्या हालचाली व डी. पी. मिश्रा यांचा करून घेतलेला वापर आणि स्वतःवर घालून घेतलेली दोन वर्षांची मुदत यामुळे वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. त्यावेळी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष वसंतरावदादा पाटील श्री. नाईक यांच्या बाजूला होते. शंकररावांना शह देण्यासाठी दादांना मंत्रिमंडळात घेण्यात आले. त्यांना मंत्रिमंडळात घेऊन वसंतरावांनी एका दगडात दोन पक्षी मारले होते. सहकारी क्षेत्रावरील दादांचे वर्चस्व कमी केले गेले व शंकररावांना आणखी एक शत्रू आणून उभा केला गेला होता.

मुख्यमंत्रीपद नाईक यांच्याकडे सुरक्षित राहिल्यावर शंकरराव चव्हाण एकाकी पडले होते. त्यांच्यबरोबर वैशंपायन, बाळासाहेब पवार, बाबुराव काळे, फरूक पाशा, एकनाथ साळवे, वि.. गो. प्रभुगावकर, डी. वाय. पाटील अशांसारखे अगदी हाताच्या बोटांवर मोजणारे लोक राहिले होते. दोन वर्षांची मुदत संपण्याच्या मार्गावर आली पण श्री. नाईक कबूल केल्याप्रमाणे जागा सोडण्याची भाषा करीनात! त्यातच दुष्काळ पडला. अशा काळात नेतृत्वात बदल करण्याची मागणी करणे शहाणपणाचे ठरणार नव्हते. दुष्काळही नाईकांच्या पथ्यावर पडला होता. दुष्काळानंतर नाईक आपल्याला विश्वासात घेत नाहीत अशा कुरबुरी मंत्रिमंडळात सुरू झाल्या. मंत्री आपापसात तसे उघड बोलत होते. शिवाय महत्त्वाकांक्षी लोकांना आपणच मुख्यमंत्री व्हावे असे वाटू लागले. मग नाईकांना काढायचे कसे हा विचार सुरू झाला. मराठवाड्याचा हक्क सांगून शंकररावांच्या बाजूला उभे राहणे व त्यासाठी नाईकांनी दोन वर्षांची मुदत घेतली होती, याचा आधार घेणे सोयीचे होते. दादांना आपण मुख्यमंत्री व्हावे असे वाटत होते. शरद पवार, यशवंतराव मोहिते यांच्या आशाही पल्लवित झाल्या होत्या. आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होण्यासाठी वसंतराव नाईक जाणे भाग होते. वसंतराव नाईकांच्या कारभारात धोरण नव्हते, वशिलेबाजी आणि भ्रष्टाचारही वाढत होता. कार्यक्रमाची अंमलबजावणी होत नव्हती. व्यवहारवादाच्या नावाखाली दबावाला बळी पडून नाईक निर्णय बदलत होते. ते बदलताना मंत्र्यांना विश्वासात घेतले जात नव्हते. त्यामुळे मंत्री नाराज! विधानसभा कामकाजात नाईकांना रस नव्हताच. त्यामुळे सभागृहात ते फारसे बसायचे नाहीत. त्यामुळे आमदारही नाखुश. अशा परिस्थितीत काही आमदार पंतप्रधानांकडे पत्र पाठवून नेता हटवण्याचा प्रयत्न करत होते. त्याला शह देण्याकरता वसंतराव नाईकांनी विरोधात असलेल्या लोकांच्या जातीचा धागा पकडला आणि अल्पसंख्यांकांचे राजकारण पुढे रेटण्याचा प्रयत्न सुरू केला. आणि मराठेतर मंत्र्यांचा गट बनवला. नेता


पृष्ठ २९-अ वर




# ॥ सुस्वागतम् ॥

# नव्या
# मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी
# 'रामटेक'वर ही गर्दी









कोण


कशासाठी

आला होता, येत होता

कुणास ठाऊक.



................ मोटारींचा ताफाही लगेच 'रामटेक'कडे वळला.



# हरियाना

## पुनः दुसरे जबलपूर

वा. दा. रानडे

जबलपूरमागोमाग हरियानातील तीन विधानसभा पोटनिवडणुकांनी सत्तारूढ काँग्रेसला पराभवाचा आणखी एक हादरा दिला. 'हरियानात जबलपूरची पुनरावृत्ती मी होऊ देणार नाही,' अशी भाषा मुख्यमंत्री बन्सीलाल बोलत होते. पण जनतेत काँग्रेसचे खरे स्थान काय आहे, हे या निकालांनी दाखवून दिले. काँग्रेसने तीनपैकी फक्त एकच जागा जिंकली. दोन अपक्ष उमेदवारांना मिळाल्या. १९७२ च्या निवडणुकातसुद्धा काँग्रेसला या तीन जागांपैकी फक्त एकच मिळाली होती व दोन जागांवर अपक्ष उमेदवार निवडून आले होते. म्हणजे १९७२ च्या तुलनेने या तीन जागांच्या निकालाने काँग्रेसचे बळ वाढलेही नाही आणि कमीही झाले नाही. विधिमंडळातील काँग्रेसच्या बळात त्यामुळे काहीही फरक पडलेला नाही. मग काँग्रेसला पराभवाचा हादरा बसला असे तुम्ही कसे म्हणता? असा वरवर बिनतोड वाटणारा युक्तिवाद काँग्रेस गोटातून केला जात आहे. पण तिन्ही जागा जिंकण्यासाठी काँग्रेसने शिकस्तीचे प्रयत्न केले असता तिला फक्त एकच जागा मिळते, हा उघड उघड पराभव आहे.

१९६७ पासूनच्या चार निवडणुकांचा एकत्र विचार केला तरी हा पराभव फारच जाणवतो. रोरी, मेहम आणि नुह या तीन मतदारसंघांत पोटनिवडणुका झाल्या. त्यांपैकी रोरी हा काँग्रेसचा बालेकिल्ला. १९६७, १९६८ व १९७२ या तिन्ही निवडणुकांत तेथे सतत काँग्रेस उमेदवार निवडून आलेला आहे. १९६७ मध्ये काँग्रेसने ही जागा ३१७२ मतांनी जिंकली होती. काँग्रेसला १८४३२ म्हणजे ४३.५१ टक्के मते मिळाली होती. १९६८ मध्ये काँग्रेसने ही जागा टिकविली खरी, पण त्यांच्या उमेदवारास १५६६२ म्हणजे १९६७ पेक्षा कमी मते मिळाली. काँग्रेसच्या मतांचे प्रमाण ४३.५१ टक्क्यांवरून ३९ टक्क्यांपर्यंत घटले. १९७२ मध्ये मात्र काँग्रेसने नजीकच्या प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा पंधरा हजारांवर मते अधिक मिळवून ही जागा जिंकली होती. पण १९७५ मध्ये लोकमताचा लंबक पुन: दुसऱ्या बाजूला झुकला आणि १९७२ मध्ये जेवढा मोठा विजय काँग्रेसने मिळविला होता त्यापेक्षाही अधिक मोठा पराभव तिला यावेळी पत्करावा लागला. सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा दिलेले अपक्ष उमेदवार देवीलाल, काँग्रेस उमेदवारापेक्षा सोळा हजारांवर अधिक मते मिळवून निवडून आले.

रोरीची निवडणूक मुख्यमंत्री बन्सीलाल यांनी प्रतिष्ठेची मानली होती. विरोधी उमेदवार देवीलाल हे बन्सीलाल यांचे कट्टर प्रतिस्पर्धी. विधानसभेवर निवडून येण्याचे त्यांचे प्रयत्न गेल्या तिन्ही निवडणुकांत अयशस्वी झाले होते. यावेळीही त्यांना विधानसभेत प्रवेश करू द्यावयाचा नाही, असा निर्धार बन्सीलाल यांनी केला होता. एका निवडणूक प्रचारसभेत ते म्हणाले, 'देवीलाल यांना मी विधानसभेत प्रवेश करू देणार नाही. त्यांचा विजय होणार नाहीच, पण जरी ते निवडून आले तरी हरद्वारीलाल यांच्याप्रमाणे त्यांना विधानसभेतून बडतर्फ करण्यात येईल.' (हरद्वारीलाल यांनी मुख्यमंत्री बन्सीलाल यांच्यावर काही आरोप करणारे पुस्तक लिहिले म्हणून त्यांना विधानसभेतून बडतर्फ करण्याचा ठराव बन्सीलाल यांनी विधानसभेत सत्तारूढ पक्षाच्या बहुमताच्या जोरावर पास करून घेतला होता.) पण या धमकीवजा भाषणाचा उलटाच परिणाम झाला. अशा धमक्यांना आम्ही भीक घालीत नाही, असे मतदारांनी देवीलाल यांना मोठ्या बहुमताने निवडून देऊन दाखवून दिले.

मेहम मतदारसंघात १९६८ ची निवडणूक सोडली तर काँग्रेसचा नेहमीच पराभव होत आलेला आहे, तीच परंपरा यावेळी चालू राहिली. मेहम ज्या रोहटक जिल्ह्यात आहे तो जिल्हाच काँग्रेसविरोधी आहे. १९७२ च्या निवडणुकीत या जिल्ह्यातील मतदारांनी पंधरा काँग्रेस उमेदवारांना पराभूत केले होते. या मतदारसंघातील सर्व चार उमेदवार जाट होते, तेव्हा निवडणूक प्रचार मोहिमेस जातीय रंग देण्यास वाव नव्हता. 'तुम्ही विरोधी उमेदवार निवडून दिलात तरी तो पुढे काँग्रेसलाच मिळणार आहे. मग सरळ काँग्रेसलाच विजयी का करीत नाही?' असा प्रचार या मतदार संघात काँग्रेस नेत्यांनी केला होता. काँग्रेस उमेदवार मुख्यमंत्री बन्सीलाल यांचा नातलग होता. बन्सीलाल यांच्या राजवटीविरुद्ध जनतेत असंतोष तर आहेच, त्यात या प्रकारच्या प्रचाराने काँग्रेसला मदत होण्याऐवजी मतदार अधिकच काँग्रेसविरोधी झाले. संधिसाधू पक्षांतराला म्हणजेच आयाराम-गयारामांच्या साथीला सुरुवात हरियानामध्ये झाली आणि साथीची सर्वांत जास्त लागणही तेथेच झाली. पण अजूनही संधिसाधू पक्षांतराला आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाय योजण्याऐवजी पक्षाचे बळ वाढविण्यासाठी या तंत्राचा अवलंब करण्याचा विचार काँग्रेस नेत्यांनी सोडलेला नाही, हेच निवडणूक मोहिमेतील त्यांच्या भाषणावरून स्पष्ट झाले. मेहम मतदारसंघात विरोधी उमेदवाराने काँग्रेसचा चार हजारांवर मतांनी पराभव केला.

तिसरी नुहची जागा काँग्रेसने जिंकली. गेल्या चार निवडणुकांचे निकाल पाहिले तर काँग्रेसला तेथे यापूर्वी १९६८ मध्ये विजय मिळाला होता. १९६७ व १९७२ ची निवडणूक तिने गमावली होती. यावेळी सुद्धा विजयाची खात्री काँग्रेसला वाटत नव्हती. मतदार संघात मुस्लीम मतदार बहुसंख्य आहेत. काँग्रेसच्या स्थानिक मुस्लीम नेत्यात मतभेद होते. ते सांधले गेल्यानेच काँग्रेसला विजय मिळू शकला आणि तिन्ही पोटनिवडणुकात शंभर टक्के पराभव होण्याच्या नामुष्कीतून काँग्रेस बचावली. पण सार्वत्रिक निवडणुका लवकर घेतल्यास काँग्रेसला त्या जिंकणे किती कठीण जाणार आहे, याची चुणूक या निकालांनी दाखविली.

जबलपूरप्रमाणेच हरियानामध्येही विरोधी पक्षांच्या एकजुटीनेच त्यांचा विजय झाला, हे लक्षात घेतले पाहिजे. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन काँग्रेसविरुद्ध एकच उमेदवार जनता उमेदवार म्हणून उभा करावा, असे आवाहन जयप्रकाश नारायण यांनी काही महिन्यांपूर्वी केले होते. त्या भूमिकेनुसार जबलपूरची व आता हरियानाच्या निवड-

पृष्ठ २५ वर

# सो ल क ढी

## □ शिपाईगडी वसंतराव

वसंतराव नाईक (हो तेच ते १९ फेब्रुवारी १९७५ पर्यंत महाराष्ट्रराज्याचे मुख्यमंत्री असलेले, वसंतसेना ठेवणारे, पाईप आणि औत ओढणारे, स्वत: शिकार करणारे, दुबळ्यांचे कैवारी, दुर्जनांचे कळिकाळ वसंतराव फुलसिंग नाईक : C/o–केअरऑफ– इंदिरा गांधी–यशवंतराव चव्हाण : मुक्काम पोस्ट इंडिया दॅट इज भारत.) हे भारताचे एक थोर्थोर नेते होते. त्यांच्याबद्दल 'नेते होते' असे लिहिताना लेखणी खळखळ करते. खुद्द वसंतरावांना मात्र त्याचे काही वाटणार नाही : कारण ते तर नेहमीच, 'मी कॉंग्रेसचा सामान्य शिपाईगडी होतो, आहे आणि राहीन,' असे सांगत आलेले आहेत. वसंतराव नाईक अस्तंगत झाले म्हणून आता आम्ही त्यांच्याबद्दल भलेचांगले बोलतो आहोत, असे कृपया प्रिय वाचकांनी मानू नये. मला आणि महाराष्ट्राला उपचार म्हणूनसुद्धा खोटेपणा जमत नाही. मागे २५ ऑगस्ट १९७३ आणि २२ डिसेंबर १९७३ अशा 'माणूस'च्या दोन अंकांतून अनुक्रमे 'थोर्थोर वसंतराव नाईक' व 'प्रेषित वसंतराव नाईक' या सोलकढीव स्फुटातून मी वसंतरावांच्या क्याकमाल कर्तृत्वाचे मूल्यमापन केले होते. (ते वाचकांना स्मरत नसेलच.) त्या स्फुटांची वर दिलेली शीर्षके पाहा : म्हणजे माझ्या मूल्यमापनाचा ऐवज सहजी ध्यानात येईल.

वसंतराव नाईक जाणार–जाणार असे आम्ही बरेच दिवस ऐकत होतो. खरे असे आहे की बरेच दिवस वगैरे काही आम्ही ऐकत नव्हतो. वर्तमानपत्रात पक्की बातमी आली ती पाहून आम्ही यथास्थित आश्चर्यचकित झालो होतो. परंतु होऊन गेलेली कोणतीही महत्त्वपूर्ण घटना, आधी बरेच दिवस ऐकत राहायचे कर्णलाघव तिखटकान्या पत्रकारांना साधलेले असते. त्यांच्या झकासझोकात आम्हीसुद्धा लिहून गेलो : वसंतराव नाईक जाणार–जाणार असे आम्ही बरेच दिवस ऐकत होतो! इतर राज्यातल्यासारखा महाराष्ट्र राज्यातला मुख्यमंत्री असा सहज जात नाही. तशी परंपरा इथे अजून निर्माण व्हायची आहे. त्यामुळे मुख्यमंत्री गेल्यावरच तो 'गेला,' असे (किंवा तसे बरेच दिवस ऐकत होतो, असे) म्हणणे इथे मुत्सद्दीपणाचे ठरते.

असे म्हणतात की गेले काही दिवस वसंतराव नाईक पक्षपालकांच्या मर्जीतून उतरले होते. शेती हे महाराष्ट्राचे वैभव. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री व्हायचा रिवाज. पण हे वैभव किती फुसफोलकट आहे, हे पंतप्रधानांनी नुकतेच दाखवून देऊन हरितक्रांतिवाल्यांना गोरेमोरे केले होते. अलीकडच्या निवडणुकांत इथे कॉंग्रेसची धुद्धांदल झाली होती. सीमाप्रश्नाबाबतच्या डावपेचांनी नाईकांनी पक्षाची गोची केली होती. वर बोर्डीच्या शिबिरातले भाषण. एकूण स्थैर्य हीच प्रगती, असे मानता आले असते तर नेतृत्व बदलायची काही गरजच नव्हती. परंतु प्रगती हीच प्रगती हे ज्ञान नव्याने झाल्यामुळे नेतृत्वात असा तडकाफडकी बदल करण्यात येतो आहे. एकदा नेता बदलला म्हणजे सारेच पाहा कसे बदलून जाणार आहे. खुद्द वसंतरावांच्यावेळी नव्हते का असेच झाले? मग शंकररावांच्या वेळी का नाही तसे होणार?

वसंतरावांना शिपाईगड्याचा डगला चढवायचा आणि मुख्यमंत्रिपदावरून उतरवायचे एकदा ठरल्यावर इथे महाराष्ट्रात गोष्टी किती सहज समजुतीने झाल्या. स्वत:ला सोस नसतानासुद्धा हितचिंतकांच्या विनंतीला मान देण्यासाठी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री व्हायला तयार झाले. त्यामुळे पहिल्या वसंतरावांनंतर दुसरे वसंतराव गादीवर यावेत तितक्या नाइलाजाने ते मख्यमंत्री होत आहेत. वसंतदादा पाटलांनी दादापणाचा आग्रह धरला नाही. महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब सावंतांनी आपले अध्यक्षीय घोडे पुढे दामटले नाही. रफिक झकेरिया, यशवंतराव मोहिते, अब्दुल रहमान अंतुले, शरद पवार वगैरेंनी धाकटे राहायचा मोठेपणा दाखवला. मधुकरराव चौधरीगुरुजी काही बोलले नाहीत. रजनी पटेलना कोणालातरी मुख्यमंत्री करण्यात जी गंमत वाटते ती स्वत: मुख्यमंत्री होण्यात वाटत नाही.–अशा पृथक पृथक आणि सामुदायिक समजूतदारपणापुढे कोणाचेही आणि कशाचेही काहीच चालले नाही.

वसंतराव नाईकांवरच्या निरोपलेखात सर्वांनीच त्यांच्या सौजन्याचा आवर्जून उल्लेख केला आहे. कर्तृत्व हेच पुरुषाचे सौजन्य होय, असे मानणाऱ्या काही नाठाळांना मात्र वसंतरावांच्या सौजन्याचे काहीच वाटत नाही.

वसंतराव नाईक पुढे काय करणार, असा प्रश्न सध्या तुम्हाआम्हाला पडला आहे. वसंतरावांना मात्र तो पडलेला नाही. शिपाईगड्याला का कुठे प्रश्न पडतात?

## □ पी. जी. वुडहाऊस आणि मी

'सोलकढी' या 'माणूस'मधल्या माझ्या सदराबद्दल अनेक ठाम गैरसमज आहेत. त्यांपैकी एक ठाम गैरसमज असा की 'सोलकढी' हे अत्यंत गंभीर व भारदस्त सदर आहे. गंभीर सदर म्हणून मोठ्या आवडीने ते मननपूर्वक वाचणारे पुष्कळ वाचक आहेत. 'साप्ताहिक माणूस'मध्ये प्रसिद्ध होणारे काही अगंभीर आणि अभारदस्त असू शकेल अशी कल्पना करणे या मंडळींना जड जात असावे. माझी मात्र ठाम समजूत अशी आहे की 'सोलकढी' हे अत्यंत विनोदी सदर आहे; आणि आज माझी जी समजूत आहे तीच महाराष्ट्राची उद्याची व परवाची समजूत असेल, असा मला विश्वास आहे.


मी एवढा विनोदी कसा झालो, याचे मला कधी कधी आश्चर्यच वाटते. बहुतेक विनोदी

लेखकांच्या आज्यांजवळ मार्मिक विनोदबुद्धी असल्यामुळे त्यांना विनोदाचे बाळकडू मिळालेले असते, मला तसे बाळकडू मिळालेले नाही. (यावरून मला आज्याच नव्हत्या असा तर्क लॉजिक घेऊन इंटर आर्टस्‌ला बसणारी मुलेच तेवढी करतील अशी आशा आहे.) माझे मास्तर आणि प्राध्यापक खत्रूड होते—विनोदी नव्हते. माझे मित्र (पुढे 'मैत्रिणी' असेही पटकन लिहून जाणार होतो; पण आजकाल वाचक असे गंडत नाहीत, हे लक्षात घेऊन हात आवरला.) विनोदी नाहीत. (ते मला वेळोवेळी पैसे उसने देतात.) मी कोणा मोठ्या वा उपेक्षित विनोदी लेखकाच्या निकट सान्निध्यात आलेलो नसल्यामुळे त्याचेही नाव लावायची सोय मला नाही. हां, नाही म्हणायला मी मराठीतल्या थोर थोर विनोदी लेखकांचे लेखन हपापहौसेने वाचले आहे. पण त्यापासून काही शिकलो नाही. कारण मराठीतल्या लेखनापासून काही शिकता येते असे मला वाटत नाही. शिवाय विनोदी वाङ्‌मय हे दुय्यम दर्जाचे वाङ्‌मय असते, या गंगाधर गोपाळ गाडगीळ यांच्या सिद्धान्ताचा धाक मला बसला आहे.

अशा परिस्थितीत सापडलेले विनोदी लेखक इंग्रजीतले विपुल आणि विविध विनोदी लेखन वाचतवाचत विनोदी होऊन जातात, तिथेही आमची फंफरफटच. मला इंग्रजीतले विनोदी लेखन तसे समजत नाही. म्हणून पी. जी. वुडहाऊसच्या वाटेला मी कधी गेलोच नव्हतो. तो एक विलक्षण विनोदी लेखक आहे असे ऐकले होते. माझ्या काही मित्रमंडळींनी त्याची आवर्जून शिफारस केली होती. पण मी तसा पक्का आहे. लोकांनी हेकट म्हणण्याइतका मी खंबीर आहे. त्यामुळे मी वुडहाऊस वाचला नाही.

परवा पी. जी. वुडहाऊस मृत्यू पावल्यावर त्यांच्याबद्दल वर्तमानपत्रांतून जी उत्स्फूर्त हळहळ व्यक्त झालेली पाहिली तिने मात्र मी भारावून गेलो. पी. जी. वुडहाऊस यांची पुस्तके वाचायचा विनोदी संकल्प करून तो मी पार पाडणार आहे. मग कदाचित मी विनम्र ऐटीत म्हणू शकेन : मला वाटते, माझ्या विनोदावर सुप्रसिद्ध आंग्ल विनोदकार सर पी. जी. वुडहाऊस यांच्या विनोदी लेखनाचे संस्कार कळतनकळत झाले असावेत!

—अनंतराव



# प्रकरण सहा : स्वातंत्र्य धोक्यात आले

त्या शहरातील आमची स्वातंत्र्याची पहिली रात्र मला अजुनही स्पष्ट आठवते. अगदी कालच्या रात्रीइतकी. आम्ही त्या रात्री उत्साही, हसतमुख आणि समाधानी लोकांच्या गर्दीतून सगळीकडे फिरत राहिलो. खलाशांनी भरलेले बार आणि आपलं सावज हेरणाऱ्या तेथील अनेक मुली. पण त्यात ओंगळपणा मात्र अजिबात नव्हता, जसा आमच्या फ्रान्समध्ये पॅरिस, ला हावरी किंवा मार्सेलिसच्या भिकार वस्त्यांमधून दिसत असे. ते एक वेगळंच प्रकरण होतं. त्रिनिदादमधल्या बारमध्ये निरनिराळ्या रंगाच्या आणि वंशांच्या मुली धंदा करताना दिसत होत्या, पण त्यांच्यात भडकपणा किंवा गळ्यात पडण्याची प्रवृत्ति मात्र दिसत नव्हती. प्रत्येक मुलीच्या केसात निरनिराळ्या रंगांची फुले होती, ते प्रेमाचं बाह्य प्रतीक होतं; फुलांमध्ये स्त्रीविषयी आकर्षण निर्माण करण्याची शक्ति असते. त्यात धंदेवाईक किंवा गलिच्छ तर काहीच नाही. त्या धंद्यासाठी तिथे उभ्या आहेत असं वातावरण किंचितही निर्माण होत नव्हतं–त्यांचं हसतखेळत काम चालू होतं. आर्थिक प्राप्ति हे त्यांचं मुख्य उद्दिष्ट होतं असं कोणालाही वाटणं शक्यच नव्हतं.

मी आणि मॅच्युरेट एका बारमधून दुसऱ्या बारमध्ये असं बराच काळ भरकटत होतो. आम्हाला वेळाचं भान अजिबात राहिलं नाही. एका चौकात समोरच्या चर्चवरील घड्याळाकडे सहज लक्ष गेलं. दोन ? रात्रीचे दोन वाजले ? बापरे ! पळा, पळा. आता ताबडतोब परत फिरणं आवश्यक. आमचं थोडं चुकलंच म्हणायचं. थोडं का–बरंच चुकलं. मुक्ति फौजेच्या कॅप्टनला आता आमच्याबद्दल काय वाटत असेल ! आम्ही टॅक्सी करूनच तिथे गेलो. दोन डॉलर बिल भागवून आम्ही होस्टेलमध्ये शिरलो. आम्हाला अत्यंत शरम वाटत

# पॅपिलॉन



मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

ओहोटीला सुरुवात झाल्यावर पॅपिलॉनने नौका समुद्राकडे वळवली. पहिल्या पाच दिवसांच्या प्रवासात त्यांना विशेष त्रास झाला नाही, परंतु नंतर मात्र तुफान वादळाशी टक्कर देता देता सर्वजण थोडक्यात बचावले. हा वादळाचा पहिलाच अनुभव पॅपिलॉनला पुढे फार उपयुक्त ठरला. बारा दिवस झाल्यावर पहिला मुक्काम त्रिनिनादला पडला. किनाऱ्याजवळील श्री. बोव्हन कुटुंबात तिघांना आश्रय मिळाला आणि प्रेमही. बेकायदेशीरपणे त्रिनिनादमध्ये प्रवेश केल्याबद्दल त्यांना पोलीस चौकीत जाऊन जबाब देणं आवश्यक होतं, त्यासाठी ते त्रिनिनाद शहरात आले. मुक्तिफौजेच्या होस्टेलवर उतरण्याची सोय झाली. जोन्सचा पाय दुखावला असल्याने त्याला नर्सिंग होममध्ये दाखल करण्यात आलं. पॅपिलॉन आणि मॅच्युरेट या दोघांनी स्वातंत्र्याची पहिली रात्र मोठ्या आनंदात घालविली.

होती. एका निळ्या डोळ्यांच्या पंचविशीतल्या सुंदर तरुणीनं आमचं हॉलमध्ये हसतमुखानं स्वागत केलं. ती मुक्ति फौजेतील स्त्री-अधिकारी होती. आम्हाला परत यायला इतका उशीर होऊनही तिच्या चेहेऱ्यावर नापसंतीचं एकही चिन्ह दिसलं नाही. इंग्लिशमध्ये (आमच्या समजुतीप्रमाणे) दोनचार चांगली वाक्य बोलून तिनं आमच्या खोलीची किल्ली देऊन आम्हाला 'गुडनाईट' केलं. आम्ही बिछान्यावर आडवे झालो. सूटकेसमध्ये मला दोन पायजमे मिळाले होते. मी दिवा बंद करीत असताना मॅच्युरेट म्हणाला, 'मला वाटतं आपण ईश्वराचे आभार मानायला हवेत. इतक्या थोड्या काळात हे सारं त्यानं आपल्याला दिलं. तुला काय वाटतं, पपी ?'

'माझ्या वतीनं तूच त्याचे आभार मान–तो तुझा देव खरंच ग्रेट आहे. तुझं म्हणणं काही खोटं नाही, तो आपल्यावर खूपच उदार झालेला दिसतो. गुडनाईट !' असं म्हणून मी दिवा मालवला.

माझ्या डोक्यात विचारांचा कल्लोळ माजला होता. निरनिराळ्या भावना उफाळून येत होत्या. आजच्या रात्री मी माणुसकीमध्ये न्हाऊन निघालो होतो. माझं समाजाशी पुन्हा एकदा नातं जोडलं गेलं होतं–आणि सगळं अगदी अनपेक्षित घडल्यामुळे आता झोप येता येत नव्हती. मी डोळे मिटल्यावर ती सगळी दृष्ये, गोष्टी आणि भावना चित्ररूपानं माझ्यापुढे उभ्या राहिल्या. त्यांच्यात सुसंगती मात्र नव्हती. ती स्पष्ट आणि अचूक होती पण घटनांच्या क्रमाप्रमाणे नव्हती–कोर्टाची सुनावणी, कस्टडी, मग एकदम महारोगी, सेंट मार्टिन, तो जमादार, जीझस, वादळ...गेल्या वर्षात मी जे काही अनुभवलं ते सर्व काही नृत्य करीत एकदम हजर होण्याचा प्रयत्न करीत होतं. मी ती सारी चित्र बाजूला सारायचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ.

त्यातच भर म्हणून चित्रांच्या जोडीला निरनिराळे मिश्र आवाज कलकलाट करीत होते. होक्कोचं किंचाळणं, डुकरांचं ओरडणं, वाऱ्याचं घोंघावणं, लाटांचं तांडव, पुन्हा या सर्व आवाजांना आम्ही थोड्याच वेळापूर्वी बारमध्ये ऐकलेल्या व्हायोलिन्सचं पार्श्वसंगीत लाभलं होतं.

पहाटे पहाटे जरासा डोळा लागला. सकाळी दहाच्या सुमारास आमच्या दरवाज्यावर थाप पडली. श्री. बोव्हन हसत हसत आत आले. 'गुडमॉर्निंग, मित्रहो तुम्ही अजून लोळताय ? रात्री उशीरा परतला असणार. तुमचा वेळ कसा काय गेला ?'

'गुड मॉर्निंग. आम्हाला रात्री जरा उशीरच झाला. आम्ही दिलगीर आहोत.'

'अरेच्च्या. मी त्यासाठी नाही म्हणालो. रात्री तुम्हाला उशीर होणं स्वाभाविकच होतं. स्वातंत्र्याच्या पहिल्या रात्रीचा तुम्ही जास्तीत जास्त उपभोग घ्यायलाच हवा होता. बरं, आता आपल्याला पोलिस चौकीमध्ये जायचंय. या देशात तुम्ही बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याचं स्टेटमेंट तिथे द्यावं लागेल. ते काम उरकल्यावर आपण तुमच्या जखमी मित्राला भेटू. त्याच्या पायाचा आज सकाळीच एक्स-रे काढला आहे. आता नक्की काय झालंय ते कळेल.'

आम्ही आमचं झटपट आवरलं आणि खालच्या खोलीत आलो. तिथे कॅप्टनबरोबर श्री. बोव्हन वाट पाहात बसले होते.

'गुडमॉर्निंग, मित्रहो,' मोडक्या फ्रेंचमध्ये कॅप्टन म्हणाला. आम्हीही सर्वांना गुडमॉर्निंग केलं.

'तुम्हाला पोर्ट ऑफ स्पेन आवडलं का ?'

'खूपच. आम्हाला एक प्रकारची पर्वणीच वाटली.'

पट्कन कॉफी घेऊन आम्ही पोलीस चौकीकडे निघालो. ती अगदी जवळच असल्यामुळे चालतच गेलो. सर्व पोलिसांनी आमचं स्वागत केलं. आमच्याविषयी ते तसे निष्काळजीच दिसले. नंतर आम्ही सुपरिटेंडन्टच्या खोलीत प्रवेश केला. आम्हाला पाहून तो उभा राहिला. अर्धी चड्डी, खाकी शर्ट आणि टाय. गणवेशावर बरीच पदकं आणि बिल्ले. वय पन्नासच्या दरम्यान. तो फ्रेंचमधे बोलू लागला, 'गुडमार्निंग, बसा. तुमचा जबाब घेण्यापूर्वी मला तुमच्याशी थोडं बोलायचंय. तुमची वयं काय आहेत ?'

'सव्वीस आणि एकोणीस.'

'तुम्हाला कोणत्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली होती ?'

'मनुष्यवध.'

'किती वर्षं ?'

'जन्मठेप.'

'माझ्या हातून खून झाला होता', मॅच्युरेट म्हणाला, 'त्यावेळी मी सतरा वर्षांचा होतो.'

'सतराव्या वर्षी तू काय भलतंच केलंस,' तो अधिकारी म्हणाला, 'इंग्लंडमध्ये असतास आणि गुन्हा सिद्ध झाला असता तर तुला फासावर चढवलं असतं. असो. आम्हाला फ्रेंच जन्मठेपेवर टीका करायचं काही कारण नाही. फक्त एकच गोष्ट आम्हाला पटत नाही, गुन्हेगारांना फ्रेंच गियानाला पाठवणं. ती शिक्षा अमानुष आहे हे मान्य करायलाच हवं. पण दुर्दैवानं तुम्ही त्रिनिदादमध्ये राहू शकत नाही, किंवा इतर कुठल्याही ब्रिटिश बेटावरही नाही. ही गोष्ट पक्की ध्यानात ठेवा. तुम्हाला कोणत्याही सबबीवर इथे जास्त राहता येणार नाही—अगदी आजारपणाच्या सुद्धा. पोर्ट ऑफ स्पेन-मध्ये तुम्ही पंधरा ते अठरा दिवस आरामात राहू शकता. तुमची होडी सुस्थितीत आहे असं कळतं. मी ती इथल्या बंदरात आणवून घेणार आहे. त्यात काही दुरुस्ती आवश्यक असेल तर नेव्हीतील माणसं ती तुमच्यासाठी करून देतील. निघताना तुम्हाला आवश्यक सामुग्री देण्यात येईल. चांगलं होकायंत्र आणि नकाशासुद्धा.

'दक्षिण अमेरिकेतील देशात तुम्हाला आसरा मिळेल अशी आशा करू या. व्हेनेझुएला मात्र टाळा, कारण तिथे तुमच्याकडून रस्त्याचं काम करून घेऊन पुन्हा तुम्हाला फ्रेंच अधिकाऱ्यांच्या ताब्यात देतील. माणसाच्या हातून एकदा चूक झाली म्हणून तो आयुष्यातून उठला पाहिजे असं मला वाटत नाही. तुम्ही तरुण आणि सशक्त आहात. चेहेऱ्यावरून तुम्ही भले दिसता, त्यामुळे तुमच्या हातून काही गैरवर्तन घडेल असं मला तरी वाटत नाही. मी तुम्हाला जमेल तेवढी मदत करीनच. गुडलक. तुम्हाला कोणतीही अडचण आली तर या नंबरवर फोन करा. आम्ही फ्रेंचमध्ये उत्तर देऊ.'

त्यानं बेल वाजवली आणि एक साध्या वेषातील माणूस आत आला. आम्हाला दुसऱ्या एका मोठ्या खोलीत नेऊन त्यानं आमचा जबाब घेतला.

'तुम्ही त्रिनिदादला का आलात ?'

'आमची गेलेली शक्ती पुन्हा मिळवायला.'

'तुम्ही कुठून आलात ?'

'फ्रेंच गियाना.'

'पळ काढताना तुमच्या हातून काही गुन्हा घडला का ? कोणाचा खून किंवा शारिरिक दुखापत ?'

'आम्ही कोणालाही गंभीर दुखापत केली नाही.'

'हे तुम्हाला कसं कळलं ?'

'निघण्यापूर्वी आम्हाला ते समजलं.'

इतर काही प्रश्नोत्तरे झाल्यावर तो म्हणाला, 'सद्गृहस्थहो, इथे तुम्ही जास्तीत जास्त अठरा दिवस विश्रांती घेऊ शकता. त्या अवधीत तुम्ही पूर्ण स्वतंत्र आहात. तुमचं मुक्कामाचं ठिकाण बदललं तर फक्त आम्हाला कळवा. मी सार्जंट विली. हे माझं कार्ड. ऑफीस आणि घर असे दोन्ही फोन नंबर आहेत. जरूर पडली तर केव्हाही मला फोन करा. आम्ही तुमच्यावर टाकलेला विश्वास योग्यच आहे असं मला वाटतं. तुम्ही चांगलं वागाल याची मला खात्री आहे.'

त्यानंतर आम्ही नर्सिंग होमकडे रवाना झालो. आम्हाला पाहून जोन्सला अत्यानंद झाला. त्याला आम्ही आदल्या रात्रीचा वृत्तांत मात्र सांगितला नाही. फक्त आपल्याला कुठेही जाण्याचं स्वातंत्र्य आहे हे सांगितलं. तो चकितच झाला, 'आपल्यावर कोणाचीही नजर राहाणार नाही ?'

'छे, बिलकुल नाही.'

'अगदी विचित्रच आहे.'

बोव्हन डॉक्टरकडे जाऊन परत आले. 'काळजीचं काही कारण नाही. पायाचं हाड व्यवस्थित आहे. डॉक्टर फक्त प्लॅस्टर लावून त्याला लोखंडी सळई अडकवणार आहेत. त्यामुळे तुला थोडं चालता येईल. तुला इथे राहाणं आवडेल का मित्रांबरोबर ?'

'केव्हाही मित्रांबरोबरच'

'ठीक, उद्या तुला तिकडे जाता येईल.'

श्री. बोव्हन निघून गेले. आम्ही उरलेली सकाळ आणि दुपारचा थोडा वेळ जोन्सबरोबर घालवला. दुसऱ्या दिवशी आम्ही तिघंही पुन्हा होस्टेलवर एकत्र आलो. आम्ही खुष झालो होतो. दारं खिडक्या उघड्या टाकून आम्ही मजेत बसलो आणि डोक्यावरचे सगळे पंखे हवा थंड करण्यासाठी मोठे लावून ठेवले. नवीन कपड्यांमुळे आम्ही रुबाबदार दिसत होतो. एकमेकांचं कौतुक करण्यात आम्ही बराच वेळ घालवला. मागच्या गोष्टींकडे विषय वळू लागताच मी म्हणालो, 'आपण आता भूतकाळ विसरून जाऊ या. वर्तमान आणि भविष्य यावरच आपलं लक्ष केंद्रित करणं चांगलं. आपण पुढे कुठे जायचं ? कोलंबिया ? पनामा ? कुठे जाणं इष्ट आहे हे आपण बोव्हननाच विचारणं बरं.'

मी बोव्हन यांच्या ऑफिसात गेलो. ते तिथे नव्हतेच. तिथून मी त्यांच्या घरी फोन केला. त्यांच्या मुलीनं तो घेतला. काही सुखद शब्द बोलून तो म्हणाली, 'हेन्री महाशय, होस्टेलजवळच्या मासे-बाजारात सॅन फर्नान्दोला येण्यासाठी बसेस मिळतात. आजची दुपार तुम्ही आमच्याबरोबर का घालवत नाही ? इकडे जरूर जरूर या, मी तुमची वाट बघते.' आणि खरोखर पुन्हा त्यांच्या घरी आम्ही गेलो. आम्ही तिघंही तिथे अत्यंत आनंदात होतो; विशेषतः जोन्स. तिथे पुन्हा गेल्यावर त्यांचा चांगुलपणा आठवून आमचं अंतःकरण हेलावलं. दोघींनाही आमच्या भावना समजल्या असाव्यात, कारण त्या एकदमच म्हणाल्या, 'पुन्हा तुम्ही घरी आलात तर ! आता अगदी आरामात राहा.' त्या आम्हाला आमच्या नावानेच हाका मारू लागल्या.

श्रीमती आणि कु. बोव्हन, तुम्हाला ईश्वरानं अत्यंत दयाळू आणि उदार अंतःकरण दिलेलं आहे. त्यामुळे आम्ही आनंदात गुदमरून जात आहोत. लोकांना आनंद देण याखेरीज तुम्हाला दुसरी गोष्ट माहीत नसावी.

नकाशा टेबलावर ठेवून आम्ही त्यांचा सल्ला घेऊ लागलो. अंतर बरंच काटायचं होतं. सांता मार्ताला पोचण्यासाठी साडेसातशे मैल, ते कोलंबियामधील सर्वात जवळचं ठिकाण. कोस्टा रिका चौदाशे पन्नास मैल. तेवढ्यात श्री. बोव्हन घरी आले. 'मी सर्व वकिलातीमध्ये फोन केले. एक आनंदाची बातमी आहे–तुम्ही काही दिवस क्युराकाओमध्ये विश्रांती घेऊ शकता. कोलंबियामध्ये कैद्यांसाठी काही ठरलेले नियम नाहीत. त्यांच्या माहितीप्रमाणे अद्याप समुद्रातून कोणीही कोलंबियापर्यंत पोचू शकलेले नाहीत. पनामालाही नाही, किंवा, कुठल्याच ठिकाणी नाही.'

'मला एक सुरक्षित जागा माहीत आहे,' मार्गारेट–श्री. बोव्हन यांची कन्या–म्हणाली, 'पण ती खूप लांब आहे–कमीत कमी अठराशे मैल.

'कोणती ग ?' तिच्या वडिलांनी विचारलं.

'ब्रिटिश हॉन्डुरस. तिथला गव्हर्नर माझा गॉडफादर आहे.'

मी मित्रांकडे पाहून म्हणालो, 'फिर चलो ब्रिटिश हॉन्डुरस.' आम्ही प्रवासाचे तपशील तयार करू लागलो. पहिला टप्पा त्रिनिदाद ते क्युराकाओ-सहाशे पंचवीस मैल; दुसरा क्युराकाओ ते मार्गावरील



नकाशा टेबलावर ठेवून आम्ही त्यांचा सल्ला घेऊ लागलो

एखादे बेट. तिसऱ्या टप्प्यात ब्रिटिश हॉन्डुरस गाठायचं.

समुद्राच्या प्रवासात काय घडेल ते सांगता येणार नव्हतं. पोलिसांकडून मिळणाऱ्या साधनसामुग्रीशिवाय आम्ही आणखी काही डबे बरोबर घेण्याचं ठरवलं. मांस, भाज्या, जाम, मासे इ.... मार्गारेट म्हणाली, 'सुपर मार्केटच्या लोकांना ते पदार्थ तुम्हाला भेट म्हणून द्यायला आवडतील; आणि त्यांनी तसं नाहीच केलं तर मी आणि ममी तुमच्यासाठी विकत घेऊ.'

'तसलं काही नको बरं.'

'राहू दे, हेन्री.'

'अशक्य, आमच्याजवळ पुरेसे पैसे असल्यामुळे आम्ही तुम्हाला तसं करू देणार नाही.'

आमची नौका पोर्ट ऑफ स्पेनला हलवण्यात आली. रॉयल नेव्ही डॉकमध्ये ती ठेवली. आम्ही सॅन फर्नान्दोहून परत निघालो. समुद्रात शिरण्यापूर्वी पुन्हा भेट घेण्याचं आश्वासन बोव्हन कुटुंबाला दिलं.

पोर्ट ऑफ स्पेनमध्ये रोज संध्याकाळी आम्ही नेमानं फिरायला बाहेर पडत असू. जोन्स चौकाच्या मधोमध असलेल्या हिरवळीवरील बाकावर बसत असे. पाळीपाळीने मी आणि मॅच्युरेट त्याच्याजवळ थांबत असू. इथे येऊन दहा दिवस झाले. जोन्सला लोखंडी सळईमुळे फार त्रास न होता चालता येत होतं. ट्राममधून दुपारी किंवा रात्री आम्ही बंदरावर जायचो. आमच्या तिथे खूप ओळखी झाल्या. तिथला पोलीस आम्हाला सलाम करी. सर्वांना आम्ही कोण आहोत, कुठून आलो हे चांगलं ठाऊक झालं होतं. तरीही आमच्याशी कोणीही वाईट वागलं नाही. इतकंच नाही तर बारमध्ये आमच्याकडून इतरांपेक्षा पैसेही कमी घेत. अनेक खलाशी तिथे येत. आमच्याजवळ बसत आणि आमच्याबद्दल पूर्ण सहानुभूती दाखवत. त्यामुळे आम्हाला अर्थातच आनंद होई. ते सर्वजण आमच्या बाजूने आहेत याचं समाधान असे.

आमच्या नौकेला रंग देण्यात आला. तिची उंची सहा इंचांनी वाढवण्यात आली. खालचा कणा अधिक भक्कम करण्यात आला. नौकेला काहीच इजा पोचली नव्हती, ती पहिल्यासारखीच उत्तम

होती, फक्त आधीची डोलकाठी बदलून टाकली. दोन कॅनव्हसची चांगली शिडंही दिली. एका कॅप्टननं व्यवस्थित खुणा असलेलं होकायंत्र बसवलं. नकाशात पाहून अंदाजानं आपण कोठे आहोत हे कसं ओळखावं हे त्यानं समजावून सांगितलं.

'टारपोन' या शिकाऊ जहाजाच्या अधिकाऱ्याबरोबर कॅप्टननं माझी ओळख करून दिली. त्यानं दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता बंदरावर येण्याची मला विनंती केली. कशासाठी ते मात्र सांगितलं नाही. मी येण्याचं कबूल केलं. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळेला मी मॅच्युरेटसह तिथे हजर झालो. तो प्रसंग थोडक्यात सांगायचा तर–जहाजावरच्या विद्यार्थ्यांनी आणि इतर अधिकाऱ्यांनी आमचा सत्कारच केला. आम्ही नम्रपणे त्यांची मानवंदना स्वीकारली. कॅप्टननं इंग्रजीत काहीतरी सांगितलं. सर्व विद्यार्थ्यांनी आम्हाला सॅल्यूट ठोकला आणि तो समारंभ संपला. भर समुद्रात छोट्या होडीतून लांबचा प्रवास करण्याच्या धाडसाबद्दल आमचा सन्मान झाला होता. आम्ही त्याबद्दल त्यांचे आभार मानले. कॅप्टननं आम्हाला तीन काळ्या रंगाची वॉटरप्रूफ कापडं भेट दिली. ती पुढे गुंडाळण्यासाठी फारच उपयोगी पडली.

निघण्यापूर्वी दोन दिवस श्री. बोव्हन पोलीस अधिकाऱ्याचा एक निरोप घेऊन आले. त्याने आमच्याबरोबर आणखी तीन गुन्हेगारांना घेऊन जाण्याची विनंती केली होती. मागच्या आठवड्यात त्यांना अटक करण्यात आली. ते तिथे बेटावर उतरले होते. मला ती कल्पना आवडली नाही, पण आम्हाला तिथे इतकी चांगली वागणूक मिळाली होती, की नकार देणं जवळजवळ अशक्यच होतं. फक्त होकार देण्यापूर्वी एकदा त्या तिघांना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. मला नेण्यासाठी पोलिसांची गाडी आली. मी सरळ पोलीस अधिकाऱ्याकडे गेलो. सार्जंट विलीनं दुभाष्याचं काम केलं.

'हाऊ आर यू ?'

'उत्तम; आमच्यासाठी तुम्ही एक काम करू शकाल ?'

'आनंदानं, अर्थात शक्य असेल तर.'

'आमच्या तुरुंगात तीन फ्रेंच कैदी आहेत. त्यांना इथे सोडून त्यांचे मित्र पुढे व्हेनेझुएलाकडे निघून गेले असं त्यांचं म्हणणं आहे. आम्हाला वाटतं की नवी होडी मिळवण्यासाठी ही त्यांची युक्ती असावी. आम्हाला त्यांना बेटाबाहेर काढायचं आहे. खरं पाहिलं तर आम्ही त्यांना एखाद्या फ्रेंच जहाजावरील अधिकाऱ्यांच्या ताब्यात देऊ शकतो, पण तसं करणं ठीक होणार नाही.'

'तर मग मी शक्यतो त्यांना नेईनच, पण आधी मला त्यांना भेटायची इच्छा आहे. तीन अनोळखी लोकांना एकदम बरोबर नेणं तसं धोक्याचंच काम आहे; तुम्हीही ते मान्य करालच.'

'बरोबर आहे. विली, त्या तिघांना बाहेर काढायला सांग.'

मला आमच्याजवळ दुसरं कोणी नको होतं. मी सार्जंटला दूर जाण्याची विनंती केली.

'तुम्ही कोण आहात ?'

'गुन्हेगार, तू ?'

'गुन्हेगारच.'

'मग आम्ही तुला कसे ओळखत नाही ?'

'मी गेल्या खेपेला मार्टिनियरवरून आलो. तुम्ही ?'

'१९२९ मध्ये.'

'मी २७ मध्ये आलो,' तिसरा इसम म्हणाला.

'ऐका : सुपरिंटेंडन्टनं तुम्हाला आमच्याबरोबर नेण्याची विनंती केली आहे. आम्ही आधीच तिघेजण आहोत. आम्ही तुम्हाला नेलं नाही तर तो तुम्हाला पहिल्या फ्रेंच जहाजाच्या ताब्यात देणार आहे, कारण तुमच्यापैकी कोणीच होडी चालवू शकत नाही. यावर तुम्हाला काय म्हणायचंय् ?'

'आम्हाला काही कारणामुळे समुद्रातून जायचं नाही. तुमच्याबरोबर नेल्याचं नाटक करून तुम्ही या बेटाच्या टोकाला आम्हाला सोडून द्या आणि तुम्ही पुढे रवाना व्हा.'

'मला तसं करता येणार नाही.'

'का नाही ?'

'त्यांनी आम्हाला खूप चांगली वागणूक दिली आहे, त्याची परतफेड मी असल्या गैर कृत्यानं करणार नाही.'

'हे पहा, बंधो, उगीच साधू बनण्याचं नाटक कशाला करतोस ?'

'ते कसं काय ?'

'कारण तूसुद्धा गुन्हेगारच आहेस.'

'बरोबर. पण गुन्हेगारांचेही खूप प्रकार आहेत. तुमच्या आणि माझ्या स्वभावात किती अंतर आहे ते दिसतंच आहे. तुम्ही कशात मोडता यावर सगळं अवलंबून आहे.'

'म्हणजे आम्हाला फ्रेंच अधिकाऱ्यांच्या ताब्यात द्यावं असं तुला वाटतं तर ?'

'अजिबात नाही. पण क्युराकाओशिवाय मी तुम्हाला खाली उतरू देणार नाही.'

'पुन्हा पहिल्यापासून सगळं सुरू करायचं बळ आता माझ्यात राहिलं नाही.' त्यांच्यातला एकजण म्हणाला.

'माझं ऐका; आमची नौका आधी पाहा तरी. तुम्ही ज्यातून आलात ती कदाचित चांगली नसावी.'

'मान्य. आपण तिकडे जाऊ या.' राहिलेले दोघं म्हणाले.

थोड्याच वेळात सार्जंट विलीसह आम्ही सर्वजण बंदरावर गेलो. नौका दृष्टीस पडताच त्या तिघांच्या चेहऱ्यावर हसू फुटलं.

## पुन्हा प्रवासाला सुरुवात

दोन दिवसांनंतर आम्ही त्या तिघांसह त्रिनिदाद सोडलं. कसं काय देव जाणे, पण बारमधल्या दहा-बारा मुली मला भेटायला तिथे आल्या. सर्व बोव्हन कुटुंब आणि मुक्तिफौजेचा कॅप्टन हे तर होतेच. त्यातल्या एका मुलीनं माझं चुंबन घेतलेलं पाहून मार्गारेट हसली आणि मला म्हणाली, 'छान, हेन्री, इतक्यामध्ये सूत जमलंही ? खरंच तू फार लवकर आपला प्रभाव पाडतोस.'

'गुडबाय् ! गुडबाय् ! आमच्या अंतःकरणात तुम्हाला अढळ स्थान राहील–कोणीही ते बदलू शकणार नाही.'

दुपारी चार वाजता आम्ही निघालो. लवकरच बंदरापासून आम्ही दूर गेलो. आम्हाला अश्रू आवरणं अशक्य झालं होतं. जोवर शक्य होतं तोवर आम्ही किनाऱ्यावर आमच्यासाठी जमलेल्या आणि हातरुमाल हलवणाऱ्या मंडळींकडे एकटक पाहत राहिलो.

नौकेला अडकवलेली रस्सी सुटल्यानंतर आम्ही एका लाटेबरोबर पुढे सरकलो. आमच्या सफरीच्या अखेरपर्यंत अशाच अगणित लाटांना तोंड द्यायचं होतं.

आमच्याबरोबर दोन चाकू होते. माझ्याजवळ एक आणि दुसरा मॅच्युरेटकडे. जोन्सशेजारी एक कुऱ्हाड होती. इतर कोणाकडेही शस्त्र नसल्याची आम्हाला खात्री होती. नौकेमध्ये एका वेळी फक्त एकाच माणसानं झोपावं असं ठरलं. सूर्यास्ताच्या सुमारास शिकाऊ-जहाज आमच्याजवळ आलं आणि सुमारे अर्धा तास आमच्याबरोबर त्यानं प्रवास केला. नंतर मात्र ते मागे फिरले.

'तुझं नाव काय?'

'लेब्लॉन्ड.'

'किती साली गियानामध्ये आलास?

'२७'

'शिक्षा किती?'

'वीस वर्षं.'

'आणि तुझं काय?'

'कार्ग्यूरेट. १९२९ मध्ये मी आलो. शिक्षा पंधरा वर्षं.'

तिसरा आपण होऊन म्हणाला, 'मी पण १९२९ मध्येच तुरुंगात दाखल झालो. माझं नाव ड्यूफिल्स्.'

'तुम्ही कुठून पळ काढलात?'

'कॅस्केड नावाच्या कॅम्पमधून. तो सेंट लॉरेन्टपासून पन्नास मैलांवर आहे. आम्हाला बाहेर पडायला फारसे कष्ट पडले नाहीत–त्या कॅम्पवर भरपूर स्वातंत्र्य असतं. आम्ही पाचजण सरळ चालत निघून आलो–यापेक्षा सोपा मार्ग दुसरा नसेल.'

'पाचजण? मग इतर दोघं कुठं आहेत?'

क्षणभर विचित्र शांतता पसरली. जोन्स म्हणाला, 'गृहस्था, इथे सगळी चांगल्या स्वभावाची माणसं आहेत. शिवाय आपण आता एकत्र असल्यामुळे आम्हाला ती माहिती कळणं जरुरीचं आहे, तेव्हा काय ते सांगून टाक.'

'ठीक आहे, मी सगळं सांगूनच टाकतो,' कार्ग्यूरेट म्हणाला, 'निघताना आम्ही पाचजण होतो हे खरंच आहे. आता जे दोघंजण इथे नाहीत, ते पूर्वी कोळी होते. केन्स् त्यांचं गाव. सुटकेसाठी त्यांनी एक पैसुद्धा खर्च केली नाही. त्यांचं म्हणणं असं पडलं की होडीमधून सर्वांना सुखरूप नेण्याचं काम करणं हेच मुळी लाख मोलाचं होतं. तरीही हरकत नव्हती; परंतु निघाल्यावर आमच्या लक्षात आलं की त्या दोघांनाही समुद्राचं काडीइतकंही ज्ञान नाही. आम्ही साधारण वीस वेळा तरी बुडण्याच्या बेतात आलो होतो. शेवटी किनाऱ्या किनाऱ्यानं प्रवास करीत आम्ही कसेबसे त्रिनिदादपर्यंत येऊन पोचलो. जॉर्जटाऊन आणि त्रिनिदादच्यामध्ये मी त्यातल्या एकाला ठार केलं. त्याला सर्वांनी प्रमुख मानावं असा त्याचा आग्रह होता, पण त्याची मरायचीच लायकी होती. दुसऱ्यानं घाबरूनच समुद्रात उडी टाकली. मग आम्ही तिघांनी होडी त्यातल्या त्यात सावरली आणि इथपर्यंत येऊन पोचलो. होडीत अनेकवेळा पाणी शिरलं आणि सरतेशेवटी ती एका खडकावर आपटून फुटली–आम्ही त्यातून वाचलो हा चमत्कारच म्हणायचा. मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगतो की आत्ता मी जे सांगितलं, त्यातलं अक्षर आणि अक्षर सत्य आहे.'

'हे सगळं खरं आहे,' इतर दोघं म्हणाले. 'अगदी असंच घडलं, त्या माणसाला मारावं यावर आम्हा तिघांचंही एकमत झालं होतं. तुला त्याबद्दल काय वाटतं, पॅपिलॉन?'

'मला काही सांगता येणार नाही.'

'पण आमच्या जागी तू असतास तर काय केलं असतंस?' पुन्हा एकानं विचारलं.

'मी परिस्थितीचा थोडा विचार केला असता. बरोबर काय आणि चूक काय हे ठरविण्यासाठी तसल्या परिस्थितीचा तुम्हाला पूर्वानुभव पाहिजे. त्याशिवाय एकदम काहीच ठरवता येणार नाही.'

जोन्स म्हणाला, 'मी तरी त्याला ठारच केलं असतं, कारण जिवावरच्या समुद्रप्रवासात तसल्या थापा सहन करणं कठीणच.'

'असो. आपण ते विसरून जाऊ या. तुम्ही मोठ्या संकटातून वारंवार वाचतात खरे. आत्तासुद्धा केवळ नाईलाज म्हणूनच तुम्ही आमच्याबरोबर आला आहात नाही का?'

'अगदी बरोबर,' तिघेही एकदम म्हणाले.

'तर मग आता नीट ऐका, यापुढे कोणत्याही परिस्थितीमध्ये इथे गोंधळ होता कामा नये. काहीही घडलं तरी कोणी घाबरल्याचं दिसता कामा नये. एखाद्याला भीती वाटलीच तरी त्यानं आपलं तोंड बंद ठेवावं. ही नौका सुंदर आहे, तिनं तसं पूर्वी सिद्ध केलेलं आहे. तिघंजण वाढल्यामुळे जरी ती थोडी जड झाली असली तरी तिची उंचीही सहा इंच वाढविण्यात आली आहे. त्या दृष्टीने आपल्याला काहीच धोका नाही.'

आम्ही धूम्रपान सुरू केलं; कॉफी करून घेतली. निघण्यापूर्वी आमचं भरगच्च जेवण झालं होतं म्हणून आम्ही निर्णय घेतला की दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत पुन्हा जेवायचं नाही.

आज ९ डिसेंबर १९३३. सेंट लॉरेंट येथील हॉस्पिटलमधून पळ काढून आज बेचाळीस दिवस झाले. आमच्या कंपनीचा हिशोबनीस जोन्स यानं ही बहुमोल माहिती पुरविली. सुरुवातीस निघताना बरोबर नव्हत्या अशा तीन बहुमोल गोष्टी आता माझ्याजवळ होत्या–त्रिनिदादमध्ये विकत घेतलेलं वॉटरप्रूफ घड्याळ, एक खरोखर उत्तम होकायंत्र आणि गॉगल्स. जोन्स आणि मॅच्युरेटनं डोक्यावर टोप्या चढवल्या होत्या.

डॉल्फिन माशांचे थवे आम्हाला दोनदा दिसले. याखेरीज वाटेत विशेष सांगण्यासारखं काही पहिल्या तीन दिवसात घडलं नाही. त्या माशामुळे आमचं रक्त थिजून गेलं; कारण त्यातल्या आठ जणांनी होडीशी खेळायला प्रारंभ केला. प्रथम नौकेच्या खालून जाऊन एकदम दुसऱ्या कडेला समोर येत–काही वेळा उसळी मारून ते आम्हाला स्पर्शही करून जात. त्यांच्या तुफान उड्यामुळे आम्ही हादरून गेलो. आमच्या वल्ह्यावरच ते हल्ला करीत. आमच्यापेक्षाही जलद गतीने ते पुढे सरकत. हा प्रकार तासन् तास चालू राहिला. अतिशय भयंकर खेळ. त्यात त्यांची थोडीही चूक झाली असती तर आम्ही

**योग्य काय अन् अयोग्य काय हे ठरविण्यासाठी तुम्हाला परिस्थितीचा पूर्वानुभव पाहिजे.**



पाच जण होडीतले पाणी भराभर बाहेर फेकीत होते

पालथेच होणार होतो. नवीन तीन माणसं गप्प बसून होती, पण तुम्ही त्यांचे प्रेतकळा आलेले चेहरे बघायला हवे होते !

चौथ्या दिवशी मध्यरात्री आम्हाला पुन्हा एका प्रचंड वादळानं गाठलं. ते खरंच घाबरवून सोडणारं होतं. त्यातला आणखी वाईट भाग म्हणजे लाटा काही एका दिशेनं येत नव्हत्या. बऱ्याच वेळा त्या एकमेकांवर आदळून फुटत होत्या. काही मोठ्या तर काही लहान, इतर झांडपणाऱ्या–काय करावं हे कळतच नव्हतं. जोन्स-खेरीज सर्वजण गप्प होते. तो मात्र वेळोवेळी धीर देत होता, ' हे पण संपेल, मित्रांनो ! आपण यातून सहज बाहेर पडू. ' किंवा ' आपल्या मागच्याकडे लक्ष ठेवा ! '

लाटांमध्ये विशेष गोष्ट अशी होती की त्या तीन–चतुर्थांश अंगावर येत–फेसाळत, गर्जना करीत. हे चांगलं होतं. त्यांचा वेग अजमावून मला नौकेला योग्य दिशा देण्यास भरपूर अवधी मिळत होता. पण प्रत्येक खेपेला असं जमेलच याची खात्री नव्हती. काही वेळा लाट माझ्या खांद्यावर येऊन आदळे. नौकेत भरपूर पाणी शिरलं होतं. बाकीचे पाचजण क्षणाचीही उसंत न घेता भांड्यांनी आत साठलेलं पाणी बाहेर फेकीत होते. तरीही, मी नौकेत एक चतुर्थांशहून जास्त पाणी शिरू दिलं नाही, त्यामुळे आम्ही बुडण्याची सुतराम शक्यता नव्हती. जवळ जवळ रात्रभर म्हणजे सात तास हा समारंभ चालू होता. पावसामुळे सकाळी आठपर्यंत आम्हाला सूर्याचं दर्शन घडलं नाही.

वादळानंतर सर्वशक्तिमान सूर्याच्या दर्शनामुळे माझ्यासह सर्वांना मनापासून आनंद झाला. इतर काहीही घेण्यापूर्वी आम्ही कॉफी करून घेतली. बिस्किटं होतीच. ती लोखंडासारखी टणक होती, पण कॉफीत बुडवून घेतल्यावर सुंदर लागत. रात्री वादळाशी टक्कर दिल्यामुळे मी पार गलितगात्र झालो होतो आणि अजून जोरदार वारे वाहात असूनही मी मॅच्युरेटला नौकेचा ताबा घ्यायला सांगितलं. मला थोडी तरी झोप हवी होती. जरा आडवं होऊन दहा मिनिटं होतात न होतात, तोच एका मोठ्या लाटेला चुकीच्या पद्धतीनं अंगावर घेतल्यामुळे नौका तीन चतुर्थांश पाण्यानं भरली. सगळ्या गोष्टी तरंगू लागल्या–भांडी, स्टोव्ह, ब्लँकेट्स, पदार्थांचा साठा. मी सुकाणू ताब्यात घेतलं, पुढची लाट अंगावर येण्याच्या आत मी नौका सावरली आणि त्याच लाटेच्या जोरामुळे आम्ही जवळजवळ दहा यार्ड पुढे ढकललो गेलो.

प्रत्येकाचं पाणी उपसण्याचं काम चालूच होतं. एका मोठ्या भांड्यातून मॅच्युरेट एका खेपेला साधारण तीन गॅलन पाणी बाहेर वेगानं फेकत होता. कोणीही आमचे पदार्थ वाचवण्याची चिंता करत नव्हता–सगळ्यांसमोर एक उद्दिष्ट होतं की, जड झालेली आमची नौका प्रथम रिकामी करणे, कारण खवळलेल्या समुद्रात तिचा जास्त वेळ टिकाव लागणं कठीण होतं. तीन नवे पाहुणे खूपच चांगली साथ देत होते, हे मला मान्य केलंच पाहिजे. दोन तासांनी सर्व काही शांत झालं. पण आम्ही आमची ब्लँकेट्स, स्टोव्ह, कोळसा, पॅराफिन आणि मुख्य म्हणजे पाण्याचं पीप या वस्तू गमावल्या.

दुपारी मी माझी विजार बदलण्याच्या विचारानं माझी छोटी सूटकेस शोधू लागलो. तीसुद्धा बिचारी पाण्यात फेकली गेली होती. नौकेच्या मधोमध रमच्या दोन बाटल्या मात्र सापडल्या. सगळी तंबाखू वाहून गेली आणि होती ती ओली चिंब झाली होती. मी म्हणालो, ' बंधूंनो, आपण आधी रम तर मारू या आणि मग इतर काही मिळतंय् का ते पाहू, शिल्लक असलेले डबे फोडू या. हा फळांचा रस चांगला आहे. पिण्यासारख्या गोष्टी घेण्यावर आपण नियंत्रण घालू. हे काही बिस्किटांचे डबे आहेत; त्यातला एक रिकामा करून आपण त्याचा स्टोव्ह करून या. इतर डब्यांचा पत्रा खाली नौकेत पसरून त्यावर खोक्याची लाकडं पेटवू. काही वेळापूर्वी आपलं धाबं दणाणलं होतं. पण आता धोका टळलेला आहे. आपल्याला आता नव्या चिंतेला तोंड द्यायचं आहे, पण त्यातून पार पडलंच पाहिजे. कोणीही इतरांना निराश करता कामा नये. या क्षणापासून कोणीही असं म्हणता कामा नये, ' मला तहान लागलीय्,' कोणीही म्हणता कामा नये, ' मला भूक लागलीय्,' आणि कोणीही असं म्हणता कामा नये, ' मला धूम्रपान करावंसं वाटतंय्. ' सगळ्यांना कळलं ? '

' मान्य, एकदम मान्य. '

सगळेजण चांगलं वागले आणि थोड्याच वेळात वाराही खाली आला. त्यामुळे आम्ही बीफपासून सूप बनवू शकलो. एक डबाभर सूप आणि त्यात बुडवून काही बिस्किटं, या दोन्ही गोष्टींमुळे सर्वांना तरतरी आली. आता उद्यापर्यंत चिंता नव्हती. प्रत्येकाच्या वाटचाला थोडा थोडा चहा येईल इतका चहा तयार केला. एका पेटीत सुदैवानं काही सिगारेट्सही सापडल्या. एका छोट्या पाकिटात आठ अशी एकूण चोवीस पाकिटं असल्याचं लक्षात आलं. इतर पाचजणांनी असं ठरवलं की फक्त मीच सिगारेट्स ओढाव्यात. कारण सर्वांच्या दृष्टीनं मी जागं राहाणं अत्यावश्यक होतं आणि त्यात कोणीही वाईट वाटून घ्यायचं कारण नव्हतं प्रवासात इतक्या चांगल्या समंजसपणामुळे पुढे कधीही गैरप्रकार घडला नाही.

आम्हाला निघून सहा दिवस लोटले होते आणि आजपर्यंत मला एक मिनिटभरही झोप लागली नव्हती. पण आज दुपारी मात्र मी झोपलो, कारण समुद्र अगदी काचेसारखा संथ होता. मी जवळ जवळ पाच तास मेल्यासारखा झोपलो. रात्री दहाच्या सुमारास मी जागा झालो. अद्याप सर्व काही शांत होतं. सर्वांनी माझ्याशिवाय आपलं खाणं आटोपलं होतं, अर्थात माझ्याकरता पुरेसं बाजूला ठेवून. मक्यापासून एक उत्कृष्ट शिजवलेला पदार्थ त्यांनी बनवला होता. जोडीला थोडं उकडलेलं मांस. अर्थात डब्यातील. ते सुंदर लागत होतं. चहा जवळजवळ थंड झाला होता. पण त्यामुळे काहीच बिघडलं नाही. मी धूम्रपान सुरू केलं आणि वारा सुरू होण्याची वाट पाहू लागलो.

ती चांदणी रात्र होती. तारे चमचमं करीत होते. ध्रुवाचा तारा अत्यंत तेजस्वी दिसत होता. तसंच मृग नक्षत्र आणि सप्तर्षीही स्पष्ट दिसत होते. ढग एकही नव्हता आणि पौर्णिमेचा चंद्र चांदण्यामध्ये शोभून दिसत होता. कार्ग्युरेटला हुडहुडी भरली होती कारण त्यानं जाकीट गमावलं होतं. मी त्याला माझं ऑईलस्किन (वॉटरप्रूफ कापड) वापरायला दिलं.

सातवा दिवस सुरू झाला, 'मित्रहो, आता क्युराकाओ फार दूर नसणार. मला जरा शंका आहे की मी उत्तरेकडे नौका जरा जास्त नेली आहे, त्यामुळे आता दुरुस्तीसाठी पश्चिमेकडे ती वळवावी लागणार आहे. आपल्याला लवकरच जमीन लागणं आवश्यक आहे, नाहीतर परिस्थिती गंभीर होईल. पिण्याचं पाणी अजिबात नाही. अशा स्थितीत जास्त काळ काढता येणार नाही.

'आम्ही ते सर्व तुझ्यावर सोपवलेलं आहे, पॅपिलॉन,' कार्ग्युरेट म्हणाला, 'तुला जे योग्य वाटत असेल तेच तू कर.'

'धन्यवाद.'

माझ्या ध्यानात आलं की मी जे बोललो ते योग्यच होतं. सर्व रात्रभर वारा अगदी पडलेलाच होता, पहाटे चारच्या सुमारास थोडी झुळूक आल्यामुळे आमची नौका पुढे जाऊ लागली. वाऱ्याचा वेग हळूहळू वाढत गेला आणि पुढच्या छत्तीस तासांत तो इतका वाढला की आम्ही भरपूर अंतर काटलं. लाटा मात्र अगदीच संथ होत्या, त्यांचा आम्हाला काहीच फायदा मिळाला नाही.

### धोक्याची चाहूल

प्रथम समुद्रपक्षांचा किलबिलाट ऐकू येऊ लागला, कारण अजूनही तसा अंधारच होता. नंतर मात्र पक्षी दिसू लागले. आमच्या नौकेवर ते घिरट्या घालू लागले. एक पक्षी डोलकाठीवर बसला. पक्षांचा खेळ जवळ जवळ तीन तासांच्यावर चालू होता, तोपर्यंत चांगलंच उजाडलं. तेजस्वी सूर्याचं आम्हाला दर्शन घडलं. पण समोर जमिनीचा मागमूस कुठेच लागत नव्हता. मग हे सगळे पक्षी आले तरी कोठून? आम्ही डोळे ताणताणून शोध घेत होतो, पण व्यर्थ; जमीन नाही ती नाहीच दिसली. सूर्यास्ताचे वेळीच चंद्र आकाशात उगवलेला दिसत होता, तो चंद्रही इतका प्रकाशमान होता की त्याचा प्रकाश माझ्या डोळ्यांना सहन झाला नाही. माझा गॉगल केव्हाच समुद्रार्पण झाला होता. एका सैतानी लाटेनं त्याला स्वाहा केलं होतं. आमच्या टोप्यांचीही तीच गत झाली. रात्री आठाच्या सुमारास मात्र क्षितिजावर एक काळी रेघ दिसू लागली.

'ती नक्कीच जमीन आहे,' सगळ्यांच्या आधी मी ओरडलो.

'होय, दिसते खरी.'

थोडक्यात, प्रत्येकानं मान्य केलं की समोर दिसणारा काळा पट्टा म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारची पण जमीनच आहे. सर्व रात्रभर त्या सावलीच्या दिशेनं मी आगेकूच केलं, आणि ती हळूहळू स्पष्ट दिसू लागली, अगदी जवळ. ढग नव्हते, जोरदार वारे आणि मोठ्या पण नियमित लाटा. आम्ही जास्तीत जास्त जलद जाण्याचा प्रयत्न करीत होतो. समोर दिसत होतं ते पहाड होते, खडक होते का किनारा हे अजून स्पष्ट झालं नव्हतं. जमिनीच्या खूप पलीकडे चंद्रप्रकाश पडला होता आणि त्याच्या सावलीमुळे अलीकडचं काहीच दिसत नव्हतं. किनारा साधारण अर्ध्या मैलावर आला आणि मी नांगर टाकला. वारा तुफान सुटला होता त्यामुळे होडी डळमळत होती. प्रचंड लाटांना तोंड देत होती. नौकेचं गरागरा फिरणं फारसं सुखद नव्हतं. आम्ही शीडं उतरवली आणि गुंडाळून ठेवली. तशा विचित्र पण त्यामानाने सुरक्षित स्थितीमध्ये आम्ही सकाळपर्यंत सहज वेळ काढला असता, पण आमचं दुर्दैव आड आलं. एकाएकी नांगर तळातून निसटला. नौका पुढे जाण्यासाठी तिला थोडीतरी मूळची गती असावी लागते, म्हणजे वल्हं मारायला जोर मिळतो. आम्ही छोटं शीड जरा उचललं आणि एकदम एक चमत्कारिक घटना घडली— नांगर पुन्हा पकड घेईना. इतरांनी त्याचा दोर ओढला. तो नांगराशिवाय वर आला. म्हणजे आम्ही नांगर गमावला होता. या सर्व परिस्थितीतही मी नौका थोपवण्याचा जिवापाड प्रयत्न करीतच होतो. जबरदस्त लाटांमुळे ती खडकावर आपटण्याची शक्यता होती. मी मोठं शीड पुन्हा ताणून उभारण्याचा निर्णय घेतला. त्याचा आम्हाला बराच फायदा झाला आणि नौकेची गती रोखली जाऊन ती दोन खडकांच्या मध्ये जाऊन घुसली. नौकेचा अर्थातच चक्काचूर झाला. आमच्यापैकी कोणीही आरडाओरड करून गोंधळ माजवला नाही, पण पुढच्याच मोठ्या लाटेबरोबर सर्वजण किनाऱ्यावर फेकले गेलो; आडवे तिडवे, पाण्यानं भिजून चिंब, बेफाम आदळलो पण जिवंत. आमच्या सगळ्यात प्लॅस्टरमध्ये पाय असलेल्या जोन्सची अनुकंपनीय स्थिती झाली. त्याच्या दंडाला, हाताला आणि तोंडाला खूपच खरचटलं. माझ्यासह इतरांना मात्र कुठे गुडघ्याला, मनगटाला किंवा कुठे हाताला थोडीशी दुखापत झाली. माझा कान एका खडकावर थोडा जोरातच आदळला, त्यामुळे त्यातून रक्त ठिबकू लागलं.

इतकं होऊनही, आम्ही लाटांच्या तडाख्यातून सुटून कोरड्या जमिनीवर जिवंत पोचलो हे काय कमी झालं. दिवस उगवल्यावर मी नौका सरळ करू लागलो— तिचे तुकडे तुकडे झाले होते. मी होकायंत्र ओढून काढण्यात यशस्वी झालो. जवळपास चिटपाखरूही दिसत नव्हतं. प्रकाशाची एक ओळ आम्हाला दिसली, पण नंतर लक्षात आलं की ती जागा धोक्याची आहे अशी कोळ्यांना सूचना मिळावी म्हणून ती ओळ होती. आम्ही चालत पुढे जाऊ लागलो, पण काहीच दिसत नव्हतं. फक्त निवडुंग, मोठी निवडुंगाची झाडं आणि माकडं. एका विहिरीपाशी पोचलो, अगदी थकून गेलो होतो, कारण जोन्सला उचलून घ्यावं लागलं. दोघे दोघे जण आपल्या हाताचा खुर्चीसारखा आकार करून त्याला नेत होतो. विहिरीजवळ मेंढ्या आणि गाढवांचे मृत सांगाडे पडले होते. विहीर कोरडी ठणठणीत होती, एकेकाळी वापरात असलेली पाण्याची मोट तशीच पडली होती. मनुष्यप्राणी एकही दिसत नव्हता, फक्त ते सांगाडे.

[ क्रमशः ]

---

'तुझ्याबरोबर हा दुसरा इसम कोण आहे?'

'एक फ्रेंच माणूसच.'

'तुमचा कुठे जायचा विचार आहे?'

'मासेमार रेड इंडियन लोकांच्या वस्तीकडे. माझ्या मित्राला त्या प्रदेशामधून व्हेनेझुएलाकडे जायचं आहे.'

'रेड इंडियन फार वाईट. तुमच्याजवळ काही शस्त्रही नाही.'

'हा घे.' असं म्हणून त्यानं मला पॉलिश केलेली शिंगाची मूठ असलेला एक खंजीर दिला.

## पॅपिलॉन पुन्हा अटकेत आणि...

पुढील अंकी

मध्यंतर

# सदर थांबविण्याविषयी थोडेसे

पुष्पा भावे

'माणूस'च्या दिवाळी अंकापूर्वीच मी 'मध्यंतर' हे सदर बंद करण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे दिवाळी अंकानंतरच्या अंकापासून 'मध्यंतर' हे सदर बंद झाले. हा निर्णय सर्वस्वी व्यक्तिगत स्वरुपाचा होता. त्यामुळे या निर्णयाविषयी काही लिहिण्यासाठी 'माणूस'चा स्तंभ खर्ची घालावा असे वाटले नाही. अर्थात त्यामुळे तर्कवितर्क खूप झाले. पण ते स्पष्टीकरण देऊनही झालेच असते. आज इतक्या महिन्यांनंतर हे स्पष्टीकरण देणे अपरिहार्य झाले आहे. कारण संपादकांच्या विनंतीवरून मी हा निर्णय काही काळ बदललेला आहे. तेव्हा 'मध्यंतर' हे सदर पुन्हा सुरू करण्यापूर्वी ते का बंद केले होते हे सांगते–

□ सतत स्फुट लेखन करण्याची संवय लेखणीला जडू नये म्हणून...

□ हाती रंगभूमीविषयक ग्रंथाचे काम आहे म्हणून...

□ मराठी नाट्यवर्तुळात जे काही घडते ते इतके विशिष्ट प्रकारचे असते की त्याविषयीच्या एकाच माणसाच्या प्रतिक्रियांना ताजेपणा राहात नाही म्हणून...

□ एका गंभीर साप्ताहिकातील स्तंभ नव्या लेखणीला मोकळा असावा म्हणून...

या सर्व कारणांसाठी सदर बंद करण्याचा निर्णय घेतला. त्याच सुमारास 'रूपवेध' या नाट्यसंस्थेचे सभासदत्व स्वीकारले, आणि 'मध्यंतर' सदर बंद झाले. तेव्हा 'माणूस'च्या संपादकांशी माझे मतभेद झाले वा 'रूपवेध' महत्त्वाची की अशा सदरातून होणारे प्रेक्षकशिक्षण अधिक महत्त्वाचे वगैरे सर्व प्रश्नांना वरील उत्तर पुरावे. हे सर्व मान्य करूनही मी आज सदर सुरू करीत आहे ते वरील कारणे नाहीशी झाली म्हणून नव्हे तर तात्पुरती मी संपादकांची गरज अधिक महत्त्वाची मानली आहे म्हणून !

## 'धाडसी धोंडूच्या धांदली'

### सत्यदेव दुबे यांची मराठी निर्मिती

सत्यदेव दुबे यांनी दिग्दर्शित केलेले मराठी नाटक यात मुंबईकरांना नवलाचे काहीच नाही. परंतु यावेळी आधी हिंदी व नंतर मराठी हा क्रम बदलला. स्वतंत्र मराठी नाटकाचा पहिला प्रयोग दुब्यांच्या दिग्दर्शनाखाली होण्याचा मला वाटते हा पहिलाच प्रसंग ! अच्युत वझे यांचे नाटक 'उन्मेष'च्या बाहेर जाण्याचाही हा पहिलाच प्रसंग !

हे नाटक मुळात 'सोफा कम बेड' या नावाने ओळखले जात असे. काही महिन्यांपूर्वी नाटककाराकडून मी प्रस्तुत नाट्यसंहितेचे वाचन ऐकले होते. स्त्रीपुरुष नात्याचे अनेक रंगरूप विविध शरीराकारांवर आरोपित करण्याचा यत्न नाटककाराने केला आहे. विशेषतः भारतीय परंपरेच्या संस्कारांपासून विलग न झालेले मन शारीर नात्याविषयी अपराधाची भावना बाळगते. या अपराधाच्या भावनेतूनच शारीर प्रेमाच्या कल्पना जिच्यावर आरोपित करायची ती प्रतिमा वेगळी आणि तारुण्यसुलभ तरल Romantic भावना जिच्यावर आरोपित करायची ती प्रतिमा वेगळी असा दुभंगलेपणा निर्माण होतो. हा दुभंगलेपणा त्या माणसाचे व्यक्तिमत्त्वच दुभंगून टाकतो. 'सोफा कम बेड' या संहितेतील 'ज्योमो' हा सुद्धा असाच दुभंगलेला आहे. या ज्योमोचा एकाकीपणा, मुष्टीयुद्धाच्या सरावासाठी अधांतरी लटकवलेल्या पिशवीशी त्याचा चाललेला संवाद–त्यांनी रंगवलेले वेगवेगळे ज्योमो, त्याच्या कविमनाने जिचा ध्यास घेतला आहे ती अनामिका, त्याच्या पुरुषी कल्पनाशक्तीने निर्माण केलेली मंदिरा नावाची मॉडेल–हळुहळू अनामिका आणि मंदिरा यांची वेगळी जगे एकमेकाला छेदीत जाणे हे सारे ज्या सहजतेने नाटककाराने व्यक्त केले होते, वास्तवाच्या आणि स्वप्नरंजनाच्या पातळ्या अशा बेमालूम मिसळल्या होत्या की नाट्यमाध्यमावरची त्याची पकड सहज कळावी. हे नाटक ऐकत असताना अनामिकाच्या चित्राशेजारी उभी असलेली 'आँटी' फार बटबटीत आणि म्हणून अप्रस्तुत वाटत होती. एका व्यक्तिमनाच्या शोकात्मिकेत विडंबनात्मक विनोदाला स्थान मिळावे असे वाटत नव्हते. आणि म्हणूनच संहिता ऐकत असताही नाट्यानुभवावर अन्याय झाला आहे असे सतत वाटत राहिले. कारण शोकात्म नाटकाला कडवट विनोद ( Black Humour ) अनुकूल ठरत असला तरी सामाजिक उपरोध–उपहास त्याच्या अंगी लागत नाही.

'धाडसी धोंडूच्या धांदली' असे बालनाट्याचा वा फार्सचा आभास निर्माण करणारे शीर्षक नाटककार व दिग्दर्शक यांनी का निवडले असावे कळत नाही. बहुतेक स्वप्नरंजनाची धिटाई, विस्कळीतपणा, संमिश्ररूप त्यांना या शीर्षकातून सुचवायचे असावे. सत्यदेव दुबे यांनी ज्योमोचे अनेकरूपी अस्तित्व तीन ज्योमो कल्पून उभे केले होते. विहंग नायक–दिलीप कुलकर्णी–संजय दामले या विभिन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या नटांची निवड करून दिग्दर्शकाने या तीन पात्रांचा दृश्य प्रतिमांसारखा वापर केला. या योजनेमुळे नाट्यानुभव प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणेही सुलभ झाले. आणि अनामिका–आँटी–मंदिरा या स्त्रीरूपत्रयीशी अन्वय जोडणेही शक्य झाले. 'अनामिके'ची भूमिका अनुया पालेकर यांनी केली. नाट्यसंहितेतील अनामिका आणि दिग्दर्शक व अभिनेत्री यांनी संकल्पिलेली अनामिका यात खूपच अंतर पडले होते. नाट्यसंहितेत अनामिका अलिप्त आहे. कारण तिच्या जगात ज्योमोला

अस्तित्वच नाही. ज्योमोच्या जगात मात्र जे काही निरागस आहे त्याची प्रतिमा म्हणजे अनामिका ! अनुया पालेकर यांनी उभी केलेली अनामिका पुरुषांना खेळवणारी, स्वतःच्या स्त्रीत्वगतसामर्थ्याची ओळख असणारी, बेरकी वाटते, तिचा खेळकरपणा अल्लड वाटत नाही. तिचे विभ्रमही सावज हेरून केलेले वाटतात. त्यामुळे Romantic कल्पनांचे प्रतीक म्हणून अनामिका उभी राहात नाही. मंदिराचे, जाणत्या स्त्रीचे, पुरुषांच्या नजरेचे लक्ष्य असणाऱ्या स्त्रीचे रूप सुनिला प्रधान यांनी ज्योमोच्या व्यक्तिमत्वाशी तोल राखून उभे केले. रेखा सबनीस यांची एक चांगली भूमिका बऱ्याच दिवसांनी पाहिली. ‘ वल्लभपूरच्या दंतकथे ’ तील प्रौढेनंतर प्रथमच ! रेखा सबनिसांनी व्यंगचित्रणात्मक भूमिकांकडे लक्ष पुरवावे इतके त्यांचे आँटीचे यश आश्वासक होते. विशेषतः त्यांच्या आंगिक अभिनयातील मुक्तपणा जाणवला. दिलीप कुलकर्णी यांचा चेहरा संवेदनाक्षम आहे, परंतु ही भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेशी नव्हती. विहंग नायकांच्या अलीकडे साचेबंद होऊ लागलेल्या बऱ्याच लकबी या भूमिकेत सौम्य झाल्यासारख्या वाटत होत्या.

संजय दामले, विहंग नायक व दिलीप कुलकर्णी या तिघांच्याही मनात ज्योमोचा कोणता चेहरा वा कोणते रूप आपण आहोत याविषयी संदेह असावा असे त्यांच्या अभिनयातून जाणवले.

‘ धाडसी धोंडूच्या धांदली ’ या नाटचप्रयोगाचा वेग इतका विलक्षण होता की संहितेतील नाजूक जागांना श्वास घ्यायला अवसरच मिळाला नाही. करुण अनुभव चलाख रचनेमध्ये गुदमरून गेला. फाशीची गती घेऊन आलेल्या या प्रयोगात–काळोखात, त्या लटकत्या पिशवीशी मुष्टियुद्ध खेळत ‘ ज्योमो ’ या व्यक्तिमत्वाचे गणित मांडू पाहाणारा एकाकी करुण ज्योमो हरवून गेला. एकदा दिग्दर्शकाच्या हातून नाटचानुभवाचे सूत्र सटकले की इतर सारे घटक नाटकापासून विलग होतात–बोजड सजावटी सारखे वाटतात. तसेच या नाटचप्रयोगातील ‘ स्लाइड्स ’च्या वापराचे झाले. केवळ अनुया पालेकरांच्या विविध मुद्रांनी काय साधले ? मंदिराच्या स्टुडियोतील काळोखात शरिराची जाणीव–अनामिकेच्या शुभ्र अशारीर रूपावर बाजारी मॉडेल्सची छाया पडणे–या दोन अनुभवाच्या पातळ्या मिसळून जाणे यास नाटचसंहितेत तर्कक्रम होता तो प्रयोगात हरवला.

सत्यदेव दुब्यांसारखा दिग्दर्शक या नाटचप्रयोगात गोंधळलेला–फसलेला वाटला. अलीकडेच ‘ और एक गार्बो ’ मध्येही असाच अनुभव आला होता. ‘ अनुष्ठान ’ सारखे अमूर्त नाटक सादर करणाऱ्या या कल्पक दिग्दर्शकाचे काय झाले ? मला वाटते इथे प्रश्न फारच गुंतागुंतीचा आहे. सत्यदेव दुबे यांचे आक्रमक व्यक्तिमत्व त्यांच्या नाटचप्रयोगाची शैली होऊ पहातेच, पण ते एलकुंचवारांच्या वा वझे यांच्या नाटचानुभवाला वाहक ठरेलच असे नाही.

एक सुवार्ता : अनेक महिने शासकीय दप्तरात असणाऱ्या ‘ वासनाकांड ’ या नाटचप्रयोगाविषयीच्या अपिलाचा निकाल ‘ रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षणमंडळा ’च्या विरुद्ध असून विनाअट ‘ वासनाकांड ’ या नाटचप्रयोगास मान्यता देणारा आहे. श्री. महेश एलकुंचवारांचे हे नाटक ज्या नियमावलीकडे बोट दाखवून बंद पाडण्यात आले होते, त्याच नियमावलीचा आधार घेऊन श्री. सुंदरराव सोळंके यांनी मुक्त केले आहे ! महाराष्ट्र शासनाचे या न्याय्य धोरणाबद्दल अभिनंदन ! श्री. एलकुंचवार, श्री. पालेकर व त्यांचे कायदेतज्ज्ञ सल्लागार या सर्वांचे अभिनंदन ! □

## हरियाना : पृष्ठ १३ वरून

णुका लढविल्या गेल्या. विरोधी पक्ष एकत्र आले तर ते काँग्रेसचा पराभव करू शकतात, हे या निकालांनी पुनः एकदा दाखवून दिले. बिहारनंतर त्याच स्वरूपाच्या आंदोलनासाठी जयप्रकाशांनी निवडलेले हरियाना हे दुसरे राज्य आहे. तेथील आंदोलनाला अजून जोर आलेला नाही व त्याच्या फारशा बातम्याही येत नाहीत. पण या पोटनिवडणुकांतील विरोधकांचा विजय म्हणजे जनमत काँग्रेसविरोधी असल्याचा एकप्रकारचा चाचणी कौलच म्हणता येईल.

विरोधकांनी एकजूट केल्यास काँग्रेसचा पराभव करून निवडून येणे अवघड नाही. निवडून आल्यानंतरही एकजूट कशी राखायची हा खरा अवघड प्रश्न आहे. निश्चित कार्यक्रमाच्या पायावर अशी एकजूट उभारावी लागेल. डाव्या-उजव्या पक्षांची सरमिसळ एकजूट फार काळ टिकणार नाही. तेव्हा झटपट सत्ता हाती घेणाऱ्याच्या मागे न लागता निश्चित कार्यक्रमाच्या पायावर एकजुटीचे प्रयत्न झाले पाहिजेत. □




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १-३-७५ ते ७-३-७५

### मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण यांच्या भावी कर्तबगारीचा शुभारंभ !

महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण यांच्या मुख्यमंत्रीपदाचा शुभारंभ मीन लग्नावर व मिथून चंद्रावर होत आहे ही महाराष्ट्राच्या व त्यांच्या स्वत:च्या दृष्टीनेदेखील एक महत्त्वपूर्ण घटना ठरावी. मिथून राशीत ध्येयवादी, शासनाची ओळख देणारा शनी व मीन राशीत निर्मळ सौजन्य देणारा गुरू अशा दोन पराक्रमी ग्रहांचे कृपाछत्र यावेळी त्यांच्यावर आहे. महाराष्ट्रातील मध्यमवर्गाच्या मरगळलेल्या मनाला व गरीब श्रमिकांना त्यांच्या धोरणविषयक सहानुभूतीचा प्रत्यय या वेळी येईल. गेल्याच आठवड्यात महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले आहे. एखाद्या महत्त्वपूर्ण निर्णयाने या आठवड्यात त्यांनी विरोधी पक्षाकडून अभिनंदन मिळविले तर कुणालाच आश्चर्य वाटू नये. मध्यवर्ती सरकार लोकांचा असंतोष कमी करण्याचा प्रयत्न करणार असून पंतप्रधान इंदिरा गांधी पुन्हा एकदा देशाच्या 'हीरो' ठराव्यात. त्यांच्या विश्वासातील एखादा महाराष्ट्रातील मंत्री केंद्रात घेण्याचा विचार त्या करू लागतील.

**मेष : पैशाचे मोठे पाठबळ**

या आठवड्यात तुमचा करताकरविता गुरू नसून रवी आहे. तुमच्या उत्कर्षाची सारी सूत्रे रवी या अंतरिक्षातील 'राजा'कडेच आहेत. गुरू बारावा असला तरी तो स्वत:च्या घरात आहे. तो तुमच्या उपयोगी फारसा पडला नाही तरी तुमचे अकल्याण मात्र करणार नाही. तुम्ही आजवर जी ईश्वरी उपासना करीत आहात त्याचे फळ तुम्हाला या वेळी मिळू शकेल. काही अद्‌भूत असा अनुभव यावा. रविवारी खर्चाच्या बाबतीत कोणतेही नवे धाडस करू नका. सोमवार ते गुरुवार नोकरीत अकल्पित घटना घडू शकतील. वरिष्ठाकडून मदत मिळेल. बेकारीची आलेली पाळी दूर होईल. तात्पुरती नोकरी कायम होईल. धंद्यातील थांबलेली प्रगती पुन्हा फॉर्मात येईल. प्रकाशनाशी संबंधीत असा एखादा नवा उद्योग शुक्रवारी सुरू करा. या वेळी विवाहाचा विचार मात्र लांबणीवर पडणार आहे. प्रेमात अपयश. महिलांचे सासरी व माहेरी मोठे कौतुक होईल. पैसा मिळेल. शुभराशी ४-९-१०

**वृषभ : मन गोंधळून जाईल**

केतू राशीत आहे तोपर्यंत तुमच्या भावनांचा कोंडमारा होणे, ओठाशी आलेला यशाचा पेला क्षणार्धात हिरावला जाणे, मानखंडना होणे या वा अशासारख्या घटना घडतच राहाणार आहेत. पण हा प्रतिकूल काळ दीर्घकाळ राहाणार नाही. अकल्पितपणे हे सावट निघून जाईल व प्रकाश तुमच्या जीवनाला उजळून टाकील. माणसाने नेहमीच आशावादी राहायला हवे. तुम्हालादेखील या परिस्थितीपासून दूर जाता येणार नाही. तूर्त नोकरीचाकरीवर लक्ष ठेवून राहा. आपल्या अवतीभोवती कोणकोणती कारस्थाने चालू आहेत, शत्रू कोण व मित्र कोण, मित्र शत्रूच्या गोटात दिसतात काय यावर बारकाईने लक्ष ठेवायला हवे. रागावून, संतापून नुकसानीला व आजाराला आमंत्रण देऊ नका. सार्वजनिक जीवनात मात्र–विशेष करून तुमच्या कलाक्षेत्रातील जीवनात प्रसन्नता येईल. प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. तुमच्या संसारात काही चांगल्या घटना घडतील. सोमवार ते बुधवार नव्या धंद्याच्या योजना आखा. महिलांनी नोकरीपेक्षा कलाक्षेत्रात या वेळी प्रयत्न करावा. शुभराशी ७-८-११

**मिथून : उत्साहवर्धक वातावरण**

मित्र हो, केतूचा त्रास आता लक्षातसुद्धा घेऊ नका. रवी तुम्हाला अनंतहस्ते देत आहे तर गुरू प्रतिष्ठा आणि परमेश्वरी कृपेची छत्रचामरे तुमच्यावर ढाळीत आहे. अपयशांचा बाऊ करू नका. निराशा झटकून टाका आणि नव्या उत्साहाने धाडशी पावले टाका. तुमच्यापैकी जे कोणी लेखक व नाटक व्यवसायी असतील त्यांनी आपल्या मनातील निश्चित कल्पना आखून त्याची कार्यवाही करावी. रविवार, बुधवार व गुरुवार हे या आठवड्यातील तीन दिवस तुमच्यादृष्टीने महत्त्वाचे आहेत पैशाच्या देण्यावरून निर्माण झालेले अप्रतिष्ठेचे संकट एका श्रीमंत व्यक्तीच्या औदार्यामुळे दूर होईल. तुम्ही जागेच्याबाबतीत जे प्रयत्न चालू ठेवले होते त्यात अपेक्षेपेक्षा मोठे यश मिळेल. ज्यांच्या विवाहाच्या प्रश्नात सतत अडथळे येत होते ते दूर होऊन यश दृष्टिपथात येईल. इंटरव्ह्यू होऊन लांबणीवर पडत असलेली नोकरी चालत तुमच्यापाशी येईल. हा सर्वच काळ उत्साहवर्धक आहे. महिलांनी मोकळ्या मनाने आपल्या आवडत्या उद्योगात लक्ष घालावे. शुभराशी ७-९-१०

**कर्क : आशा पालवतील**

गुरूचे भाग्यस्थानी आगमन हेच मुळी तुमच्या भाग्याच्या वैभवाची नांदी ठरावी. साडेसातीतच आता हा गुरू अनुकूल झाला आहे. तुमच्या अंत:करणातील सामर्थ्याची सुप्त शक्ती जागृत होईल. ही आगामी काळाची अनुकूल प्रसादचिन्हेच होत. आता अडचणीला थारा नाही. निराशेला जागा नाही. यावेळी तुमच्या उद्योग व्यवसायातील, तुमच्या नोकरी धंद्यातील प्रत्येक क्षेत्रात मनासारखे, नाविन्यपूर्ण असे घडू लागेल. सोमवारी अनपेक्षित एखादी महत्त्वाची व्यक्ती तुमच्या सहवासात येईल. बुधवारी राजकारणी लोकांचा तुम्हाला मदतीचा हात मिळेल. प्रतिष्ठा व मोठेपणा चालत येईल. गुरुवार व शुक्रवार योजलेल्या कामांना चालना मिळेल. आठवड्याच्या शेवटी आरोग्य सुधारल्याचे दिसू लागेल. नोकरीत अनपेक्षितपणे प्रमोशनचा योग येईल. उद्योगपतींना परदेशी प्रवासाचा योग आहे. विवाहेच्छू व्यक्तीचे विवाह यावेळी पार पडतील आणि ज्यांचे ठरत नव्हते त्यांचे ठरतील. घरातील जुने तंटे तडजोडीने मिटतील. महिलांच्या पुष्कळशा आशा आकांक्षा पुऱ्या होतील. शुभराशी ३-६-९

**सिंह : राजकारणात माघार**

आठवडा एरवी तसा प्रतिकूल नाही. काही वेळा यश तर काही वेळा माघार हे माणसाच्या जीवनात घडतच असते. त्यामुळे माघारीच्या वेळी खचून जाणे किंवा हातपाय गाळून स्वस्थ बसणे अयोग्य आहे. यावेळी तुमच्यावरील गुरुची कृपादृष्टी दुरावली आहे तर रवी व मंगळ यांनी तुमची कसोटी पाहण्याचे ठरवले आहे. केवळ भावनेच्या आहारी जाऊन यावेळी काही उपयोग होणार नाही. राजकारणात तुमचे विश्वासू साथीदार व हितचिंतक तुमच्याविरुद्ध कारवायांना जोर करणार आहेत. अर्थातच त्यांचे काही चालणार नाही. त्यांचे सारे बेत उधळले जातील. एवढी प्रतिकूलता सोडली तर एरवी हा आठवडा तसा काही अपयशाचा नाही. नोकरी–व्यवसायात नवे काही घडले नाही तरी त्रासात नवी भर पडणार नाही. नोकरीत बदलीची या आठवड्यात तरी शक्यता नाही. आहे ते काम मात्र दक्षतापूर्वक करा. नवा कोणताही धंदा जुळवण्याचा बेत लांबणीवर पडेल. रविवार, सामवार व गुरुवार त्यातल्या त्यात यश मिळेल. लॉटरीत अर्थ नाही. महिलांचे अनेक बाबतीत पतिराजाकडून लाड पुरवले जातील. शुभराशी ४-७-९

**कन्या : संसारात सुखवृद्धी**

सहावा रवी विरोधकांचे डावपेच व कारवाया उधळून लावणार आहे. ज्यांनी आजवर शत्रुत्व केले ते मित्रासारखे वागतील. हा सहावा रवी असा अनुकूल असला तरी तब्येत ठीक ठेवणार नाही. उष्णता, थंडी, मित्र यापासून त्रास होणार आहे. दवाखान्यासाठी पैसा खर्च करावा लागणार

आहे. मन अजून तरी काही काळ प्रसन्न राहाणे कठीण. तुमच्या यशाची व प्रगतीची सारी सूत्रे सध्या मंगळ व गुरूच्या हाती आहेत. नोकरीत यावेळी तुम्ही तुमच्या ज्या काही मागण्या असतील त्या वरिष्ठांकडे मांडून टाका. तुमच्या गुणांची कसोटी यशस्वी होईल. कामाचे चीज होईल. प्रवास अगर वाहन खरेदी यावेळी मुद्दाम करा. तुमचा एखादा दुय्यम व्यवसाय असेल तर तो प्रगतीकडे वाटचाल करील. संसारात मुलांचे कौतुक करण्याचे प्रसंग वारंवार उद्भवतील. मुलांच्या गुणांचे बाहेरच्या लोकांकडून कौतुक होईल. रविवार व बुधवार धावपळीत जाईल. पैसा कमी पडणार नाही. महिलांना घरात मनासारखे वागता येईल. शुभ राशी ७–१०–११.

**तूळ : संयमाने वागा**

शुक्र हा तुमच्या राशीचा स्वामी आहे. संगीत, साहित्य, नाट्य इत्यादी कला या शुक्र धर्माच्या असून त्याचा तुमच्या मनावर प्रभाव असतो. त्यामुळे तुम्ही भावविवश लवकर होता तसेच विकारवशताही उचल खाते. या आठवड्यात हेच घडणार आहे. तुमच्यावरील गुरूचे नियंत्रण दूर झाले आहे. त्यामुळे विवेकशक्ती क्षीण झाली आहे. प्रामुख्याने या राशीच्या प्रेमीजनांनी व नवविवाहित दांपत्यांनी बरेच संयमाने वागावे. मात्र हा आठवडा कलाक्षेत्रात तुम्हाला वाव देणारा आहे. तुमच्या मनातील अनेक इच्छांना अनुकूल प्रतिसाद मिळेल. सोमवारी साधुत्वाचा साक्षात्कार होईल. गुरुवारी सज्जन व वृद्ध व्यक्तीचा आशीर्वाद मिळेल. नोकरीच्या दृष्टीने विशेष बरे वाईट असे काही घडणार नाही. कामाचा ताण वाढला तरी त्रास नाही. एखादे मनात ठरवलेले काम अपेक्षेपेक्षा पूर्ण होईल. पैसा कमी पडणार नाही. गरज भागेल. घराच्या बाबतीत अनुकूल अनुभव येईल. प्लॉट अगर फ्लॅट विकत घेता येईल. महिलांना माहेरच्या प्रॉपर्टीचा योग आहे. शुभ राशी २–५–६.

**वृश्चिक : शैक्षणिककार्यात उन्नती**

गुरू या अंतरिक्षातील सात्त्विक, धार्मिक व श्रद्धेचे जतन करणाऱ्या ग्रहाचे पंचमस्थानी आगमन म्हणजे तुमच्या सत्तालोलुप, उग्र अशा स्वभावावर योग्य औषधच होय. तुम्ही स्वतःला नास्तिक म्हणवता. पण मित्र हो, मला मुद्दाम लिहायला समाधान वाटते की, या आठवड्यात तुमच्या जीवनात अशी एक महत्त्वपूर्ण घटना घडेल की तुमच्या मनाला धार्मिकतेचा, श्रद्धेचा स्पर्श झाल्याखेरीज राहाणार नाही. तुमच्यापैकी ज्यांच्या परीक्षा या आठवड्यात आहेत त्यांची बुद्धी चमकणार असून मोठे यश मिळणार आहे. तुम्ही वाङ्मयीन स्पर्धा असो वा शालेय स्पर्धा असो ती जिंकणार आहात. संसारात 'पाळणा' हालण्याची तुमची इच्छा यावेळी पुत्रजन्माचा आनंद देऊन पुरी होणार आहे. शनिवारी पैशाचे अति महत्त्वाचे काम होईल. लॉटरीत अर्थप्राप्तीचा योग आहे. बुधवारी पैसे हरवणार नाहीत याची काळजी घ्या. महिलांना यावेळी माहेरची भेट मिळेल वा माहेरची वारी घडेल. शुभ राशी ४–७–१२.

**धनू : चांगला अनुभव**

गुरू व मकर राशीत स्थानापन्न झालेला मंगळ हीच या वेळेच्या तुमच्या ग्रहराज्यातील कारभाराची स्थिती आहे. मुख्यमंत्री रवी हा तिसरा असून तुमचे कर्तृत्व तो विशाल करणार आहे. आजवर कोंडमारा झालेले मन आता उघडे व मोकळे होणार आहे. निरनिराळ्या क्षेत्रातील अनेकांबरोबर तुमचे संबंध येणार आहेत. नव्या नव्या क्षेत्रात तुमची कर्तबगारी गाजणार असून तुम्ही कौतुकाचा विषय व्हाल. उद्योगात, नव्या क्षेत्रात प्रवेश मिळेल. व्यापारी लोकांनी आपले उत्पादनक्षेत्र वाढवावे. त्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. तुमचे राजकारणात स्थान पक्के होईल. सत्तारूढ पक्षात तुम्ही असाल तर तुमच्या गळ्यात एखादे पद पडेल. नोकरीत असलेल्या लोकांची अनिश्चिती दूर होईल. अनेक जण नोकरीत कायम होतील. रविवार, बुधवार व शुक्रवार स्थावराच्या बाबतीत महत्त्वपूर्ण घटना घडतील. महिलांच्या बाबतीत आनंददायक अनुभव येईल. विवाहेच्छूंचे विवाह मात्र लांबणीवर पडतील. शुभराशी ६–७–१०

**मकर : नातेवाईकाकडून लाभ**

मित्र आणि नातेवाईक यांच्याकडून गेल्या काही वर्षांत तुमची अक्षम्य उपेक्षा झाली. नातेवाईक तुमच्याशी तुच्छतेने वागत आले तर मित्र व मैत्रिणी टर उडवू लागल्या. पण मित्रांनो गेल्याच पंधरवड्यात गुरू मीन या स्वतःच्या राशीत आला आणि त्याने ही परिस्थिती आता बदलून टाकायचे ठरवले आहे. याचाच अनुभव या आठवड्यात येणार आहे. अकस्मात तुमचा एखादा नातेवाईक तुमची भेट घेईल वा पत्र पाठवून तुमची माफी मागेल. आगामी वर्षात ही घटना म्हणजे बदल घडवायची मोठी संधी ठरेल. नोकरीत एका जबाबदारीच्या जागेवर तुमची नियुक्ती होऊन तुमचा आर्थिक फायदा होईल. प्रतिष्ठा वाढेल. तुम्ही फर्निचर वा इंजिनियरिंग उद्योगाचे कारखानदार असाल किंवा या उद्योगात तुमच्यापैकी कुणी असतील तर त्यांचे नशिब बहरणार आहे. राजकारणात तुमचे व्यक्तिमत्त्व प्रभावी ठरावे. तरुण मुलींनी वागण्यात मर्यादा ठेवावी. पदवीधर मुलींना नोकरी मिळेल. शुभराशी–७–११–१२

**कुंभ : राजकीय डावपेचात यश**

खरे म्हणजे शनीचे विविध रंगी गुणधर्म व कर्तृत्व हे ज्या प्रमाणे तुमचे वैशिष्टच आहे त्याचप्रमाणे धूर्त राजकीय डावपेच खेळणे ही देखील तुमची आवड आहे. तुमच्या चंद्राच्या सहवासात ठाण माडून बसलेला गुरू तुम्हाला कोणतेच धाडस करू देत नव्हता. पण आता हा गुरू बदलला असून तुमच्या गुणांना, कर्तबगारीला नवे क्षेत्र उपलब्ध होत आहे. श्रम, कल्पकता, योजकता याचे नवे पर्व सुरू होत असून तुम्ही 'उद्योगपती' झालात तर आश्चर्य वाटू नये. दत्तक वा वारस हक्काने हा लाभ तुम्हाला होण्याची बरीच शक्यता आहे. राजकारणात आजवर तुम्ही साधुत्वाच्या मार्गाने जात होतात. काही वेळा तो यशस्वी झाला पण अनेकदा तुमची संधी व हेतू बारगळले. यावेळी तुमची सुप्त महत्त्वाकांक्षा पुरी होणार आहे. राजकारणातील तुमच्या मित्राचे तुम्हाला सहकार्य मिळणार आहे. डावपेच त्यांच्याच सहाय्याने यशस्वी होणार आहेत. नोकरीत काम कमी होईल व तुमची उपेक्षा संपेल. मुलींना संगीत क्षेत्रात कीर्ती मिळेल तर महिलांना उद्योगव्यवसाय मिळेल. शुभराशी ६–७–१२

**मीन : धर्मश्रेष्ठांचा आशीर्वाद**

बारावा रवी तुमच्या आर्थिक जीवनात काही तरी उणीवा निर्माण करू पाहाणार आहे. मिळणारा पैसा मध्येच अडेल तर मोठेपणाच्या नादी लागून तुम्ही पैसे निरर्थक खर्च कराल. राजकारणात थोडी माघार घ्यावी लागेल. पण पैसा खर्च झाला तरी तो तुम्हाला मिळणार आहे. तुमची प्रतिष्ठा कमी होईल. प्रतिष्ठेला तडे जातील असे मात्र काही घडणार नाही. तुमच्या चंद्राच्या सान्निध्यात आलेला गुरू हीच खरे म्हणजे या वेळी तुमच्या धार्मिक जीवनाच्या प्रगतीची नांदी ठरावी. तुमच्या मनातील देवाधर्माबद्दलच्या निष्ठा व इच्छा पुऱ्या होतील. आणि साक्षात्कार घडेल. एखाद्या तीर्थक्षेत्रातील साधू तुम्हाला आशीर्वाद देईल. तुमच्यापैकी ज्यांना आध्यात्मिक दीक्षा हवीशी वाटते त्यांना अनुकूल असा आठवडा आहे. लेखक, शिक्षक, धर्मप्रचारक यांच्या गुणांचे कौतुक होईल. सोमवार, मंगळवार व शुक्रवार काही विशेश अनुभव येईल. महिलांना तीर्थयात्रा घडेल. विवाहेच्छू मुलींचे विवाह ठरतील. शुभराशी–६–१० ११ □ □

# अमिताभ बच्चन

## रजतपटावरचा एकमेव नवा नट आणि न-नायक

दर आठवड्याला एका चित्रपटाचं प्रकाशन हा हिंदी चित्रसृष्टीतल्या स्टारचा मानबिंदू आहे. कोणत्या चित्रपटात अमुक एक नटाची भूमिका कशी झाली आहे यापेक्षा त्याच्या हातातली चित्रपटांची संख्या त्याचं मोठेपण ठरवत असते. या मोजमापांनी आता अमिताभ बच्चन खराखुरा ' स्टार ' झाला आहे. ' जंजीर 'च्या झगझगीत यशानंतर ' नमकहराम ', ' अभिमान ', ' बेनाम ', ' मजबूर ', ' रोटी कपडा और मकान ' या क्रमानं त्याचं नाव सतत झळकतंच आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या ' दीवार 'नं अमिताभनं उत्कर्षबिंदू गाठला आहे म्हणायला हरकत नाही. ' दीवार 'च्या जाहिरात धुमधडाक्याचा केंद्रबिंदू अमिताभभोवतीच फिरतो आहे. (सलीम-जावेद जोडगोळी गृहीत धरूनच अर्थात.) ' डॅशिंग अमिताभ '...' टॉवरिंग परफॉरमन्स बाय अमिताभ ' असल्या निवडक विशेषणांनी ' दीवार 'च्या जाहिराती सजत आहेत. (आणि बिचाऱ्या शशी कपूरच्या वाट्याला नेहेमीप्रमाणे नावडत्या राजपुत्राची भूमिका यावी ना ?)

नाही म्हणायला अमिताभच्या ' स्टार ' पदात एक फरक आहे. ' दीवार ' पर्यंतच्या त्याच्या भूमिकांपर्यंत त्यानं अभिनयातलं दर्जेदार सातत्य टिकवून धरलं आहे. अगदी ' रोटी, कपडा और मकान 'सारख्या छोट्याशा भूमिकेत अमिताभ लक्षात राहतो, आणि दाद घेऊन जातो. याचं श्रेय अभिनेता अमिताभला आहेच; पण काकणभर जास्त श्रेय ' स्टार ' अमिताभला आहे. ' नमकहराम ' ते ' बेनाम 'पर्यंत संपादन केलेल्या त्याच्या अभिनयपुण्याला आहे.


अमिताभबद्दल बोलताना एका धारदार जिभेच्या समीक्षकानं म्हटलंय, ' ज्याच्याजवळ नटाचा चेहरा नाही आणि तरीही ज्याला वापरता येतो; ज्याच्याजवळ एकही देखणा अवयव नाही आणि तरीही त्यांचा प्रभावीपणे उपयोग करता येतो असा अमिताभ हिंदी रजतपटावरचा खराखुरा नवा नट आणि न-नायक आहे. ' अमिताभजवळ देखणा चेहेरा नसेल, हिंदी चित्रसृष्टीतल्या हीरोच्या उपाधी पूर्ण करणारी अन्य वैशिष्ट्यं नसतील—म्हणजे नाहीतच. ताडमाड उंची, गालफडं बसलेली, डोळ्यात थिजलेला भाव, अशा थकास अवतारातला अमिताभ पाचसहा वर्षांपूर्वी के. ए. अब्बासना भेटायला आला, तेव्हा ' सात हिंदुस्थान 'मधली कवीची भूमिकाच त्यांना अमिताभला द्यावीशी वाटावी याचं नवल नाही. लठ्ठ पगाराची नोकरी सोडून आलेल्या अमिताभकडे त्यावेळी एकच भांडवल होतं—त्याचा सुरेख आवाज आणि नवा नट ज्यावर जगतो ती चिवट आशा ! लोकांना थंड, थिजलेल्या वाटणाऱ्या डोळ्यांमधे अगणित स्वप्नं घेऊन अमिताभनं सकाळसंध्याकाळ स्टुडिओच्या प्रदक्षिणांना सुरुवात केली. त्याचं शिक्षण, त्याचं प्रतिष्ठित, सधन घराणं आणि त्याचं रूप—हे सगळं क्रमाक्रमानं त्याला प्रत्येक स्टुडिओपासून दूर घेत गेलं.

अखेर एक दिवशी हृषिकेश मुखर्जी अमिताभच्या नवसाला पावले. ' आनंद 'मधल्या डॉक्टर भास्करच्या भूमिकेसाठी त्यांनी त्याची निवड निश्चित केली. ' आनंद ' पडद्यावर आला. हृषिदांची निवड किती अचूक असते याचा पुन्हा प्रत्यय आला. ' आनंद 'च्या बरोबरीनं ' बाबूमोशाय ' डॉक्टर प्रेक्षकांच्या लक्षात राहिला. कसला तरी सल हृदयात घेऊन वावरणारा अमिताभचा चेहेरा त्यांना रुचला. एरवी थिजलेली वाटणारी, पण प्रक्षोभाच्या क्षणी आग ओकणारी अमिताभची नजर त्याच्या भरदार वाणीला कशी सुरेख साथ देते हे त्यांनी पाहिलं आणि अमिताभवर पसंतीचा शिक्का त्यांनी उठवला.

' आनंद 'च्या यशानं अमिताभची ओंजळ अनेक छोट्यामोठ्या करारांनी भरून टाकली. दिग्दर्शकांना अमिताभमधलं नटाचं सामर्थ्य कळून आलं होतं. ' आनंद 'च्या यशानं पडेल ठरलेल्या ' रेशमा और शेरा 'तल्या अमिताभच्या भूमिकेला प्रशंसा मिळवून दिली. त्यातली त्याची वाचाहीन तरुणाची भूमिका होती. शेराचा हा मुका भाऊ निष्ठेनं त्याची पाठराखण करतो आणि अखेर त्यापायीच बळी जातो. नुकतंच पडद्यावर पाऊल ठेवणाऱ्या नटाला ही भूमिका म्हणजे एक आव्हानच होतं. लांबीरुंदीनं किरकोळ पण पेलायला कठीण असलेलं ते आव्हान स्वीकारून अमिताभनं यशस्वी करून दाखवलं.

पारंपरिक नायकाचा चेहेरा नसलेला अमिताभ कोणत्याही भूमिकेत चपखल बसू शकत होता. अफाट लोकप्रियतेचं वलय नसलेला अमिताभ ' इमेज 'च्या कोंडीपासून दूर राहून प्रत्येक भूमिकेचा मुखवटा स्वतःच्या मुद्रेवर बेमालूम बसवून घेऊ शकत होता. ' परवाना 'मधला खलवृत्तीचा मत्सरी प्रेमिक, ' प्यारकी कहानी 'तला ध्येयवादी तरुण, ' बॉंबे टू गोवा 'तला चित्रविचित्र वेशभूषेचा ' मॉड ' सिनेप्रेमी तरुण, ' बंधे हाथ 'मधला लेखक आणि गुन्हेगार (दुहेरी भूमिका), ' संजोग 'मधला पानी की प्रेयसी या संघर्षात अडकलेला कारकून, ' सौदागर 'मधला भ्रमर वृत्तीचा स्वार्थी पती आणि प्रेमिक—या सगळ्या भूमिकांमधे अमिताभनं स्वतःला यशस्वीपणे झोकून दिलं. नाही म्हणायला ' रास्तेका पत्थर ' या एकाच सिनेमात अमिताभ अभिनयदृष्ट्या काहीसा उणा वाटला. ' अपार्टमेंट ' या गाजलेल्या इंग्रजी

[ पृष्ठ ३३ वर ]



# झिलमिल सितारे

अरूणा अंतरकर

डॅरिंग अमिताभ

—टॉवरिंग परफॉरमन्स बाय.....

**दीवार** च्या

जाहिराती अशा झळकत आहेत.......



# कसौटी



हेमाबरोबरचे
पहिले चित्र
तसे फ्लॉपच गेले ....




आता नवे येणारे
चित्र


# शोले

कसे आहे ते कळेलच

इथेही हे साहेब
एका रंगेल भूमिकेतच,
पेश होत आहेत.







ऑँधीच्या सेटवर
सुचित्रा सेनबरोबर दिग्दर्शक गुलजार.
'ममता' नंतरचे सुचित्रा सेनचे हे पहिलेच हिंदी चित्र

कानन‌बाला आपल्या चरित्रात लिहिते .......
सुचित्रा सेन ही पहिलीच बंगाली अभिनेत्री
जी निर्मात्यांविरूद्ध बंडाचा झेंडा घेवून उभी राहिली.

# मुख्यमंत्री नाईक यांची पदच्युती : पृष्ठ ८-अ वरून

बदलायचा असेल तर मधुकरराव चौधरींना नेता म्हणून पुढे आणण्याचा प्रयत्नही श्री. नाईक यांनी करून पाहिला. तो प्रयोगही नाईकांच्यावर उलटू लागला. लेवापाटीदार चौधरी, मुस्लीम अंतुले, झकेरिया व मागासलेले म्हणून रूपवते यांना जवळ करून मराठा व मराठेतर असे राजकारण नाईक खेळू लागले होते. याची वाच्यता बऱ्याच दिवसांनी सुरू झाली. दरम्यान मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नावर मराठवाडा पेटला. 'विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला शंकरराव चव्हाण व त्यांचे साथीदार यांचा पाठिंबा आहे. शंकरराव या आंदोलनाला पैसा पुरवतात' अशी टीका नाईक यांचे पाठीराखे बैठकीत करत होते. नाईकांच्याजवळ अंतुले फार गेल्याने आपले महत्त्व कमी होत आहे असे पाहून या आंदोलनाच्या निमित्ताने झकेरिया यांनी गट बदलण्यास सुरुवात केली. मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नावर विद्यार्थ्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करावी याला कल्याणराव पाटील यांचा विरोध होता. शंकररावांना विद्यार्थ्यांशी चर्चा करावी असे वाटत होते. अंतुले–नाईक जवळिकेमुळे रुष्ट झालेल्या झकेरियांनी गट बदलण्यासाठी ही संधी साधली आणि विद्यार्थ्यांशी चर्चा करावी असे म्हणून झकेरिया शंकररावांच्या बाजूला गेले !

१९७२ च्या निवडणुकीपूर्वी शंकररावांना भ्रष्टाचाराच्या आरोपात गुंतवण्याला काही आधार सापडला तर पाहावा म्हणून गृहखात्यामार्फत शंकररावांच्या मालमत्तेची चौकशी केली गेली होती, असे शंकररावच मला एकदा सांगत होते. पण त्यात भांडवल करता येण्यासारखा मालमसाला मिळाला नव्हता. त्यामुळे मराठवाड्यातील आंदोलन शंकररावांनी पेटवले आहे असा आरोप ठेवून शंकररावांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न कल्याणराव पाटलांच्यामार्फत वसंतराव करीत होते. याच सुमारास मराठा व मराठेतर राजकारण गती घेत होते. आपला वारस आपण ठरवू तो व्हावा या प्रयत्नात नाईक होते. याचाच अर्थ उघड होता. महाराष्ट्राचा वारस कोणी ठरवायचा? यशवंतरावांनी की वसंतरावांनी? यशवंतरावांच्या नेतृत्वाला हे आव्हान होते. मधुकरराव चौधरींना मुख्यमंत्री करावयाचे पण शंकररावांना ते मिळू द्यावयाचे नाही असा विडा नाईकांनी उचलला होता. आपल्यालाच नाईक आव्हान ठरत आहेत हे लक्षात घेऊन यशवंतरावांनी मराठवाडा आंदोलन प्रकरणी शंकरराव चव्हाण यांची बाजू उचलून धरली आणि मराठवाडा प्रश्न मिटविण्यासाठी वरिष्ठ पातळीवर झालेल्या बैठकीला 'शंकररावांना या आंदोलनाच्या निमित्ताने बदनाम केले जात आहे. वेळीच हे आंदोलन शमवता आले असते; पण मुद्दाम ते प्रयत्न केले नाहीत' असा निर्वाळा यशवंतराव चव्हाण यांनी दिला. पण शंकररावांचा आता यशवंतरावांवर भरोसा राहिला नव्हता. नाईक आपल्या नेतृत्वाला आव्हान देत आहेत या जाणिवेतून यशवंतरावांची भूमिका बदलत आहे असे मानले जात होते.


मराठा-मराठेतर राजकारण गती घेऊ लागले आणि आपला वारस म्हणून श्री. चौधरी यांचे नाव श्री. नाईक रेटू लागले तेव्हा यशवंतरावांनी शरद पवार, रवींद्र मोरे, शिवाजी पाटील यांच्यामार्फत नाईक यांच्याविरुद्ध जोरदार आघाडी उघडली. त्यामुळेच विधिमंडळ काँग्रेस पक्षाची खास बैठक बोलवावी ही सह्यांची मोहीम सुरू झाली. त्यावर दीडशेपर्यंत आमदारांनी सह्या केल्या होत्या. विधिमंडळ काँग्रेस पक्षाची कार्यकारिणी नियुक्त केलेली असू नये, ती निवडलेली असावी अशीही मागणी करून नेत्याने म्हणजे नाईकांनी नियुक्त केलेल्या कार्यकारिणीवर अविश्वास व्यक्त करून, पर्यायाने नाइकांवरच अविश्वास दाखविण्याचा पवित्रा घेतला गेला. या काळात मराठा जातीचे राजकारण चालले आहे काय याची चौकशी बाईंनी केली तेव्हा नाईक विरोधी गटाने बाळासाहेब खेरांपासून नाइकांपर्यंतचे मुख्यमंत्री पाहिले तर फक्त यशवंतरावच मराठा मुख्यमंत्री होते असे दाखवून दिले. आमचा जातीचा विचार नाही असे बाईंना पटवून देण्यात नाईकविरोधी गट यशस्वी ठरला. बाईंचे मत शंकररावांना मुख्यमंत्री करावे असे पुनः झाले होते. नाईकांनी कबूल करून शब्द पाळला नाही, तसेच केंद्राला चुकीची माहिती देणे, यामुळे श्रीमती गांधींच्या मनातून नाईक साफ उतरले होते. मधून मधून नाईकांना दिलेल्या शब्दाची आठवण करून देणारे निरोप पाठवले जात होते. यशवंतरावांचा शरद पवारांना आशीर्वाद आहे, त्यामुळे ते आपल्याविरुद्ध आघाडी उघडीत आहेत, हे वसंतरावांना समजण्यास वेळ लागला नाही. आपल्याविरुद्धचा दबाव कमी करण्यासाठी केंद्रात जाण्याची खटपट नाईक करू लागले. नाईकांना आपल्याविरुद्ध शह देण्यासाठी केंद्रात वापरले जाणार असे यशवंतरावांना वाटायचे ! महाराष्ट्रातील व्यक्ती केंद्रात येणे म्हणजे कालांतराने यशवंतरावांचे अवमूल्यन होणार आहे, म्हणून वसंतराव केंद्रात येऊ नयेत असा प्रयत्न करणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी नाईकांना मुख्यमंत्री ठेवणेच यशवंतरावांना हिताचे वाटू लागले. म्हणूनच साहेबांनी शरद पवारांमार्फत सुरू केलेली मोहीम बंद करण्यास सांगितले. मराठा-मराठेतर राजकारण खेळून नाईक आपला वारस स्वतःच ठरवू लागले तेव्हा यशवंतराव मराठवाडा आंदोलनाच्या निमित्ताने शंकररावांच्या बाजूला गेले आणि शरद पवारांना मोहीम उघडण्यास सांगितले गेले. पण वसंतरावांचा केंद्रात येण्याचा प्रयत्न सुरू होताच यशवंतरावांनी आपले हित सांभाळण्यासाठी वसंतरावच मुख्यमंत्री राहावेत अशी पलटी खाल्ली ! यशवंतराव अशा कोलांट उड्या मारू लागल्याने शंकरराव व त्यांना पाठिंबा देणारे इतर यांचा यशवंतरावांवर विश्वास राहिला नाही.

श्रीमती गांधींना नेतृत्वात बदल हवा होता, पण तो करण्याच्या सुमारास प्रथम गुजराथ, नंतर उत्तर प्रदेशची निवडणूक, राष्ट्रपतीपदाची निवडणूक आणि अलीकडे बिहारमधील परिस्थिती याचाही विचार करावा लागत होता. शिवाय यशवंतरावांनी बदलाचा विषय काढावा अशी श्रीमती गांधींची इच्छा असायची व यशवंतराव तर या

प्रश्नावर मूग गिळून गप्प बसलेले ! शंकरराव मुख्यमंत्री झाले तरी यशवंतराव मात्र समाधानी दिसत नाहीत. यशवंतरावांचा शंकररावांना विरोध आहे तो वाढावा आणि अशा विरोधात जाऊन शंकरराव यशवंतरावांच्या विरुद्ध उभे राहातात की नाही हे श्रीमती गांधींना तपासून पाहायचे असावे. यासाठीं ज्या ज्या वेळी नेतृत्व बदलाचा विषय श्रीमती गांधींजवळ काढला जाई त्या त्या वेळी त्या 'माझी तयारी आहे; पण यशवंतरावांकडून तो विषय काढला जावा' असे सुचवीत त्यामागे हे एक कारण होते आणि बदल मागणारी मंडळी ते साहेबांना सांगत, पण साहेब स्वतःहोऊन तो विषय पंतप्रधानांजवळ काढीत नसत ! शंकररावांचे महाराष्ट्रातील नेतृत्व आपल्याला कालांतराने महाग पडणार आहे याची अटकळ यशवंतरावांनी बांधली आहे. यशवंतराव व जगजीवनराम यांना श्रीमती गांधी यांचे राजकारण पसंत नाही. हे दोघेही जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनासंबंधी विरोधी बोलत नाहीत. आपलीही लोकप्रियता पूर्वीप्रमाणे राहिलेली नाही. अशा परिस्थितीत यशवंतरावांच्या संमतीशिवाय महाराष्ट्रात काही बदल घडवला तर महाराष्ट्रात त्याचे उलटे प्रतिसाद उमटवले जातील आणि आपल्याविरुद्ध दबा धरून बसलेल्या शक्ती उभ्या करण्याची संधी साधली जाईल असा धोका श्रीमती गांधींना वाटत असावा म्हणूनच त्या महाराष्ट्रातील बदलाची सूचना यशवंतरावांकडून यावी म्हणत, त्याचे असेही दुसरे कारण होते. महाराष्ट्रातील नेत्याजवळ यशवंतराव बदल झाला पाहिजे असे म्हणत, पण नेतेपदी कोण असावे हे बोलत नसत आणि श्रीमती गांधीजवळ नेतृत्व बदलाचा विषयही ते काढीत नव्हते.

### मिलीजुली लढाई

याचे परिणाम असे होत गेले, की तीन चार वेळा महाराष्ट्रातील नाईकविरोधी गटाचे लोक यशवंतरावांना न भेटता श्रीमती गांधीशी संपर्क साधून नेतृत्व बदलण्याचे विचार करून आले. एकदा श्रीमती गांधींना भेटायला काहीजण गेले तेव्हाच एक-दोघे यशवंतरावांनाही भेटले. त्यावेळी यशवंतरावांनी विदर्भाचा प्रश्न त्यांच्यापुढे उभा केला होता. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात एकोपा असा राहिला नव्हता. नाईकांनी प्रत्येक मंत्र्यावर सी. आय. डी. ठेवले होते. नेतृत्व बदलाच्या मागणीमागे मराठा जातीचे राजकारण नाही याची श्रीमती गांधी यांनी खात्री करून घेतली होती. त्याप्रमाणे नाईक गेल्या



ऑगस्टमध्ये जाणार असे नक्की ठरले. दरम्यान वसंतराव नाईक यांनी विदर्भाच्या राजकारणाचा धागा पकडला. त्यालाही कारण आहे. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेले त्यावेळी प्रथम नाइकांना मुख्यमंत्री करण्याचे यशवंतरावांनी ठरविले होते. पण कन्नमवारांनी आपल्याला मुख्यमंत्री करण्यासाठी हट्ट धरला. इतकेच नव्हे तर त्यासाठी स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीच्या दिशेने प्रयत्नही कन्नमवारांनी सुरू केले होते. ते टाळण्याकरता यशवंतरावांनी आपला विचार बदलून कन्नमवारांना मुख्यमंत्री केले असे विधानसभेचे सभापती श्री. शे. कृ. वानखेडे यांनीच सांगितले. ऑगस्टमध्ये नेतृत्व बदलणार असे ठरू लागले त्यावेळी विदर्भात स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनाचे नारे होऊ लागले होते हेही विसरता कामा नये ! स्वतंत्र विदर्भासाठी १५ ऑगस्टपासून प्रसंगी हिंसाचारी आंदोलन करण्याची धमकी खासदार जांबुवंतराव धोटे यांनी दिली होती. या ना त्या कारणामुळे ऑगस्टमध्ये नेतृत्वात बदल करण्याचा विचार मागे पडला आणि जांबुवंतरावांचे आंदोलनही मागे पडले. त्यानंतर सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये नाइकांना हलवण्याचे केंद्रात वारे सुरू झाले; त्यावेळीही श्री. धोटे यांनी प्रथम सप्टेंबरमध्ये व नंतर ऑक्टोबरमध्ये स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन करण्याची घोषणा केली होती. आणि नाइकांचे गमन या महिन्यात झाले नाही. तसेच श्री. धोटे यांचे आंदोलनही सुरू झाले नाही. हा विचित्र योगायोग तीन वेळा झाला होता. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात श्री. धोटे यांना मी या योगायोगासंबंधी विचारले त्यावेळी त्यांनी 'पंतप्रधान श्रीमती गांधी यांनीसुद्धा मला 'नाईक और आपकी मिली जुली लडाई है' असे म्हटले होते' असे सांगितले. कन्नमवारांनी मुख्यमंत्री होण्यासाठीं जे तंत्र वापरले तेच तंत्र नाईक मुख्यमंत्रीपद पुढे टिकविण्यासाठी वापरीत होते असा अनेक मंत्र्यांचाही संशय आहे. १५० आमदारांनी खास मागणी केलेल्या विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या बैठकीत विदर्भातील आमदार ए. पां. साळवे यांनी नाइकांवर ते विदर्भात स्वतंत्र विदर्भवादी व मुंबईत शिवसेनेसारख्या संकुचित प्रवृत्तींना खतपाणी घालीत असल्याचा आरोप केला होता हेही लक्षणीय आहे. यशवंतरावांना याच कारणासाठी बदल नको होता; असे यशवंतरावांचे समर्थकही म्हणतात ! श्रीमती गांधी यांनीही संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत नाइकांना बदलण्याचा निर्णय मागेच घेतला होता असे सांगितले आहे. याचा अर्थ ऑगस्टअखेरीस किंवा सप्टेंबरच्या सुरुवातीला नाईक ब्रिटनमध्ये हाय कमिशनर म्हणून जाणार असे वृत्त प्रसिद्ध झाले होते ते खरेच होते.

नाइकांना बदलण्याचा निर्णय मागेच घेतला होता; पण तो अंमलात आणला गेला नाही. त्यावेळी बिहारही पेटलेला होता त्याचाही परिणाम हा निर्णय लांबण्यास कारणीभूत झाला. शिवाय देशाची आर्थिक परिस्थिती पुढे अधिक बिकट होण्याची शक्यता असल्याने लोकसभेची निवडणूक लवकर घेण्याचे घाटत होते. अशा वेळी नेतृत्वात बदलाचा विचार थोडा बाजूला ठेवावा व लोकसभा निवडणुकीनंतर नेतृत्वात बदल करावा हा विचार सुरू झाला. त्यावेळी वसंतराव नाईक यांनी मंत्रिमंडळ वाढीसाठी प्रयत्न सुरू केले. वाढ करण्यास परवानगी मिळाली नाही तर आपण राजीनामा देऊ अशी सूचनाही नाईकांनी श्रीमती गांधींना केली. निवडणुकीचा

विचार करीत असताना अशी घटना घडणे पक्षाच्यादृष्टीने योग्य होणार नव्हते. त्यातच रजनी पटेल यांना नको असलेले श्री. अनंत नामजोशी यांना मंत्रिमंडळांतून काढण्याचे आश्वासन श्री. नाईक यांनी रजनी भाईंना दिले आणि मंत्रिमंडळ वाढीला रजनी पटेल यांच्यामार्फत परवानगी मिळवली. त्याचवेळी मंत्रिमंडळ वाढ व नेतृत्व बदल यांचा स्वतंत्र विचार करण्याचे ठरविले होते. लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका झाल्या तर त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी नेतृत्वात बदल करण्याचे तत्त्व मान्य झाले होते. मंत्रिमंडळ वाढीत नामजोशींना वगळले; पण मुंबईच्या मंत्र्यास उद्योग खात्यासारखे महत्त्वाचे खाते दिले गेले नाही ही खंत रजनी पटेलांना होती. अशा रीतीने नोव्हेंबरमध्ये वाढ करण्यात आली. विधानसभेचे हिवाळी अधिवेशन चालू झाले तेव्हा वाढीमुळे आमदारातही नाराजी पसरली होती.

## चढाई !

नाईक विरोधी गटाने नेतृत्वात बदलासाठी प्रयत्न चालूच ठेवले होते. ते यशस्वी होणार असे दिसू लागताच अब्दुल रहमान अंतुले यांनी शंकररावांना जाहीररित्या पाठिंबा देण्यास सुरुवात केली. आपला पाठिंबा शंकररावांनाच आहे असे झकेरिया अभिमानाने सांगू लागले. तरीही केंद्रात ठरवूनही दोन तीन वेळा नेतृत्वात बदल झाला नसल्याने नाईक विरोधी गटाने आक्रमक पवित्रा घेण्याचे नागपूरला ठरवले. प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा पी. के. सावंत वैतागून राजीनामा देणार होते. पण त्यांनी राजीनामा देतांना किमान संघर्ष करून द्यावा असे ठरवण्यात आले. २८ डिसेंबरला श्रीमती गांधी मुंबईत आल्या तेव्हा त्यांना नेतृत्वात बदल झालाच पाहिजे असे ठामपणे सांगण्यात आले होते. संघर्षाची तयारी म्हणून पी. के. सावंतांनी मुख्यमंत्री श्री. नाईक यांना पत्र पाठवून तुम्ही पक्षाला महत्त्व देण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगूस पक्षाला तुम्ही विचारीत नाही असे म्हटले होते. त्याला नाइकांनी उत्तर पाठवलेले नाही अशी तक्रार पी. के. करीत होते. संघर्ष छेडण्याची ही पूर्वतयारी चालली होती. संघटनेच्या पातळीवर हा प्रयत्न चालू असताना दुसरीकडे वसंतराव दादांनी आता नेतृत्वात बदल होणार नसेल तर आम्हाला मंत्रिमंडळांत राहाता येणार नाही असा पवित्रा घेण्यास सुरुवात केली. वसंतराव नाइकांची दादांनी भेट घेऊन 'तुम्ही अनेक वेळा कबूल करून दिलेल्या शब्दाप्रमाणे स्वतः होऊन जात नाही त्यामुळे तुमच्याबरोबर राहाता येणार नाही' असे स्पष्ट बजावले आणि राजीनामा देण्याची तयारी ठेवली होती.

श्रीमती गांधींना शंकरराव किंवा पी. कें. नी भेटून आता बदल झाला नाही तर आम्ही नाइकांशी सर्व पातळीवर असहकार करू असे सांगण्याचे नागपूर विधानसभा अधिवेशन काळात ठरले होते. त्याप्रमाणे पी. के. सावंत दिल्लीला जाऊन बाईंना सांगून आले. श्रीमती गांधींच्या मुंबई भेटीच्यावेळी शंकररावांनीही बाईंना याची कल्पना दिली होती.

याच सुमारास नगरपालिकांच्या निवडणुकात काँग्रेसचा पराभव झाला. त्याचे भांडवलही पी.के. सावंतांनी केले होते. नाईकांचे सत्तेतील नेतृत्व कायम ठेवले तर लोकसभा निवडणुकीवर परिणाम होईल असे सावंतांनी पंतप्रधानांना कळवले. ए. पां. साळवे, प्रभुगावकर आदी बऱ्याच आमदारांनीही अशाच प्रकारचा पत्रव्यवहार श्रीमती गांधींशी चालवला होता. दादांनी राजीनामा देण्याची केलेली तयारी, प्रदेश काँग्रेसमध्ये संघर्ष करण्याचा पवित्रा या योजनांची यशवंतरावांना कल्पनाही दिली गेली नव्हती. हा बंडाचा प्रकार नव्हे तर काय म्हणायचे ?

या पार्श्वभूमीवर बोर्डीचे शिबिर भरले. नरोरा शिबिराचा आधार घेऊन मार्गदर्शनासाठी बोर्डीचे शिबीर भरवले गेले. पण त्यासाठी काही केंद्रीय नेते येता कामा नयेत असे धोरण नाईक यांनी स्वीकारले. जयप्रकाशांच्या आंदोलनाने निर्माण झालेल्या वातावरणावर परिणामकारक उपाय योजण्याचा निर्धार अशा शिबिरात करण्याचे ठरले होते, पण नाईकांनी त्याविरुद्धच पावले टाकली. राज्यात असलेला भ्रष्टाचार कमी करण्यासाठी उपाययोजना केली जाईल असे सांगण्याऐवजी भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याऱ्या श्री. विठ्ठलराव गाडगिळासारख्यांना नाईकांनी पक्षातून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आणि ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्यांचे समर्थन नाईकांनी केले. नरोरा शिबिरातील निर्णय समजावून देण्याऐवजी केंद्रावर टीकेची झोड उठवली. यामुळे केंद्रीय नेत्यात नाईकांचे राजकारण श्रीमती गांधींच्या धोरणाशी जुळणारे नाही याची खात्री पटली. दरम्यान शंकरराव चव्हाणांनी हैदराबाद प्रदेश काँग्रेसचे त्यावेळचे सरचिटणीस श्री. पी. व्ही नरसिंगराव यांच्या मार्फतही प्रयत्न चालवले होते. नरसिंगराव व शंकरराव पूर्वी हैदराबाद




UH 744

काँग्रेसचे चिटणीस होते. नरसिंगरावांनी देवकांत बारूआंजवळ नेतृत्वात बदल होण्याची आवश्यकता प्रतिपादली होती. बारुआंनी ते मान्य केले आणि श्रीमती गांधींनी याखेपेस यशवंतरावांकडून हा विषय काढला जावा ही भूमिका सोडली आणि महाराष्ट्रातील नेत्यांना बोलावून घेण्यास बारुआंना सांगितले. यशवंतरावांना हे कळताच त्यांनीही बाईजवळ नेतृत्वात बदल करावा असे सुचविले.

लोकसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचा पराभव होत गेला. त्यामुळे मुदतपूर्व निवडणुकीचा विचारही सोडून दिला. आता लोकसभेची निवडणूक होणार नाही मग नेतृत्वात बदल करा अशी मागणी नाईकविरोधी गटाने केली. त्याप्रमाणे नाईकांची उचलबांगडी करण्याचे ठरले ! नवा नेता निवडण्यासाठी विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक बोलवा असा बारुआंनी नाईकांना निरोप देण्यास सांगितले. त्याप्रमाणे १५ फेब्रुवारीस पक्षाची बैठक बोलावण्यात बारुआंनी सांगितले आहे असा निरोप पी. के. सावंतांनी वसंतराव नाईकांना दिला होता. पण जोपर्यंत आपल्याला बारुआ सांगत नाही, तोपर्यंत मी बैठक बोलावणार नाही असे वसंतरावांनी सांगून वेळकाढू धोरण स्वीकारले. त्यामुळेच नाईकांना दिल्लीला बोलावले. नाईक दिल्लीला गेले. १६ फेब्रुवारीस पक्षाची बैठक बोलवण्याचे ठरले. पण ऐनवेळी पाच दिवसांच्या नोटिशीचे कारण पुढे करून बैठकीची वेळ नाईकांनी लांबणीवर टाकली. नेतेपदाच्या निवडीची बैठक लांबणीवर टाकून मधल्या काळात वसंतराव नाईकांनी झटपट ३०० फायलींचा निकाल लावला असे सांगण्यात येते.

नेतृत्वात बदल होण्याचा निर्णय झाला असताना तो का रेंगाळत होता याची ही कथा ! नेतृत्व बदलाच्या घडामोडीत यशवंतरावांची फरफट झालेली आहे आणि नाइलाजाने त्यांनी मान्यता दिली आहे. झालेला बदल आदळआपट न होता झाला आहे, या म्हणण्यालाही काही अर्थ नाही. १९७२ मध्ये नाईक मुख्यमंत्री झाले त्यावेळी यशवंतरावांना श्रीमती गांधींच्या निर्णयामागे जावे लागले. पार्लमेंटरी बोर्डाच्या जागा भरताना त्यांच्या मनाविरुद्ध जाऊन शंकररावांच्या मनाप्रमाणे जागा भराव्या लागल्या. वसंतराव केंद्रात येणार असे वाटू लागताच यशवंतराव शंकररावांना अनुकूल झाले. (मराठवाडा आंदोलनाच्यावेळी) वसंतराव आपला वारस ठरवू लागले तेव्हा शरद पवारांमार्फत नाईकांविरुद्ध मोहीम यशवंतरावांनी उघडली. वसंतरावांनी यशवंतरावांशी समझौता केला तेव्हा यशवंतराव पुनः वसंतरावांच्या बाजूने उभे राहिले आणि श्रीमती गांधींनी यशवंतरावांनी बदलाची सूचना करावी असे सुचवले तरी यशवंतराव बदलाची भाषा करत नव्हते. त्यांना डावलून नेतृत्वात बदल होण्यासाठी खटपटी सुरू झाल्या तेव्हा यशवंतराव बदलाला अनुकूल झाले. यशवंतरावांच्या फरफटीची दिशा अशी असताना यशवंतरावांनीच सर्व घडवून आणले अशी भलावण करणाऱ्यांच्या यशवंतनिष्ठेचे खरोखर कौतुकच केले पाहिजे !




नेतृत्वात बदल करून शंकररावांना दादा, मोहिते, पवार आणि अलीकडे झकेरिया व अंतुले यांनी पाठिंबा दिला आहे. तो प्रत्येकाने आपापले डावपेच साधण्यासाठी दिला आहे. आज जरी नसली तरी काही महिन्यांपूर्वी दादांनाही आपण मुख्यमंत्री व्हावे असे वाटत होते. तीच गोष्ट मोहिते व पवार यांच्या बाबतीत आहे. उद्याची स्वप्ने मोहिते व पवार पाहात आहेत. त्यासाठी प्रथम आज बदल घडला पाहिजे. तो घडवण्यासाठी मराठवाड्याला मुख्यमंत्रीपदाचा हक्क मिळाला पाहिजे हा आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. आपल्या पाठिंब्याने शंकरराव मुख्यमंत्री झाले की उद्या आपल्या हितासाठी हा पाठिंबा काढून घेतला की आपला मार्ग मोकळा होणार आहे, हे यामागे गणित आहे. विदर्भ–मराठवाड्याचा मुख्यमंत्री झाला. आता उर्वरित महाराष्ट्राचा तो हक्क आहे, हे सांगण्यासाठी मराठवाड्याची मागणी पूर्ण होणे जरूरीचे आहे. आपल्या पाठिंब्याने शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले की दोन–तीन वर्षांनी आपणच त्यांच्या विरोधात जायचे आणि त्यांना दूर करावयाचे हे पुढचे राजकारण अगदीच नाकारता येत नाही. अर्थात शंकरराव चव्हाणांचा कारभार कसा होतो यावर हे राजकारण अवलंबून आहे. शंकररावांच्या कारभाराची सुरुवातीची पावले भक्कम पडली तर या लोकांचे मनसुबे थोडे लांबणीवर पडतील ! शिवाय शंकररावांकडे नेतृत्व येण्यासाठी जी कारणे पुढे करण्यात आली आहेत त्यात नगरपालिका निवणुकीच्या निकालाचा आधार घेतला गेला आहे. उद्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अपेक्षेप्रमाणे यश प्राप्त झाले नाही तर निवडणुकीच्या पराभवाचा आधार शंकररावांच्याविरुद्ध मुख्यमंत्रीपदाची अपेक्षा असणारे घेण्याची शक्यताही दृष्टीआड करता येत नाही. त्यावेळी मराठवाड्यातील मंडळी मराठवाड्यालाही विदर्भाप्रमाणेच दोन टर्म्स मिळाल्या पाहिजेत अशी मागणी पुढे करतील ! शंकररावांनी कारभारावर पकड कायम ठेवली तरच भविष्य काळातील चित्र वेगळे दिसेल. नाही तर मात्र वरील घटना घडल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे लोकसभा व विधानसभा निवडणुका ही शंकरराव चव्हाणांपुढे असलेली मुख्य आव्हाने ठरणार आहेत. □ □

# अमिताभ बच्चन : पृष्ठ २८ वरून

चित्रपटावरून उचललेल्या त्या चित्रपटाचा नायकदेखील अमिताभनं ' अपार्टमेंट 'च्या जॅक लेमनच्या अभिनयशैलीतच घेतला होता. हा प्रयत्न सफल झाला नाही हे एका परीनं बरंच झालं.

' परवाना 'पासून तो ' बंधे हाथ 'पर्यंतचा काळ अमिताभच्या दृष्टीनं अंधारपर्व ठरेल. अमिताभ उत्कृष्ट अभिनेता आहे. असेल. पण त्याच्या नावाला ' ड्रॉ ' कुठं आहे ? तिकीट खिडकीवरचं अमिताभच्या नावाचं अवमूल्यन त्याला वितरकांच्या काळ्या यादीत बसवून गेलं. एकाएकी त्याच्या घरापुढचा रस्ता अरुंद झाला आणि निर्मात्यांच्या गाड्या तिथं थांबेनातशा झाल्या. ' पार्किंग 'चा प्रश्न मोठा बिकट होता ना ! असेल अमिताभकडे व्यक्तिमत्त्व. पण गोंडस रूप कुठं आहे ? त्यानं आपलं पुन्हा आपल्या उत्तर प्रदेशातल्या गावी जाऊन दूध वगैरे विकण्याचा धंदा करून पोट भरावं.

अमिताभला हे सल्ले नवीन नव्हते. चित्रसृष्टीत पाऊल ठेवल्यापासून, जगात विनामूल्य आणि हमखास मिळणारी एकमेव चीज म्हणजे सल्ला या वचनाचा अनुभव तो पदोपदी घेत होता. ' अरे बाबा, कशाला या फंदात पडतोस ? चांगली नोकरी आहे ती सांभाळ, ' या सल्ल्यापासूनच मुळी त्याची ' चंदेरी ' म्हणून गौरवतात ती वास्तविक खडकाळ वाटचाल सुरू झाली.

चित्रसृष्टी अमिताभच्या नावे आंघोळ करून टाकण्याच्या तयारीत असतानाच एक चमत्कार घडला. दरम्यान ' जंजीर ' पडद्यावर आला आणि अमिताभचा पुनर्जन्म घडला. देव आनंद, धर्मेंद्र, राजकुमार या तळपत्या तारांनी टाकून दिलेली उष्टी, शिळीपाकी भूमिका अमिताभच्या पदरी पडली होती. त्या कर्तव्यकठोर पोलीस इन्स्पेक्टरच्या भूमिकेला अमिताभने साफ नवी डूब देऊन कोंड्याचा मांडा करून दाखवला. पोरीबाळींच्या मागे गाणी म्हणत बागडत न फिरणारा हा इन्स्पेक्टर शंभर टक्के इन्स्पेक्टर वाटला. प्रेक्षकांनी त्याला कडकडून टाळी दिली. अमिताभच्या घरापुढे रस्तारुंदी झाली आहे, ही आनंदवार्ता आकस्मिकपणे कळल्यामुळे पुन्हा एकदा निर्मात्यांच्या गाड्या जुहूच्या सातव्या रस्त्याच्या दिशेनं धावू लागल्या. अमिताभचा चित्रपट विकत घेण्यासाठी वितरक कान टवकारून बसले.

' जंजीर 'नं अमिताभला दोन गोष्टी मिळवून दिल्या. एक : त्याचं हरवलेलं स्थान आणि दुसरी–' इमेज. ' घट्टमिटल्या ओठांचा, एरवी निश्चल, करारी मुद्रेनं वावरणारा पण ठिणगी पडताच पेट घेणारा, वाटेत आडवं येणाऱ्याशी निकराची झुंज देणारा, बाणेदार, निर्भीड नायक म्हणजे अमिताभ, हे समीकरण रूढ झालं. स्वतः अमिताभ हीच गुरुकिल्ली शोधण्यासाठी चाचपडत होता बहुधा. ' अभिमान 'च्या निमित्तानं त्यानं पुण्यात प्रेस–कॉन्फरन्स घेतली तेव्हाची गोष्ट. ' तुझ्या पुढच्या योजना काय म्हणून विचारा; तुझी महत्त्वाकांक्षा काय म्हणून पुसा; तुझ्या आत्तापर्यंतच्या भूमिकांमधल्या आवडत्या भूमिका कोणत्या म्हणून चौकशी करा; अमिताभ आंबट मुद्रेनं एकच पालुपद आळवायचा : ' इथं जे चालतं ते यशस्वी होतं. बाकी कशाला किंमत म्हणून नाही. ' आता वैयक्तिक आवडत्या भूमिकांचा नि यशापयशाचा काय संबंध ? पण अखेर यश हीच सर्वांना आवडणारी गोष्ट नाही काय ? अमिताभ त्या क्षणी एखाद्या ' हिट् 'च्या गरजेत होता. ' जंजीर 'नं ती उणीव दूर केली. ' जंजीर 'च्या दिमाखापुढे ' अभिमान 'मधली त्याची उजवी भूमिका थोडी बाजूला पडली. पत्नीच्या चढत्या यशानं दुखावलेला अपेशी पती उभा करताना अमिताभनं पुन्हा एकदा कौशल्य पणाला लावलं होतं. ' जंजीर 'मधली उसळती आग या भूमिकेत नव्हती. धुमसत राहिलेला अहंकाराचा अग्नी सूक्ष्मपणे इथं प्रकट करायचा होता. कधी फक्त सलता, घायाळ कटाक्ष टाकून, तर कधी फक्त अधरोष्ठाला मुरड घालून अमिताभनं ही व्यथा अचूकपणं बोलकी केली. पण ' अभिमान ' जमा झाला तो जया भादुरी आणि एस्. डी. बर्मन यांच्या नावावर. (अर्थात त्यांच्या श्रेयाच्या बळावर अमिताभला तिथं त्याचा योग्य वाटा मिळाला नाही, हे मात्र खरं.)

' जंजीर 'नं अमिताभला पुन्हा एकदा प्रकाशात आणलं; ' नमकहराम 'नं त्याचं स्थान भरभक्कम करून टाकलं. अमिताभच्या नव्या ' इमेज 'चा हुपिदांनी मोठ्या खुबीनं उपयोग करून घेतला. राजेश खन्नासारख्या तुल्यबळाशी अमिताभचा सामना होता. अधिक महानुभूतिपूर्ण भूमिका राजेशकडे गेली; राजेशनं ती वठवलीही छान. पण बहुसंख्य




समीक्षकांचा कौल अमिताभच्या बाजूनं गेला. राजेशला तो चांगलाच झोंबला. स्वतःची भूमिका इतकी चांगली होऊनही, 'अमिताभचा रोल लाउड होता...दुय्यम नटांची नेहेमीच वाजवीपेक्षा अधिक प्रशंसा होते' असं त्यानं जाहीरपणे म्हणावं यातच अमिताभच्या यशाची पावती मिळाली. श्रीमंत, दिलदार पण उतावीळ आणि भडक माथ्याच्या विकीच्या भूमिकेत अमिताभ शोभून दिसला. हा 'हीरो' अधिक मानवी वाटला. आपल्या भूमिकेशी एकरूप होऊन गेलेला अमिताभ 'नमकहराम'मध्ये पहिल्यापासून पकड जमवतो. सोमूला वस्तीतल्या लोकांनी मारलं आहे हे कळल्यावर खवळलेल्या चित्त्यासारख्या टांगा टाकत जाणारा अमिताभ...त्या एका चालीत खूप काही सांगून गेला. दिलीपकुमारनंतर आवाजावर एवढी हुकमत असणारा नट बऱ्याच दिवसांनी पहायला मिळत होता. 'माझ्या मित्राला मारणारा कोण माईचा लाल असेल त्यानं हिंमत असेल तर पुढे यावं.'– अशा अर्थाचं वाक्य पिचलेल्या आवाजात, क्रोधानं थरथरणारा अमिताभ बोलतो, ते 'नमकहराम'चे क्षण मोठे श्रवणीय आणि स्मरणीय बनून गेले आहेत. शुद्ध वाणीनं, चढउतारांसकट अमिताभ संवाद अशा सफाईनं बोलतो, की ते डोळे मिटून ऐकले तरी वाक्याचे स्वल्पविराम, अर्धविराम लेखकानं कुठे घातले असतील ते मनानं वाचता येतं.

'दीवार'मधला अमिताभ हे आत्मविश्वासाचं साक्षात् प्रतीक आहे. सगळा चित्रपट आपल्याभोवती आहे याची दिमाखदार जाण आणि ऐट त्याच्या पडद्यावरच्या पहिल्या प्रवेशापासून जाणवते. अशा प्रकारची भूमिका ही आताशा त्याचा हातखंडा झाला असला, तरी आपल्या आगमनासरशी थिएटरमध्ये चैतन्य निर्माण करण्याचं त्याचं कसब मानावंच लागेल. 'स्टार' बनलेल्या अमिताभनं अभिनेता अमिताभची संगत अद्याप तोडली नसल्याचा सुखद अनुभव 'दीवार'मध्ये येतो. एरवी सतत वज्रकठोर मुद्रेनं वावरणारा घुमा विजय; 'मी सुद्धा (माझ्या बापाप्रमाणेच) तोंड छपवून फिरावं अशी इच्छा तुझी आहे का' म्हणून आईला दुखावणारा उन्मार्गी मुलगा; 'अच्छी है' एवढ्या दोनच शब्दात भावाच्या प्रेयसीबद्दल पसंती दर्शवणारा आणि सबंध चित्रपटात पहिल्यांदाच स्मित करून भावाबद्दलचा मृदुभाव व्यक्त करणारा, आणि आयुष्याच्या लढाईत थकूनभागून आईच्या मांडीवर डोकं ठेवून देह ठेवणारा विजय हा अमिताभचा नवा अभिनयविजय आहे. मूळ कथेपेक्षा नटाला मोठे स्थान देणारी ही भूमिका. खास अमिताभकरता लिहिलेली भूमिका. 'स्टार' अमिताभचा विजय असो. पण ही 'स्टार इमेज' अभिनेत्या अमिताभच्या वाटेत 'दीवार' बनून उभी न राहो म्हणजे मिळवली. हृषिकेश मुखर्जींच्या 'चुपके चुपके'मध्ये त्याला प्रथमच संपूर्णतया खेळकर भूमिका करायची संधि मिळते आहे. नाकावरून सतत ज्याचा चष्मा घसरतो अशा वेंधळ्या पण सुस्वभावी नायकाची ही भूमिका, आणि त्याच सुमाराला प्रकाशित होणाऱ्या 'शोले'मधली रंगेल भूमिका ही पुन्हा एकदा अमिताभमधल्या 'स्टार' आणि अभिनेता या दुहेरी पैलूंना आमने सामने आणेल. तेव्हा...

पाहू या पुढे काय होतं. घोडामैदान जवळच आहे. ☐

## 'आन'ची आठवण देणारे बाबूराव....

बाबूराव पटेल आणि 'मदर इंडिया', बाबूराव पटेल आणि सीमेचा फटकळपणा ही पर्यायवाची नावं होत. आताच्या 'मदर इंडिया'त त्यांच्या धारदार जिभेची आतषबाजी कमी, आणि बाबूराव आणि मंडळींचे फोटो, झालंच तर 'शिव' शक्तीच्या जाहिराती इ. इ. च जाहिराती असतात हे सोडून द्या. पण अद्यापही चित्रशौकिनांच्या डोळ्यापुढे बाबूराव पटेल म्हणताच ज्याची–त्याची टोपी उडवणारी वल्लीच येते एवढं खरं. तर आपल्या या तिखट स्वभावानंच त्यांनी एक सिनेमा दिलीपकुमारच्या अक्षरशः गळ्यात बांधला. त्या सिनेमानं दिलीपच्या कारकीर्दीला वेगळंच वळण दिलं; पण स्वतः दिलीप मात्र तो करार करायला नाखूश होता. सिनेमाचं नाव ऐकायचंय ?– 'आझाद.' सविस्तर सांगायचं तर– 'आझाद'चे निर्माते एस्. के. नायडू यांना या सिनेमासाठी दिलीपच हवा होता; आणि दिलीप असा बधणार नाही हेही त्यांना माहीत होतं. दिलीपचा आणि बाबूरावांचा कौटुंबिक घरोबा आहे हेदेखील नायडूंना माहीत होतं. म्हणूनच दिलीपला वळवायची जबाबदारी त्यांनी बाबूरावांवर सोपवली. बाबूरावांनी स्वीकारली. गेले दिलीपकडे. मांडला प्रस्ताव. पण दिलीपनं तो साफ साफ उडवून लावला. 'छे छे ! मला नाही त्या स्टंट पिक्चरमधे काम करायचं.' 'हो का ?' बाबूराव गरजले, ''आन'ची आठवण आहे का तुला ? त्यात कोणता स्टंट करायचं तू शिल्लक ठेवलंस ?' निमूटपणं 'आझाद'चं काम घेऊन टाक पाहू. तुला हे काम घ्यायला लावीनच, असं तुझ्या बहिणीला वचन देऊन आलोय मी.'
–दिलीपकुमारनं खरोखरच मुकाटपणे 'आझाद'मध्ये भूमिका स्वीकारली. अर्थात या मागे एक नाजुक कारणही होतं. निवडक चित्रपटच हाती घ्यायच्या आपल्या शिरस्त्यामुळे दिलीप पेचात पडला होता आणि शिरावरची भल्या मोठ्या कुटुंबाची जबाबदारीही त्याला विसरता येत नव्हती. ☐

## काननबाला

### सबको मेरा सलाम....

सेटवर उशीरा येणं हा हिंदी चित्रसृष्टीपुरता फक्त नियम नसून परंपरा आहे असं दिसतं. सैगलच्या जमान्यातही हा शिरस्ता पाळला जायचा. अर्थात सैगलच्या बाबतीत गोष्ट वेगळी होती. तो स्टुडिओत वेळेवर आलेला असायचा. पण प्रत्यक्ष काम सुरू व्हायच्या वेळी स्वारी कायम गायब असायची. पण सैगलला कुठे शोधायचं हे साऱ्यांना ठाऊक असायचं. स्टुडिओतल्या एका बाजूच्या आडखोलीत, आपला जुनापुराना हार्मोनियम पुढ्यात घेऊन या गंधर्वाची गानसमाधी लागलेली असायची.

सैगलचा सेटवरचा वावर हा अवखळ, खोडकर मुलासारखा असायचा. शोकात्म भूमिकांसाठी रसिकांना प्यारा झालेला हा नट वास्तवात मात्र अतिशय आनंदी, खेळकर स्वभावाचा होता. काहीना काही क्लृप्ती करून सेट हसताखेळता ठेवण्याबद्दल त्याचा लौकिक होता.

सैगलची सूरसिद्धी विख्यात झाली. त्याची आणखी एक सिद्धी मात्र अप्रसिद्ध राहिली. ही सिद्धी म्हणजे–पाकसिद्धी ! घरी बोलावून मित्रांना गळ्यातल्या सुरांची मेजवानी तर द्यायचीच; पण त्या आधी स्वहस्ते रांधलेल्या पक्वानांनी लोकांची तबियत खूश करायची, असा सैगलचा दुहेरी पाहुणचार असायचा.

...सेटवर उशीरा येणं ही एक गंधर्वनगरीतली परंपरा. दुसरी एक परंपरा तशीच ख्यात आहे. नायकानं कॅमेरा सतत आपल्याभोवती फिरता ठेवणं ही सह्याद्रीच्या टेकाडाइतकीच जुनी आणि अभेद्य गोष्ट आहे. याबाबत प्रथितयश नावांची गिनतीच करायची तर 'न्यू थिएटर्स'च्या प्रमथेश बारुआंपासून करता येईल...

एकदोन सुरस किस्शांची ही झाली एक झलक. काननबालाची संपूर्ण कहाणी याहून कित्येक विलक्षण प्रसंगांनी नटली आहे. हां ! 'विलक्षण प्रसंगांनी नटली आहे' याचा अर्थ खळबळ उडवणारा चविष्ट मसाला तिच्या या कहाणीत आहे असा नव्हे. 'सबारे आमि नामि' (सबको मेरा सलाम) या आपल्या आत्मकहाणीत तिनं स्वतःच्या जीवनापेक्षा आपल्या चित्रकारकीर्दीला जास्त महत्व दिलं आहे. बंगाली साहित्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान मिळवलेल्या 'सबारे आमि नामि'चे इंग्रजी व हिंदी अनुवाद लवकरच प्रसिद्ध होतील अशी शक्यता दिसते.

आपल्या समकालीनांची छोटी छोटी शब्दचित्रं हा काननदेवीच्या आत्मकहाणीचा खरा रंगतदार भाग आहे. या सहकारी-कलावंतांच्या पहिल्या भेटीचा ठसा ती आधी सांगते, मग त्यानंतरच्या सहवासानं बनलेलं मत सांगते. बारुआंबद्दलचं आपलं आधीचं मत (कॅमेरा सतत स्वतःभोवती फिरता ठेवण्याबद्दलचं) पुढे बदललं, हे देखील ती प्रांजळपणे सांगून टाकते. (तिच्या या प्रांजळपणामुळे एका बंगाली साहित्यिकानं 'सबारे'ची तुलना म. गांधींच्या शैलीशी केली आहे. गांधीजी ज्या श्रद्धेनं सत्याबद्दल संपूर्णतः सत्य बोलत, तीच प्रांजळता या पुस्तकात दिसते, असं या साहित्यिकाचं म्हणणं.)

आर. सी. बोराल, पंकज मलिक, के. सी. डे. यांच्याबद्दल काननदेवी आपुलकीनं बोलते. 'गीत हा एक संवादच आहे या भावनेनंच ते श्रोत्यांपर्यंत पोचलं पाहिजे, असा बोराल

### नौशादमियाँच्या मुलाखतीतून....

'आजचं हिंदी चित्रपट संगीत म्हणजे दुसऱ्याच्या घरातल्या पणत्या चोरून आपली दिवाळी साजरी करायचा प्रकार आहे. आजकालचं हे संगीत खऱ्या अर्थी आपलं संगीत नाहीच. पाश्चात्य संगीताचा त्याच्यावर जबरदस्त पगडा आहे...पूर्वीच्या हिरो-हिरॉइनची काय टाप होती, की आपल्यावर घेतलं जाणारं गाणं कसं असावं याबद्दलच्या सूचना देतील ? आज मात्र संगीत आणि काव्य यांच्याबद्दल अवाक्षराचं ज्ञान नसणारी नटनटी आपली गाणी आपल्याला पाहिजे तशी करून घेतात आणि याचा परिणाम उघडच आहे...
भारतीय थाटाच्या संगीताला आज काही स्थान शिल्लक नाही असं वाटत असेल, तर नम्रपणे मी एक सत्य सांगू इच्छितो : माझ्या जुन्या चित्रपट गीतांच्या रेकॉर्डस अद्याप एच्. एम्. व्ही. ला दर वर्षी वीस लाख रुपये मिळवून देतात. त्या काळी डझनडझन गाणी एका सिनेमात असायची आणि केवळ गाण्यांसाठीसुद्धा लोक सिनेमाला यायचे. आज गाणी सुरू होताच कित्येक लोक तेवढा वेळ थिएटरबाहेर काढून परत येतात. नवं चित्रसंगीत आणि कलाकार बाह्यतः स्वतंत्र झाले आहेत; पण कलेचं आंतरिक स्वातंत्र्य त्यांना मिळवता आलेलं नाही. पन्नास पन्नास चित्रपट त्यांना एका वेळी घ्यावे लागतात. वाद्यांना फाजील महत्त्व आलं आहे. लोकप्रियता त्यांच्यावर थोडीच अवलंबून असते ? 'दीदार'च्या बऱ्याच गाण्यांमध्ये मी फक्त तीन वाद्यं वापरली आहेत. 'मेरे मेहबूब'च्या अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या शीर्षकगीतामध्ये फक्त सहा साज आहेत.
पाश्चिमात्य संगीत वापरायचंय् ? ठीक आहे. पण मग त्यातलं वरचंवरचं का उचलता ? मोझार्ट, शोपँ यांच्या अभिजात संगीतातलं काही का घेत नाही तुम्ही ?
चित्रपटसंगीतातलं हे आजचं पारतंत्र्य फिटण्यासाठी मला वाटतं, इथेही एखादे गांधी निर्माण होणं आवश्यक आहे आणि हा महात्मा गांधी फक्त निष्ठावान् कलाकाराच्या हृदयेत, त्याच्या प्रतिभेतूनच निर्माण होऊ शकेल !'

◻

यांचा आग्रह असे. पंकज मलिक यांच्या ' मुक्ती 'साठी काननने गायिलेली गाणी अतिशय लोकप्रिय झाली. मलिकना काननदेवी संगीतशिल्पी म्हणते. के. सी. डे. यांचं अंधत्व हे त्यांना शाप नसून वरदान होतं; त्यांची माणसकी आणि संवेदनशक्ती या व्यंगामुळे अधिक तीव्र झाली होती. अशा हृद्य निरीक्षणांनी आत्मकहाणीला खुलावट आणली आहे. अभिनेत्रीमध्ये सुचित्रा सेनविषयी काननदेवी ममत्वानं बोलते. एक तर विपन्न कलाकारांविषयीच्या तिच्या योजना पूर्ण होण्यासाठी सुचित्रानं सक्रीय सहकार्य दिलं. शिवाय सुचित्रा रजतपटाची अधिकृत सम्राज्ञी बनण्यापूर्वी बंगाली नटींची किंमत म्हणजे निर्मात्याच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्याएवढीच होती. नटींना मिळणाऱ्या गैरवागणुकीविरुद्ध सुचित्रा प्रथमपासून बंडाचं निशाण घेऊन उभी राहिली.

काननदेवीचं एक निरीक्षण म्हटलं तर गमतीदार म्हटलं तर व्यवहारी आहे. साधारणतः बंगाली दिग्दर्शकाकडून मुंबईच्या नटींच्या ग्लॅमरबद्दल नापसंती दाखविली जाते. काननदेवीच्या मते मात्र मुंबईतल्या नटचा आपल्या सौंदर्याची जपणूक कसोशीनं करतात, आणि बंगाली नटचांनी त्यांचं अनुकरण केलं पाहिजे.

शेवटी काननदेवीबद्दल एक गोष्ट आवर्जून सांगायला हवी. चित्रकारकीर्दीच्या शिखरावर असताना ती काननदेवी नव्हती. काननबाला होती. आपल्या संपत्तीचा आणि कीर्तीचा विनियोग तिनं सत्कारणी लावला. वयोवृद्ध कलाकारांसाठी तिनं कलकत्याच्या दक्षिण भागात एक प्रशस्त वसतिगृह बांधून दिलं आहे. अन्य समाजकार्यासाठीसुद्धा सढळपणे मदत करण्याबद्दल ती प्रसिद्ध आहे. काननबालाची काननदेवी बनण्याचं श्रेय या सत्कार्याचं. लोक उत्स्फूर्तपणे तिला काननदेवी म्हणू लागले.

विपन्न कलाकारांच्या स्थितीचा साक्षात्कार खुद्द काननदेवीला नाट्यपूर्णपणे झाला. एक दिवशी शूटिंग संपवून ती घरी निघाली. इतक्यात अतिशय हीनदीन अवस्थेतली एक स्त्री तिच्या गाडीजवळ येऊन याचना करू लागली. काननने दिलेले पैसे घेऊन ती बाजूला झाली, तेव्हा हळूच एकानं माहिती पुरविली की, ती भिकारीण म्हणजे, दुसरीतिसरी कुणी नसून एके काळची अतिशय प्रसिद्ध नटी XXXXX ही आहे. ' माझ्या नजरेवर चढवलेला भ्रमाचा पडदा तेव्हा दूर झाला, आणि तिथल्या तिथे विपन्न कलाकारांसाठी साहाय्यनिधी उभारायचं मी ठरवलं '–काननदेवीनं विदारक सत्य या शब्दात उघडं केलं आहे.

◻

---

◻ ' सिनेमाचे फक्त दोनच प्रकार असू शकतात–चांगला सिनेमा आणि वाईट सिनेमा. तुमचा तो नवा सिनेमा न् समांतर सिनेमा वगैरे काही आपल्याला नाही ठाऊक ! गुलजार, हृषिकेश मुखर्जी, बासू चतर्जी, शाम बेनेगल, जेम्स आयव्हरी हे चांगली चित्रनिर्मिती करणारे जाणकार कलाकार आहेत. त्यांच्या सिनेमांमध्ये, त्यांनी इच्छा दर्शवली तर मी अवश्य काम करीन. पण ' मायादर्पण, ' ' दुविधा ' नि ' उसकी रोटी 'सारखे चित्रपट मी चुकून हाती घेणार नाही ! '

– जीतेंद्र

◻ ' आम्हा प्रयोगशील नाटकवाल्यांचा एकांत भंग पावू नये म्हणून की काय, प्रेक्षक आमच्या नव्या नाटकांना फारसे गर्दी करीत नाहीत.'

– रत्नाकर मतकरी

◻ डिम्पलच्या लोकप्रियतेनं एक जमाना काबीज केला खरा. चपलांपासून हेअरपिनांपर्यंतच्या यच्चयावत वस्तूंना तिचं नाव दिलं गेलं. नव्यानं निघालेल्या एका फिल्म कंपनीचं नामकरणही डिम्पल फिल्म्स करण्यात आलं. (तरी बरं, याच नावाची सीनियर कंपनीही अस्तित्वात आहे.) थोडक्यात म्हणजे, एखादं अमृततुल्य भवनच काय ते सोडून डिम्पल सर्वत्र पोचली. मग एखाद्या सिनेमानंच तिचं नाव घेतलं तर काय बिघडलं ? मात्र या ' डिंपल 'मध्ये प्रमुख भूमिका डिंपलला न देता, रीटा भादुरी या नवतारकेकडे सोपवण्यात आली आहे.

◻ लता मंगेशकर आणि आशा भोसले यांचं निवासस्थान ' प्रभुकुंज ', तसंच कै. पृथ्वीराज कपूर यांचा जुहू येथील बंगला यांना राष्ट्रीय स्मारकाचं रूप देण्यात यावं, अशी विनंती सुप्रसिद्ध कवी बालकवी बैरागी यांनी महाराष्ट्र सरकारला केली आहे.



# आगामी



आक्रमण मध्ये......

संजीवकुमार, सुलोचना
आणि फरिदा जलाल.
दिग्दर्शक ■
जे. ओम प्रकाश.

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा
प्रथम पारितोषिक विजेते नाटक
'चांगुणा'
मध्ये रोहिणी ओक.





द्वितीय पारितोषिक विभागून
'आरण्यक'
दिलीप प्रभावळकर आणि रवी पटवर्धन.

आणि
'महानिर्वाण' मध्ये
लेखक - दिग्दर्शक
सतीश आळेकर.



# हॅान डॅट

मूळ व्हिएतनामी लेखक : अॅन्ह डक
इंग्रजी भाषांतर : रॉबर्ट सी. फ्रेंड
मराठी भाषांतर : लक्ष्मण लोंढे

'हॉन डॅट' कादंबरीचे पहिले पाच हप्ते माणूस मधून आतापावेतो क्रमशः प्रसिद्ध झाले.

हॉन डॅट या गावात शत्रू सैन्याची तुकडी आता चाल करून आलेली आहे....

गावातील क्रांतिकारकांचा गट गाव सोडून शेजारच्या गुहेत शस्त्रास्त्रांचा साठा घेऊन प्रतिकारासाठी जमलेला आहे.....

या गटाने शत्रूसैन्याचा पहिला हल्ला परतावून लावलेला आहे. गावचे नैतिक धैर्य अभंग आहे....

युद्ध आता पसरते आहे....तसेच रेंगाळतेही आहे.

गुहेतील क्रांतिकारकांची पुरती कोंडी व्हावी म्हणून गुहेजवळच्या पाण्याच्या साठ्यात विष कालवण्याचे मनसुबे शत्रू लढवीत आहे...

यातून नवे नवे समरप्रसंग उद्भवत आहेत...

क्रांतिकारकांची निष्ठा उजळून निघत आहे. या युद्धातून एक नवा, अखंड व्हिएतनाम जन्मास येणार आहे, ही त्यांची श्रद्धा त्यांना लढण्याचे बळ देत आहे...

पण हा सारा पुढचा कथाभाग माणूसमधून न देता एकदम पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावा अशी कल्पना आहे.

माणूसधून आतापावेतो प्रसिद्ध झालेल्या पहिल्या पाच हप्त्यांवरून कादंबरीची ताकद, तिचे स्वरूप व वैशिष्टच वाचकांच्या ध्यानात आले आहेच. जगातील एका बलाढ्य साम्राज्यशाहीशी लढणारा सर्वसामान्य व्हिएतनामी माणूस या कादंबरीतून दिसतो. हेच तिचे मूळ सामर्थ्य. मराठीत व्हिएतनामी युद्धाचे अशा पातळीवरचे दर्शन यापूर्वी कुठे आलेले नाही. म्हणून माणूसमधील पहिल्या पाच हप्त्याप्रमाणेच संपूर्ण कादंबरीचेही मराठी वाचकांकडून स्वागत व्हावे असे वाटते. आपल्या शेजारीच वर्षानुवर्षे संसार करणारी आणि वेळ येताच देशासाठी युद्धात उतरणारी 'सू' तिचे सर्व कुटुंब-परिवार आहे तरी कसा, गावातलाच एखादा 'झॅम' किंवा 'बा फी' शत्रूला फितूर कसे होतात, युद्धाच्या धुमश्चक्रीतही 'गॅन' आणि 'कुएन'चे नाजुक प्रेमप्रकरण कसे फुलते-बहरते...

--हरी नारायण आपट्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची आठवण व्हावी असे हे सगळे वातावरण आहे, चित्रण आहे. मराठी मनाला म्हणूनच हॉन डॅट ओळखीची वाटावी, जवळची वाटावी अशी कल्पना आहे. शिवकालात मराठी मन अशा अनुभवातून एकदा गेलेले आहे. हॉन डॅट या अनुभवाला पुन्हा उजळा देत आहे....

हा अनुभव क्रमशः वाचनात तुटत राहतो, खंडित होतो म्हणून आता एकदम पुस्तक स्वरूपातच संपूर्ण, अखंड पुढे ठेवावी असा विचार आहे.

सहावा हप्ता म्हणून या अंकी दिलेला नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२१ सादशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**